


५२
म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. नं. ५९८

REFBK-0007789

ग्रंथ हेच आपले कायमचे गुरु होत.

म. नोंद. १३५९३ ग्रं. नों.

जितुकें काहीं आपणासी ठावें । तितुकें हळुहळु सिकवावें ।

# श्रीकृष्णाची आत्मकथा

लेखक

श्री. आपटेगुरुजी

७५८९
डा. क.
REFBK-0007789

बागवे प्रकाशन, मुंबई ४

किंमत दीड रुपया

प्रकाशक :
वा. द. वागवे,
खटाव वाडी, मुंबई ४.

[ सर्व हक्क सुरक्षित ]

एप्रिल १९५२

मुद्रक :
श्री. र. राजगुरु,
राजगुरु प्रेस,
४०५ नारायण पेठ, पुणें २.

राष्ट्रीय लढ्यांत ज्यांनीं स्वार्थत्यागपूर्वक भाग घेतला

व

सध्यां विधायक कार्यास ज्यांनीं वाहून घेतलें आहे त्या

**सर्जन रामभाऊ दातारांना**

ही कृष्णकथा स्नेहपूर्वक समर्पण

— **पां. श्री. आपटे**

7७५९३ / १५५५५२
वां. ५९८


# निवेदन

'**श्रीकृष्णाची आत्मकथा**' लिहिण्याचा विचार कांहीं महिन्यांपूर्वी मनांत घोळत होता. पुढें एक दिवस माझे स्नेही श्री. गणपतराव वीरकर यांचेजवळ गप्पा मारतांना हा विषय निघाला. त्यांनीं कथा लिहून काढण्यास उत्तेजन दिलें व त्यांचे स्नेही मुंबईचे वृत्तपत्रविक्रेते श्री. बाबूराव बागवे यांचेतर्फे तें प्रकाशित करण्याची व्यवस्था केली. यामुळें बरेच दिवस मनांत घोळत असलेला विषय हातावेगळा होण्याचें समाधान मला मिळालें.

श्रीकृष्ण आपल्या परिवारांत बसून आपली जीवनकथा सांगत आहे अशी कल्पना करून हें पुस्तक लिहिलें आहे. कृष्णाचें नित्यजीवन अर्थात् अशा निवेदनांत येऊं शकत नव्हतें म्हणून सायंकाळीं 'कथा' सुरू होण्याचे पूर्वी कृष्णाचा दिनक्रम कशा तऱ्हेचा होता हें कांहीं प्रकरणांचे सुरुवातीला दाखविलें आहे. यामुळें कृष्णाच्या एकंदर जीवनावर प्रकाश टाकण्यास सुलभ गेलें आहे.

कोणीं या आत्मकथेला नवलकथाहि म्हणून संबोधण्याचा संभव आहे. तशी ती असली तरी यांतील पात्रें जें बोलतात-चालतात तें मूळ कथेंतील पात्रांच्या स्वभावाला धरूनच आहे. मूळ कथेंतील जो अद्भुत भाग जसाच्या तसाच ठेवला आहे तो अगदीं अल्प आहे. हा भाग तसाच ठेवण्याचा उद्देश असा आहे कीं, त्या वेळच्या लोकमताची कल्पना वाचकांस यावी. कृष्णाची आत्मकथा साहजिकच भारती युद्धानंतर थांबली. खरें म्हटलें तर तेथेंच पुस्तक संपावयाचें; परंतु श्रीकृष्णाच्या उत्तर आयुष्याबद्दल सामान्य वाचकांची उत्सुकता राहणारच. म्हणून त्याच्या अवतारसमाप्तीपर्यंतचा वृत्तांत **सायंकाळच्या छायेंत** या प्रकरणांत दिला आहे.

पुस्तकाची भाषा शक्य तितकी सोपी, घरगुती ठेवली आहे. तरी पण कांहीं शब्द विद्यार्थ्यांना अडतील म्हणून अशा शब्दांवर टीपा दिल्या आहेत. अभ्यासू विद्यार्थ्यांचें चित्त महत्त्वाच्या गोष्टींकडे खेंचून घेण्याकरितां शब्दार्था-

बरोबर कांहीं प्रश्नहि दिले आहेत. हें पुस्तक विद्यार्थ्यांना उपयुक्त व्हावें पण त्याचबरोबर पुस्तकाला शाळकरी पुस्तकाचें स्वरूप राहूं नये म्हणून टीपा व प्रश्न पुस्तकाच्या शेवटीं दिले आहेत.

कर्मयोगी पुरुषासंबंधानें आपल्या कल्पना पुष्कळशा अवास्तव बनलेल्या आहेत. संसारांतील नित्याचीं कर्मे करतां करतांच श्रीकृष्ण योगारूढ कसा झाला, त्याची जीवनाकडे पहाण्याची दृष्टि कशी होती, तसेंच जो दिव्य उपदेश त्यानें रणमैदानावर अर्जुनास केला तो त्याचे जीवनांत कसा मुरून गेला होता हें दाखविण्याचा प्रयत्न येथें केला आहे. तो वाचकांच्या लक्षांत येईलच.

या पुस्तकाच्या प्रकाशनाची जबाबदारी श्री. बाबूराव बागवे यांनीं पतकरली यामुळें हें पुस्तक प्रसिद्ध होऊं शकत आहे. त्याचप्रमाणें राजगुरु प्रेसच्या चालकांनीं कामाची गर्दी असतांना हें पुस्तक आस्थेवाईकपणानें छापून दिलें. पुण्याचे उदयोन्मुख चित्रकार श्री. भय्यासाहेब ओंकार यांच्या सुबक चित्रांनीं पुस्तकाचा आकर्षकपणा वाढला आहे. त्यांनीं खास परिश्रम घेऊन अगदीं अल्पकाळांत सगळीं चित्रें काढून दिलीं. व चित्रांचे ब्लॉक्सहि श्री. मोघे यांनीं काळजीपूर्वक व वेळेवर करून दिले. या सर्व मंडळींचा मी अत्यंत आभारी आहें. माझे आणि श्री. बाबूराव बागवे यांचे जुने स्नेही श्री. ग. म. वीरकर यांनीं पुस्तकप्रकाशनाच्या बाबतींत विशेष दगदग सोसली याबद्दल त्यांचे आभार मानावयाचे म्हणजे एका हातानें दुसऱ्या हाताचे आभार मानल्यासारखें होणार आहे.

शेवटीं, ज्या भगवंतानें हा लहानसा वाग्यज्ञ मजकडून करवून घेतला त्या भगवंताच्या चरणाला नमन करून हें निवेदन संपवितों.

लक्ष्मीसदन, जंगलीमहाराज रस्ता,
डेक्कन जिमखाना, पुणें ४
दि. २७-४-५२

—पां. श्री. आपटे

# अनुक्रमणिका


| प्रकरण | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | अहाहा! रम्य तें गोकुळ ... | १३ |
| २ | अभिमन्यूच्या शिक्षणाची जबाबदारी | २६ |
| ३ | श्रीकृष्णाचा दरबार ... | ३७ |
| ४ | अभिमन्यूचें जीवन-शिक्षण ... | ४३ |
| ५ | कृष्णाची दूरदृष्टि ... | ४९ |
| ६ | अन्यायाचा प्रतिकार ... | ६० |
| ७ | गुरुबंधूचें हार्दिक स्वागत ... | ७० |
| ८ | प्रापंचिक योगी ... | ८३ |
| ९ | रुक्मिणी-स्वयंवर ... | ९२ |
| १० | नवीन पिढीचे विचार ... | ९९ |
| ११ | सुभद्रा-हरण ... | १०६ |
| १२ | वैराची कारणमीमांसा ... | १११ |
| १३ | सर्वसंहारक युद्ध ... | ११५ |
| १४ | रुक्मिणीची योगारूढ अवस्था | १२४ |
| १५ | अर्घ्यप्रदान ... | १३६ |

" आधींच श्रीकृष्णाचें चरित्र नाट्यपूर्ण घटनांनीं नटलेलें; त्यांत तें खुलवून-फुलवून सांगण्याची भूमिका श्री. आपटेगुरुजी यांनीं घेतलेली. त्यामुळें त्यांचें हें पुस्तक रसाळ व आकर्षक झालें आहे. 'मथुराधिपते-रखिलं मधुरं' याचा प्रत्यय प्रत्येक प्रसंगांत येतो. त्यांतहि कृष्ण-सुदामा-भेटीचा योग म्हणजे तर नाना रसांचा उत्कर्षच! मैत्री हा स्वतंत्र रस मानावा असेंच या हृदयंगम कथाभागावरून वाटूं लागतें. बायकांच्या बोलण्यांतील खांचाखोंचा तर गुरुजी बारकाईनें प्रगट करतातच; पण त्यांच्या स्वभावांतील पातळ पडदेहि ते कुशलतेनें उकलून दाखवितात. निरनिराळ्या नयनरम्य रंगांनीं विविध आकृति व देखावे काढलेला एखादा बहुमोल काश्मिरी गालिचा आपल्या डोळ्यांपुढें उलगडला जावा तसा भास श्रीकृष्णाचें हें अपूर्व व अतिरम्य आत्मचरित्र वाचतांना सहृदय वाचकाला होतो. श्रीरामकृष्णांचीं चरित्रें हेच आमच्या राष्ट्राचें चारित्र्य उज्ज्वल राखणारे परीस होत. ते 'सदा पुरते' आहेत, ताजे आहेत आणि स्वयंप्रकाशी आहेत. त्यांचा प्रसार जितक्या रूपांनीं व जितक्या प्रमाणांत होईल तितका हवाच आहे."

महात्मा मासिक-कार्यालय, पुणें २ —दा. न. शिखरे

" श्रीकृष्णचरित्रावरील हें अभिनव पुस्तक अगदीं वेगळ्या कलात्मक पद्धतीनें लिहिलें आहे. श्रीकृष्णाचें चरित्र जितकें पुरातन तितकेंच नित्य-नूतन; उषःकालची शोभा नेहमींच नवी; अग्नि केव्हांहि प्रदीप्त केला तरी पवित्रच तसें श्रीकृष्णचरित्राचें आहे. स्वतः भगवानच आपली जीवनकथा सांगत आहेत अशी कल्पना करून श्री. आपटेगुरुजींनीं या पुस्तकाची मांडणी केली आहे. त्यांतला घरगुतीपणा, नर्मविनोद, स्नेह-कलह आणि या सर्व सुंदर छटांतून विकसित होणारें श्रीकृष्णाचें उदात्त चरित्र फारच चित्तवेधक आहे. विभूतींच्या चरित्रांतील मानवीपण कळलें तरच तिचें अलौकिकत्व मनावर अधिक ठसतें. आपटेगुरुजींनीं नेमकें हेंच अवधान ठेवलें आहे. पालक व शिक्षक या पुस्तकांत स्वतः रंगतील आणि आपल्या रसास्वादांत मुलांना सहभागी करतील ही खात्री वाटते."

आनंद-कार्यालय, पुणें २. — गोपीनाथ तळवलकर

★ ★

" 'रामायण' आणि 'महाभारत' हे हिंदूंनाच नव्हत तर अखिल मानवजातीला मान्य होणारे असे थोर ग्रंथ आहेत. त्यांचें थोरपण परकीयांनींदेखील कबूल केलें आहे. 'राम' आणि 'कृष्ण' या दोन विभूतींचें यथार्थ दर्शन या दोन ग्रंथांतून होतें. 'जीवन-कला' किंवा माणसानें जगांत कसें वागवें, हें विशेषतः कृष्णानें 'गीतेमधून' केवळ अर्जुनासच नव्हे तर अखिल मानवांस निवेदन केलें आहे. कृष्णाची कथा आबालवृद्धांनीं ऐकावी अशी ती गोड आहे. अनेकांनीं कृष्णचरित्र वर्णन केलें आहे; परंतु आपटेगुरुजींनीं या आत्मकथेंत स्वतः कृष्णाला आपल्या बालगोपालांमध्यें बसवून त्याला आपल्या आयुष्यांतील गोष्टी सांगावयास लाविलें आहे. त्यामुळें कृष्ण हा कोणी त्रयस्थ न भासतां आपल्यासमोर बसलेला आपला संवगडी भासतो. 'गांधींची गोष्ट' या पुस्तकांत म. गांधी स्वतः आपली जीवनकथा लोकांना सांगताहेत असें आपटेगुरुजींनीं दाखविलें आहे, तीच पद्धत याहि पुस्तकांत स्वीकारल्यानें बालतरुणांना हें पुस्तक विशेष आवडेल असा विश्वास वाटतो."

पुणें, २२-४-५२. — बा. ग. जगताप

★ ★

" माझे मित्र आपटेगुरुजी यांचें पुस्तक त्यांच्यासारखेंच आहे, शांत, सौम्य, गंभीर. जगाला व विशेषतः हिंदु धर्मीयांना श्रीकृष्ण कसा वाटतो हें लिहिणें इतकेंसें अवघड नाहीं; तथापि श्रीकृष्णाचें जें अवतारकार्य झालें, त्याच्याविषयीं त्याची स्वतःची दृष्टि कशा प्रकारची असूं शकेल हें हुडकून काढणें म्हणजे मानसशास्त्रांतला एक प्रयोगच आहे. हा गुरुजींचा प्रयोग माझ्या मतें यशस्वी झाला आहे. श्रीकृष्णाच्या चरित्रांत किती तरी अद्भुत गोष्टी आहेत. या गोष्टींतील गोडवा व आकर्षकपणा कोणत्याहि प्रकारें कमी न करतां गुरुजींनीं त्यांच्यांतील असंभवनीयता व चमत्कार यांना वास्तविक रूप देण्याचा प्रयत्न केला आहे. यामुळें वाचकास श्रीकृष्ण ही आपल्याचसारखी हाडामांसाची चालती-बोलती व्यक्ति होती असा प्रत्यय येऊन त्या विभूतीबद्दल एक प्रकारचा आपलेपणा वाटेल. श्रीकृष्ण आपलें गतकालीन आत्मचरित्र सांगत असतांना त्याचें वर्तमानकालीन जीवन रेखाटण्याची गुरुजींची योजना मजेदार आहे. श्रीकृष्णचरित्रांत बोध घेण्यासारखे अनेक प्रसंग आहेत. आपटेगुरुजींनीं त्यांचा योग्य परामर्श घेतला आहे व तो घेतांना वाचकांना नीरस नीतिपाठ दिले नाहींत. आपटेगुरुजींच्या या नव्या बालकाचें मी मनःपूर्वक स्वागत करतों."

सुषमा, डेक्कन जिमखाना, पुणें ४ — वि. द. घाटे

दा. क्र. ७७५९९
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# श्रीकृष्णाची आत्मकथा

## बालपणींचा काल सुखाचा आठवतो घडिघडी ।

इंद्राच्या अमरपुरीलाहि लाजविणारें रम्य स्वरूप द्वारकेला आणून देऊन श्रीकृष्ण आज बरींच वर्षें तेथें प्रजेचें पालन आणि रंजन करीत होता. एक दिवस त्याला आपल्या बालपणचे गोकुळांतले दिवस आठवले. आपण गोकुळांतच आहोंत अशा कल्पनेंत दंग असतां त्याला गोकुळांतून येतांना जपून आणलेल्या मुरलीची आठवण झाली. लगेच तो मंचकावरून उठला, आणि त्यानें आपल्या खास पेटींतून अनेक वस्त्रांत गुंडाळून ठेवलेली आपली मुरली काढली. नंतर मंचकासमोर उभा राहून ती तो वाजवूं लागला. जुन्या आठवणी जागृत होऊन त्याचें मन अनेक भावनांनीं भारून गेलें, व त्या भावनांच्या भरांत त्या जुन्या मुरलींतून मधुर आलाप निघूं लागले. रुक्मिणीचा महाल जवळच होता. तेथें ते रुक्मिणीला साहजिकच ऐकूं आले. तो श्रुतिमनोहर मुरलिनाद ऐकतांच तिच्या अंगावर रोमांच उभे राहिले. तेव्हां ती मनांत म्हणाली, हे आलाप कोणी तरी गंधर्व अंतरिक्षांत भ्रमण करितांना काढीत असावा. थोडा वेळ गेल्यावर तिला वाटलें,—नाहीं, हा मुरलीचा नाद जवळ आसपासच निघत आहे. म्हणून तिनें दासीला विचारलें,

"आलापिके, कोण गे मुरली वाजवीत आहे ? तूं ऐकलीस का ? फार गोड आहे नाहीं मुरलीचा नाद ?"

आलापिका— महादेवी, मला वाटतं, सरकारच्या मंदिरांतूनच हा मधुर आलाप निघत आहे. मी कानोसा घेऊन येतें पाहिजे तर !

रुक्मिणी— कांहीं नको. मी स्वतःच तिकडे जाऊन येतें.

रुक्मिणी मृदु पावलांनीं कृष्णाच्या मंदिरांत गेली, आणि हळूच त्याचे मागें जाऊन आलाप ऐकत उभी राहिली. कृष्ण त्या वेळीं भाव-समाधींत

होता. त्याला वाटलें, गोकुळची राधा गौळणच आपल्यामागें मुरलिनाद ऐकत उभी आहे.

मागें न वळतांच रागाचा आविर्भाव आणून तो म्हणाला, “ राधे, तुला कितीदां सांगायचं, कीं कामधंदा टाकून इकडे येऊं नये म्हणून !– काय म्हणतेस, मीं अवेळीं मुरली कां वाजविली?—अग, मुरली वाजविल्याविना राहवलं नाहीं म्हणून !— काय म्हणतेस ? बोल कीं,– अस्पष्ट अन् आपल्याशीं पुटपुटायची वाईट संवय आहे तुला !– काय म्हणतेस ? – मलाहि मुरली वाजूं लागल्यावर घरीं राहवेना, म्हणून आलें !

असें कृष्ण आपल्याशीं बोलत आहे तोंच रुक्मिणी गप्प न बसतां पुढें येऊन म्हणाली, “ राधेप्रमाणं मलाहि राहवलं नाहीं म्हणून अवेळीं मी तुमचे महालांत आलें. देवा, इतकीं वर्षं आपल्या लग्नाला झालीं, पण तुम्ही कध्धीं कध्धीं आपली मुरली मला ऐकवली नाहीं. ही मुरली इतकी जुनी हो कशी ? कोठून हो आणलीत ? गोकुळची वाटतं ? ”

या रुक्मिणीच्या प्रश्नानें कृष्ण भानावर आला. मागें वळून रुक्मिणीला म्हणाला, “ देवी, तूं मजकडे केंव्हांहि आलीस तरी मला त्यांत आनंदच वाटतो; पण आज मी माझ्या बाळपणींचा गोकुळांतील काळ कल्पनेनं अनुभवीत होतों. माझा तो समाधिभंग तूं केलास, यामुळं मी तुजवर थोडा रुष्ट झालों आहें. ”

“ मग करा कीं शिक्षा ! ” रुक्मिणी चिडून म्हणाली; पण लगेच आपला तोल सांवरून म्हणाली, “ पण नको, मीच स्वतः शिक्षा करून घेतें. हें पहा, मी आपलं सम्राज्ञीपद विसरून गोकुळची गौळण होतें आणि आपली मुरली ऐकत राहण्याची शिक्षा भोगतें. ”

कृष्णानें एक दीर्घ श्वास सोडला व म्हटलें, “ देवी, तूं जाणतेसच, कीं मी सम्राट तर नाहींच, पण साधा राजाहि नाहीं. हे अधिकार तातांकडे आहेत ना ? ”

“ होय, माहीत आहे मला तें सारं. नेहमींच तुम्ही मला बजावीत आलां आहां, कीं तुम्ही राजे नाहीं. अर्थात् मी राज्ञी नाहीं हें ओघानं आलंच. पण

९३५२५ १५५५१४

ता. नं. ५६८

हें ध्यानांत असूं द्या कीं, मी आर्यावर्ताची सम्राज्ञी नसेन, पण तुमच्या विशाल मनावर अधिराज्य चालविणारी सम्राज्ञी आहें ना? का तीहि नाहीं? काय सांगावं, तुमचा महिमा अतर्क्य आहे!"

"अग, हो हो! एकदम एकेरीवर येऊं नकोस. एवढ्या-तेवढ्यावरून रुसायला तूं काय सत्यभामा आहेस? राग सोडून बैस तर जरा मंचकावर." कृष्ण समजुतीच्या स्वरांत म्हणाला.

"राग सोडून बसतें;-पण एका अटीवर!" तंटा मिटवण्याच्या बायकांच्या विशिष्ट पद्धतीस अनुसरून रुक्मिणी म्हणाली.

"काय, सांगा तर एकदांच्या आपल्या अटी! विजयी वीरदेखील पराभूत शत्रूवर इतक्या तोऱ्यानं अटी लादीत नसतील."

"माझी अट अशी कीं, आपण पुनश्च मुरली वाजवावी!" रुक्मिणीनें मधुर मंद स्मित करून म्हटलें.

"पुन्हां मुरली वाजवायची!—" हे उद्गार काढतांना कृष्णानें 'कठीण काम आहे बुवा' अशा अर्थाचा आविर्भाव केला.

"एवढं का तें काम अवघड आहे?" रुक्मिणीनें आश्चर्य दर्शवून उलट प्रश्न केला.

"तूं एखादं गाणं म्हणायला सांग,-आतां म्हणतों पाहिजे तर; पण मु-र-ली—" अशीं अक्षरें उच्चारून कृष्ण थांबला.

"कां बरं? आम्ही मुरली ऐकण्याला लायक नाहीं का?" रुक्मिणीनें खेद प्रदर्शित करून म्हटलें.

"असा प्रश्न विचारणं बरोबर नाहीं. मुरलींतून पुनश्च मधुर आलाप ऐकायचे तर गोकुळचं वातावरण हवं!" कृष्णानें नवीनच अट घातली.

रुक्मिणी कृष्णाचे डावावर तोड काढण्यांत पटाईत होती. ती लगेच म्हणाली, "एवढंच ना? तुमचा गौळवाडा म्हणजेच गोकुळ— नाहीं का? तें गोकुळ कंसाचं होतं, आणि हें कंसकंदनाचं आहे. आज सायंकाळीं रथांत बसून आपण आपल्या गौळवाड्यांत-नव्हे गोकुळांत-जाऊं. मग पहायला मिळेल तुम्ही तिथं कसे रमतां ते."

"आज नाहीं. गोकुळच्या वातावरणाकरितां नंदाची कुटी लागेल ना!" कृष्ण आपला भाव वाढवीत म्हणाला, "रुक्मिणी, बाळपणचे माझे संस्कार इतके दृढ आहेत कीं, मला तात-नंदांची कुटी आतां डोळ्यांसमोर दिसते आहे. त्या पहा नंदाच्या डुलत डुलत चालणाऱ्या गाई,– ती पहा वासरांची मातेकडे जाण्याची धडपड,– तो यशोदामातेचा ताकाचा मोठा डेरा — ज्या दोरीनं मला उखळीला बांधलं होतं ती ताकाची दोरी— तीं दहीं-दुधाचीं शिंकीं,– ते ताकाचे जमिनीवर पडलेले शिंतोडे— "

"पुरे पुरे! पुन्हां तुम्ही भावसमाधींत चाललांत! तुम्ही आज्ञा करा, तुम्ही दाखवाल तशी नंदकुटी मी तयार करवून घेतें. मग तरी दाखवाल ना मुरली वाजवून? लहानपणीं तुम्ही हट्ट करून यशोदासासूबाईंना किती दमवीत असाल याची मला आज कल्पना आली! साधी मुरली वाजवायची ती काय—आणि त्याच्या अटी केवढाल्या!"

"अग, खोड्या करण्याचा माझा काळ संपला आहे. तूं माझ्या मनाशीं एकरूप हो, कीं माझं मुरलीवादन झालंच सुरू असं समज! त्या भोळ्या गौळणी—"

"मी नाहीं का तुमच्या मनाशीं एकरूप झालें?"

"नाहीं कोण म्हणतो! पण मधून मधून तुझ्या मनांत राज्ञीपदाचा अहंकार डोकावतो, नाहीं का?"

"आपल्यासारख्या अद्वितीय वीराची मी पत्नी आहें, हा अभिमान मला आहेच. इतकंच नाहीं – तर या अभिमानाचाहि अभिमान मला आहे!" रुक्मिणीनें तोऱ्यानें उत्तर दिलें.

"मग नंदकुटी तयार करण्यास लवकर लाग पाहूं. नाहीं तर प्राजक्ताचीं थोडींच फुलं मजकडे आलीं म्हणून रुसण्यांत वेळ घालवशील!"

कृष्णाला उत्तर देण्यांत अर्थ नाहीं असा भाव नेत्रानें प्रदर्शित करीत रुक्मिणी कृष्णाच्या महालांतून बाहेर पडली!

---

# १

## अहाहा ! रम्य तें गोकुळ !

भगवान् श्रीकृष्ण पुष्कळदां रुक्मिणीच्या महालांत बसून गप्पा मारतांना गोकुळच्या आठवणी सांगावयाचा. परवां तर आपल्या भावसमाधींत तो गोकुळच्या जीवनांत तन्मय होऊन गेलेला पाहिल्यावर रुक्मिणीच्या मनानें घेतलें कीं, मथुरेच्या गोकुळांत नाहीं,–तरी द्वारकेच्या गोकुळांत जाऊन कांहीं काल रमण्याचा आनंद आपल्या पतीस द्यावा. म्हणून तिनें कृष्णाला विचारून विचारून नंदाच्या गृहासारखें साधेंसुधें घर बांधून घेतलें, व रोज सायंकाळीं त्याच्यासमवेत तेथें जाऊन बसण्याची प्रथा पाडली. पुढें पुढें दोन घटका दिवस राहिला कीं कृष्ण आपलें काम आटोपतें घेई, आणि गोकुळात जाण्याच्या तयारीस लगबगीनें लागे. हळूहळू तेथील गोपाळांचीं लहान-मोठीं बालकें त्याच्याभोंवतीं जमूं लागलीं. कधीं कधीं तो त्यांच्याबरोबर विटी-दांडू, लगोऱ्याहि खेळूं लागे. उतार वयांतहि त्याच्या अंगांत बालपणची चपलता दिसून येई. पोट थोडेंसें सुटलेलें — असा कृष्ण धांवूं लागला, हुलकावण्या देऊं लागला म्हणजे कृष्ण-स्त्रियांची हंसतां हंसतां मुरकुंडी वळे. एक दिवस त्यानें आपला रत्नजडित मुकुट काढून ठेवून रुक्मिणीनें मुद्दाम तयार केलेला मोरमुकुट घातला. त्या वेळीं खोडकर सत्यभामा रुक्मिणीस म्हणाली, "महादेवी, पाहिलंत का तुमच्या देवाचं ध्यान ! यांना हा मोरमुकुट नाहींच बाई शोभत !"

कृष्ण म्हणाला, "काळी घोंगडी व गुराख्याची उंच काठी मीं हातांत घेतली म्हणजे हा मुकुट मला चांगला शोभेल, बरं का !" असें म्हणून त्यानें गोपाळांचे मुलांस त्याची घोंगडी व काठी आणण्यास सांगितलें.

तेव्हां सत्यभामा उठून कृष्णाला म्हणाली, "मी नाहीं चालूं देणार हे असले चाळे ! मी गोपालाशीं लग्न केलं नाहीं,–द्वारकाधीशाशीं लग्न केलेलं आहे !"

कृष्णाला हें तिचें अधिक बोलणें रुचलें नाहीं. त्याची भ्रुकुटि थोडी वक्र झालेली पहातांच रुक्मिणीनें सत्यभामेचा पाय दाबला व तिला गप्प बसण्यास सुचविलें, आणि आपण पुढें येऊन म्हणाली, "देवा, आम्ही तुम्हांला घोंगडी पांघरू देऊं, पण एका अटीवर! आपण तो गोकुळचा पांवा वाजवून दाखविला पाहिजे!"

"पण त्या वैभवशाली सत्राजित–कन्येला आवडेल का आमची गोपालाची साधीसुधी मुरली?" कृष्णानें खोंचून विचारलें.

"न आवडायला काय झालं? सत्यभामादेवींनीं तुमच्या मुरलीचे बोल अजून ऐकलेले नाहींत. ते ऐकल्यावर त्या मुरलीच्या आलापाकरितां तुमच्या सर्व छंदांना त्या अनुमती खास देतील! मग वाजवावी ना एकदां आपली मुरली!" रुक्मिणीनें काकुळतीनें म्हटलें.

कृष्ण म्हणाला, "अग, पण आतां सायंकाळ झाली. संध्योपासनेची वेळ झाली ना!"

"पुरे झाली ही चाळवाचाळव. ही भोळी रुक्मिणी आपल्या कलानं जों जों घेते तों तों आपण अधिक–अधिकच ओढून धरूं लागलां कीं! तें कांहीं नाहीं, कराच आतां सुरुवात. आहे ना मुरली तुमच्याजवळ?"

कृष्णानें ती मुरली हळूच हातांत घेतली. तिजकडे कौतुकानें पाहिलें. डाव्या पायावर उजवा पाय ठेवून, मान थोडीशी वांकडी करून, ओठांवर ती मुरली अलगद टेकली, आणि बोटें फिरवून पहिला आलाप काढला. त्याबरोबर जिकडे तिकडे स्तब्धता पसरली. कृष्णानें हळूहळू सुरुवात करून पुढें पुढें आलापावर आलाप काढणें सुरू केलें. ते ऐकतांच त्या गोकुळांतील स्त्री-पुरुष आपलीं सायंकाळचीं कामें टाकून कृष्णाजवळ धांवत आले, गायी हंबरू लागल्या, गवळणींना धारा काढणें कठीण झालें, गवळ्यांच्या हातून वांसरें निसटलीं. इकडे कृष्ण-स्त्रियाहि मंत्रमुग्ध झाल्या. कृष्ण मुरली वाजविण्यांत तल्लीन होऊन गेला. मग रुक्मिणी पुढें झाली आणि कृष्णाला म्हणाली, "बराच वेळ झाला कीं, चला घरांत. यशोदामाता तुम्हांला दूध प्यायला बोलाविते आहे." असें म्हणतांच कृष्ण भानावर आला. नंतर त्यानें एक

सुंदर लकेर मारली, आणि मुरली रुक्मिणीचे हातीं दिली. नंतर प्रसन्न वदनानें सर्वांसमवेत तो ' नंदगृहां 'त गेला. रुक्मिणीनें आज मुद्दाम चटणी–भाकर, धारोष्ण फेसासकट दूध पेल्यांत भरून ठेवलें होतें. तें पाहून कृष्ण म्हणाला, " देवी, मी आज तुजवर प्रसन्न झालों आहें. पाहिजे तो वर मागून घे. "

रुक्मिणी म्हणाली, " देवा, तुमचं प्रेम मजवर अखंड राहो, हाच वर खरं म्हटलं तर हवा; पण आज ' विशेष माग ' असं तुम्ही म्हणतां—तर मागतेंच. आपण आपली संपूर्ण आत्मकथा आम्हां सर्वांना ऐकवावी. या ' गोकुळां 'त आलांत म्हणजे तुम्हांला सर्व प्रसंग नीट आठवतील. तरी रोज आपण इथं या, आणि आपल्या पुण्यपावन कथेचा अमृतवर्षाव आमचेवर करा ! एवढा वर आपण द्यावा म्हणजे त्यांत सर्व कांहीं आलं ! "

रुक्मिणीनें हा वर मागतांच सर्व कृष्ण-स्त्रियाच केवळ नव्हेत तर तेथें बसलेले इतरहि जन प्रसन्न होऊन म्हणाले, " देवी, आमची सर्वांचीच इच्छा तूं या वरानं पूर्ण करणार आहेस असं दिसतं ! "

" भाविक श्रोता मिळाला म्हणजे कथा सांगण्याला मलाहि हौस वाटेल. पण लक्षांत असूं द्या, मी आतां वृद्ध होत चाललों, तेव्हां सर्वच प्रसंग मला आठवतील असं नाहीं. शिवाय कांहीं कांहीं गोष्टी मागं–पुढंहि होतील. मात्र ही कथा मी द्वारकेच्या या गोकुळांतच सांगेन. आपल्या महालांत मला ती सुचणार नाहीं ! "

सर्वांनीं होकार दिल्यावर रुक्मिणी, सत्यभामा इत्यादि स्त्रियांसह श्रीकृष्ण स्वगृहीं नगरांत आला.

## कृष्णकथा बहु गोड !

भगवान् श्रीकृष्ण ' आत्मकथा ' सांगणार, ही वार्ता द्वारकेंत पसरण्यास वेळ लागला नाहीं. कृष्ण-स्त्रियांनीं गोकुळांत सायंकाळीं जाण्याकरितां आपआपले रथ सज्ज करण्याची आपआपल्या सेवकांस आज्ञा दिली. द्वारकेंतील प्रजाजनच केवळ नव्हे, तर वसुदेव–देवकीहि गोकुळांत जाण्याचा बेत करूं लागलीं. तेव्हां कृष्णानें सर्वांना निरोप पाठविला कीं, माझें चरित्र मजपेक्षां

सुरस रीतीनें व्यासमहामुनि व त्यांचे सुपुत्र शुकदेव सांगणार आहेत. त्यांनीं मजकडून चरित्राची माहितीहि घेतली आहे. हे मुनिवर्य प्रतिभासंपन्न कवि असल्यामुळें त्यांचें काव्य पौरवजनांनीं ऐकावें. देवकीला त्यानें स्वतः जाऊन सांगितलें कीं, ' तूं इतक्या लांब येण्याची कशाला तसदी घेतेस? तातनंदांना सर्व कांहीं ठाऊक आहे. मी नवीन असं कांहींएक सांगणार नाहीं. "

कृष्णाचा गोकुळांतील एक सवंगडी बरेच दिवसांपासून द्वारकेंत येऊन राहिला होता. त्याचें नांव पेंद्या. त्याला कृष्णाकडे येऊन बसण्याची केव्हांहि मुभा होती. तो कृष्णाच्या बालपणच्या गोष्टी पुष्कळदां तिखटमीठ लावून कृष्ण-स्त्रियांना सांगायचा. त्यानें या वेळीं कृष्णाला सांगून टाकलें कीं, " कृष्णा, मी रोज तुझ्याबरोबर गौळवाड्यांत येणारच. तूं राजा असलास तर द्वारकेचा,—आमच्या गोकुळचा—नव्हे आमचा तूं आपला खेळगडी; तेव्हां मी कांहीं तुझा हुकूम मानणार नाहीं ! "

यावर कृष्ण म्हणाला, " बाबा, तुझ्यापुढं का माझं कांहीं चालणार आहे? तूं खुशाल तिथं ये, आणि मी जर कांहीं विसरलों तर आठवण करून देत जा, झालं. "

कृष्ण-स्त्रियांना आत्मकथा ऐकण्याचा परवाना मिळतांच त्या सर्व आनंदित झाल्या. रुक्मिणीचा आनंद तर गगनांत मावेना! आपला पति जर गोपालाचा वेष धारण करणार तर मीहि गोकुळची गौळण कां होऊं नये?—असा विचार करून ती गौळणीचा पोषाख बरोबर घेऊन सत्यभामेसह रथांत जाऊन बसली व दारुकास म्हणाली, " आमच्या सत्यभामादेवीला धक्के सहन होत नाहींत हें तुला माहिती आहे ना? तरी रथ मंद गतीनं हांक. "

तेव्हां तो कृष्णाच्या गृहांत रुळलेला दारुक म्हणाला, " देवी, माझे अश्व भगवंतांच्या परीक्षेचे आहेत. ते नेहमीं खांचखळगे टाळूनच धांवत असतात. "

असें बोलणें चालू असतां श्रीकृष्ण मंदिरांतून एकदम बाहेर आला. " सर्व ठीक आहे ना?" असें दारुकाला विचारीत असतां त्यानें रथचक्रांवर नजर टाकली. रथाचा आंस चांचपून पाहिला. खोगीर—लगामांना सहज स्पर्श

मुरलि तुझी गोड, कृष्णा, मुरलि तुझी गोड।



आत्मकथा-कथन

केला, आणि घोड्यांना त्यांच्या नांवांनीं हांका मारल्या. कृष्णाचा शब्द ऐकतांच सुग्रीवानें आपली मान बांकदार करून आनंद प्रकट केला, बलाहकानें आपलें पुच्छ हालविलें, शैब्यानें थयथयाट केला, व मेघपुष्पानें खिंकाळून आपलें मालकावरचें प्रेम प्रकट केलें. अश्वांच्या पाठीवर थाप मारून कृष्ण रथावर चढला. ही त्याची नेहमींचीच संवय. अनवधानामुळें जर एखाद्या वेळीं कृष्णानें त्यांना थोपटलें नाहीं तर ते अश्व पाऊलच पुढें टाकीत नसत. कृष्णाची थाप त्यांना स्फूर्तिप्रद वाटे.

अश्वांची ती फुरफुर, थयथयाट पाहून रुक्मिणीनें कौतुकानें विचारलें, "अश्वांचं मन आकर्षण करून घेण्याची कला तुम्ही कोणाजवळ हो शिकलांत?"

"ही देणगी वंशपरंपरेची आहे. अश्वविद्या आमच्या रक्तांतच आहे. माझे मामा कंसराजे हे उत्तम सारथी होते. ज्याला गाय-गोऱ्यांत रमतां येतं त्याला अश्वविद्या सहज साध्य होते." कृष्णानें सात्त्विक अभिमानानें उत्तर दिलें.

कृष्णाचा रथ द्वारकेमधून जात असतां प्रजाजन त्याला सारखे मुजरे करीत होते. गांवाबाहेर पडल्यावर गाई डुलत डुलत गौळवाड्याकडे जात असतांना या सर्व मंडळींनीं पाहिल्या. त्यांच्या पायांची धूळ आसमंतात् पसरली होती. गोपालांचीं मुलें गायींच्या मागें शेतांतल्या ओल्या शेंगा चावीत चावीत चाललीं होतीं. श्रीकृष्णाचा रथ गोकुळाबाहेर उभा राहिला. नंतर सर्व मंडळी उतरली, आणि नवीनच बांधलेल्या नंदगृहांत गेली. कृष्णानें गोपालाचा वेष धारण केला. मग सर्व मंडळी अंगणांत येऊन बसली. दारुकानें बरोबर आणलेलें काष्ठासन कृष्णापुढें ठेवलें. त्यावर बसून श्रीकृष्ण म्हणाला, "ज्या कोणाला माझी कथा ऐकायची असेल त्यानं मजसमोर येऊन बसावं."

रुक्मिणी गौळणीचा वेष धारण करून भुईवर सहज जाऊन बसली; पण सत्यभामेला तिच्या उंची वस्त्रामुळें जमिनीवर बसणें अवघड गेलें. शिवाय गोकुळांतील गायींच्या शेणमुताचा गंधहि तिला आवडत नाहीं

असें तिनें कपाळाला आठ्या घालून दर्शविलें. गोपालांचीं मुलें हातांत लहान–मोठ्या काठ्या घेऊन शेंगा–गाजरें चावीत प्रथम दूर उभीं राहिलीं होतीं. श्रीकृष्णानें मंद स्मित करून त्यांना जवळ बोलावून घेतलें आणि म्हटलें, "घाबरूं नका. मी आज तुम्हांला गोष्ट सांगणार आहें." मग काय? लहान–मोठीं मुलें कृष्णाजवळ येऊन बसलीं. मोठ्या मुली आपल्या लहान भावंडांना कडेवर घेऊन गोष्ट ऐकण्यास आतुर झाल्या.

कृष्ण म्हणाला, "काय रे बच्चांनो, तुम्हांला गोष्ट लहान हवी कीं मोठी हवी?" मुलांनीं 'मोठी हवी' म्हणून ओरडा केला. "हंसविणारी हवी का रडविणारी हवी?" असें पुन्हा त्यानें विचारलें. तेव्हां मुलें थोडीं गोंधळलीं. कृष्ण म्हणाला, "माझी कथा मोठी आहे; पण मला वेळ थोडा आहे. तेव्हां मी तुम्हांला थोडक्यांत पुष्कळ सांगेन. कधीं हंसवीन, तर कधीं रडवीन. आहे कबूल?" त्या भाबड्या मुलांनीं सारखें 'हो हो' म्हणून होकार दिला. मग कृष्ण म्हणाला, "गड्यांनो, मी तुम्हांला गोष्ट सांगेन; पण मग तुम्ही मला काय द्याल?" मुलांनीं 'शेंगा–बोरं देऊं' असें सांगितलें. यावर कृष्ण म्हणाला, "बरं तर; आतां मी माझ्या कथेस आरंभ करतों. लक्ष द्या हं."

## मुलांची अदलाबदल !

"मुलांनो, माझं नांव तुम्हांला माहिती आहे!"

तेथील गोपालाच्या एका मुलानें म्हटलें, "हो तर! आपलं नांव 'महाराज!'"

श्रीकृष्ण म्हणाला, "नाहीं, चुकलं. पुन्हा सांगा."

दुसरा एक मुलगा म्हणाला, "मी सांगतों – श्रीकृष्णमहाराज!"

तिसरा मागें बसला होता. तो ओरडून म्हणाला, "नाहीं;– गोपालकृष्ण-महाराज!"

यावर कृष्ण हंसून म्हणाला, "हं, आतां कांहींसं बरोबर आलं. माझं नांव कृष्ण असं आहे. तुम्हांला माहिती आहे का—मला कृष्ण कां म्हणतात?"

कोणीच कांहीं बोलेना, तेव्हां कृष्ण म्हणाला, "तुम्ही सांगत नाहीं, तर मीच सांगतों. अरे, कृष्ण म्हणजे काळा. मी काळा आहें ना? म्हणून माझं नांव माझ्या एका आईनं कृष्ण असं ठेवलं. मला किनई दोन आया आहेत. दोन आया कां म्हणून तुम्ही विचाराल,—तर त्याची लांब कथा आहे, आणि ती मजेदार आहे. आतां ती मी तुम्हांला सांगतों.—

"उत्तरेच्या बाजूला मथुरा या नावाचं मोठं शहर आहे. तेथें कंस राजा राज्य करीत असे. त्या राज्यांत माझे वडील एक जहागीरदार होते. कंसाच्या दरबारांत त्यांना मोठा मान होता. एक दिवस कंसराजाच्या मनांत आलं, वसुदेवांना आपली बहीण द्यायची! मग काय उशीर,—लग्न ठरलं, आणि तें मोठ्या थाटानं झालं. आमच्या मामांना समारंभ मोठ्या थाटानं करायची फार हौस; आणि अशा समारंभांत ते स्वतः खूप राबायचे. लग्न पार पडलं, आणि माझ्या मातेला सासरीं नेण्याची वेळ आली. वधू—वरांची वरात मोठ्या थाटानं निघाली. स्वतः मामा त्यांच्या रथाचे सारथी झाले. लोक म्हणूं लागले, 'राजाचं आपल्या बहिणीवर किती हो प्रेम!' कुणी म्हणाले, 'देवकीची दृष्ट काढा, भाग्याची आहे मुलगी.' रथ नगरांतून चालूं लागला. चारण लोक जयशब्द बोलूं लागले, इतक्यांत आकाशांत वीज कडाडली. सर्व लोक वर पाहूं लागले, तों भयंकर आकाशवाणी झाली कीं, "कंसा, तूं ज्या देवकीचा रथ मोठ्या हौसेनें चालवीत आहेस तिच्या पोटीं येणारा आठवा मुलगा तुझा प्राण घेईल. तरी सावध राहा!" कोणत्याहि शुभ कार्यामध्यें विघ्न करण्याची कांहीं लोकांना ह्या लोकीं जशी संवय असते त्याप्रमाणं अंतरिक्षांत कांहीं मत्सरी देवता वसत असतात. त्यांना कोणाचं भलं पाहवत नाहीं. आणि मग त्या शुभ कार्याला विघ्न करावं म्हणून अशुभ असं कांहीं तरी बोलून मनुष्याच्या मनांत भीति उत्पन्न करतात. माझे मामा कंसराजे हे शूर, धाडसी, तसेच मोठे भावनाप्रधान असत. एकदम कोणत्याहि गोष्टीवर विश्वास टाकायचा, कोणीं कांहीं भविष्य सांगितलं—किंवा कोणीं कोणाविरुद्ध चुगली केली, तर त्यांवर त्यांचा एकदम विश्वास बसायचा—"

रुक्मिणीनें मध्येंच विचारलें, "देवा, राजांचा स्वभाव जरा गंभीर हवा, नाहीं का?"

कृष्ण शान्तपणं म्हणाला, "जरा कां? बराच गंभीर हवा, पण तो पुष्कळांचे बाबतींत आढळत नाहीं. पुष्कळ वेळ राज्यपद अधीर पुरुषाकडे जातं. राजलक्ष्मी ही स्त्रियांप्रमाणं शूर, धाडसी पुरुषांना एकदम माळ घालते. त्यांच्यांत इतर गुण आहेत का—हें ती लग्नाचे वेळीं कोठें पहाते? खरं ना महादेवी?"

रुक्मिणीनें हें कृष्णाचें खोंचदार उत्तर ऐकून मान खालीं घातली. कृष्णानें आपली कथा पुढें सुरू केली. तो म्हणाला, "मी काय सांगत होतों,-कीं माझे मामा भविष्यकथनावर एकदम विश्वास ठेवीत. त्याप्रमाणं या आकाशवाणीनं त्यांचे मनांत भीति उत्पन्न केली. त्यांनीं लगेच अश्वाच्या दोऱ्या फेकून दिल्या, आणि मागं वळून आपल्या बहिणीचे केस धरले, व कमरेचं खड्ग उपसून तो मोठ्यानं म्हणाला, 'तुझा आठवा मुलगा मला मारणार होय? मी ती वेळच येऊं देणार नाहीं. तुलाच आतांच्या आतां ठार मारतों म्हणजे झालं!'

माझे वडील-तातवसुदेव त्या वेळीं जरी तरुण होते तरी त्यांचं बोलणं-चालणं नेहमीं गंभीर आणि शान्त वृत्तीचं द्योतक असे. ते या वेळीं रागावले नाहींत. कंसराजाचा हा तापट आणि लहरी स्वभाव त्यांना माहिती होता. क्रोधी माणसाशीं क्रोधानं बोलण्यापासून फायदा होत नाहीं, थंडपणानं बोललं तरच कांहीं फ़ायदा होतो, हें जाणून माझे वडील शान्तपणं म्हणाले, 'राजा, आकाशवाणी काय म्हणते कीं,—हिचा आठवा मुलगा तुझा घात करील! देवकी तुझा घात करील असं कांहीं आकाशवाणीनं सांगितलं नाहीं. तेव्हां तूं हिचा वध उगीच कां करतोस? मला ठाऊक आहे, तुझं हिच्यावर फार प्रेम आहे. राजा, मी तुला वचन देतों कीं, हिला जो जो मुलगा होईल तो तो मी तुझे स्वाधीन करीन; मग तर झालं ना?'

माझ्या मामांचा क्रोध या वचनामुळं थोडा कमी झाला. त्यांना विचार सुचला, आणि मग त्यांनीं माझ्या तातांचं म्हणणं मान्य केलं. त्यांनीं म्हटलं, 'वसुदेवा, पहा बरं, जर तूं आपला मुलगा मला दिला नाहींस तर माझ्याशीं गांठ आहे!'

अशा रीतीनं या शुभलग्नांत प्रथमच मोठं विघ्न उत्पन्न झालं. सगळ्यांच्याच मनाला चुटपूट लागली. मामा त्या दिवसापासून नेहमीं अस्वस्थ असत.

त्यांना दुष्ट स्वप्नं वारंवार पडायचीं. इकडे आईलाहि नेहमीं वाटे कीं, 'मला जीं अपत्यं होतील तीं हा कंस ठार मारल्याशिवाय रहाणार नाहीं. मी पुत्रवंती होऊन निपुत्रिकच मरणार!' असं ती म्हणूं लागली म्हणजे तात तिचं सान्त्वन करीत व म्हणत, "देवकी, देवाची करणी अगाध आहे! तो कोणत्या आणि कशा मार्गानं तुझ्या अपत्यांचं रक्षण करील हें काय सांगावं! आपण त्याच्यावर भरंवसा ठेवूं आणि त्यालाच शरण जाऊं!"

अशा रीतीनं कांहीं दिवस गेले. पुढं कांहीं वर्षांनीं माझ्या मातेस अपत्य होण्याचा संभव उत्पन्न झाला. ही बातमी हेरांकडून कंसराजास कळली. मग त्यानं माझ्या मातापितरांस कारागृहांत टाकलं. तेथें माझ्या मातेला पहिला पुत्र झाला. माझ्या तातांनीं वचन दिल्याप्रमाणं ही बातमी कंसराजाला कळविली. कंस ताबडतोब माझ्या मातेकडे आला. तिच्या हातांतून माझा पहिला भाऊ हिसकून घेऊन तिथं असलेल्या एका शिळेवर त्याला आपटून त्यानं ठार मारलं—आणि आपल्या महालांत चालता झाला!"

हा वृत्तान्त श्रवण करतांच स्त्रियांच्या अंगावर शहारे आले, आणि त्यांचे तोंडांतून 'काय दुष्टपणा हा! तें कोवळं बालक पाहून कंसराजाला दया नाहीं का आली? मातेनं त्या वेळीं हंबरडा कीं हो फोडला असेल!' असे उद्गार निरनिराळ्या स्त्रियांनीं काढले.

कृष्ण म्हणाला, "अजूनहि कठोर प्रसंग तुम्हांला ऐकावे लागतील! 'कृष्णकथा' अशीच भयंकर प्रसंगांनीं भरलेली आहे. तरी आपलीं हृदयं थोडीं कठीण करा. असो. मी काय म्हणत होतों? हां; आठवलं. माझ्या सर्वांत वडील बंधूंना कंसराजानं शिळेवर आपटून मारून टाकलं. यानंतर दोन-चार वर्षांनीं माझ्या मातेस पुत्र व्हावा, आणि कंसानं दर प्रसंगीं त्याला शिळेवर आपटून मारून टाकावं!—असं सहा वेळां झालं. सातवा प्रसंग जवळच आला; पण कांहीं तरी योगायोगानं तो गर्भ पूर्ण दिवस होण्याच्या अगोदर मातेच्या पोटांतून गळून गेला. ती बातमी कंसाला कळली नाहीं. पुढं कांहीं वर्षांनीं मला माझ्या मातेच्या गर्भांत स्थान मिळालं. कंसराजाला वाटलं, हा सातवाच मुलगा आहे. पण खरोखर तो होता आठवा! या वेळीं माझ्या मातेनं तातांना कळवळून

सांगितलं 'कसंहि करून हें अपत्य वांचवा!' तातांनीं तिला म्हटलं, 'त्याच विचारांत मी आहें!'

"तुम्हांला मीं सांगितलंच कीं, तात-वसुदेव मोठे गंभीर विचाराचे होते. त्यांच्या मनाचा ठाव सहसा कोणाला लागायचा नाहीं!"

सत्यभामा मध्येंच म्हणाली, "वडिलांचेच गुण पुत्रांत उतरलेले दिसतात! आम्हांला तरी तुमच्या मनाचा कधीं ठाव लागला आहे का? अघळपघळ पुष्कळ आमच्याशीं बोलतां, पण त्यांतून तुमच्या मनांतलं एवढं इंगित कळेल तर शपथ!"

यावर कृष्णानें सत्यभामेकडे पाहून स्मित केलें, आणि उत्तर देण्याच्या भानगडींत न पडतां कथा चालू ठेवली. तो पुढें म्हणाला, "यमुना नदीच्या पलीकडे जो कंसराजाचा गौळवाडा होता तेथील नंदराजाशीं माझ्या तातांची मैत्री होती. हे दोघे एकमेकांकडे जायचे यायचे. तातनंद करभार द्यायला मथुरेस आले म्हणजे आमच्याचकडे उतरायचे. माता देवकी ज्या वेळीं आठव्यांदां गर्भवती राहिली, त्या वेळींच नंदपत्नी यशोदाहि गर्भवती होती. नंद आणि तातवसुदेव यांनीं कांहीं संगनमत करून ठेवलं!"

तेथें बसलेला एक म्हातारा गोप म्हणाला, "काय केलं संगनमत, देवा?"

कृष्ण म्हणाला, "तेंच तर आतां मी पुढं सांगणार आहें. तुम्हांला माहीतच आहे, कीं श्रावण महिन्यांत पाऊस खूप पडतो. या वर्षाकाळांतल्या अष्टमीच्या रात्रीस माझी माता प्रसूत झाली. त्या वेळीं पुढच्या भीतीनं आपल्या अपत्याचं मुख पाहायच्या अगोदरच ती बेशुद्ध पडली. पूर्वीं संकल्प केल्याप्रमाणं तातांनीं मला एका बांबूच्या पेटाऱ्यांत घातलं व तो पेटारा डोक्यावर घेऊन ते गृहाबाहेर पडले, आणि यमुना नदी ओलांडून गोकुळांत गेले. त्याच वेळीं कर्मधर्मसंयोगानं नंदपत्नी यशोदा ही प्रसूत झाली होती, व तीहि देवकी मातेप्रमाणं बेशुद्ध पडली होती. तातांनीं मला यशोदामातेच्या पुढं ठेवलं; तिला झालेली कन्या त्यांनीं उचलून टोपलींत घातली, आणि परत ते आपल्या बंदिवासाच्या जागेंत आले. त्यांनीं ती कन्या मातेपुढं ठेवली

आणि ते म्हणाले, ‘ ही पहा तुला कन्या झाली आहे.— जागी हो. हिला बहुतकरून कंसराजा मारणार नाहीं !’

लग्नांत वचन दिल्याप्रमाणं याहि वेळीं अपत्यसंभवाची बातमी कंसराजाला माझे तातांनीं कळविली. कंस धांवतच आला. पुत्र नाहीं, कन्या आहे,— असं माझ्या मातापितरांनीं ओरडून ओरडून सांगितलं. तरी राजानं तें मानलं नाहीं. त्या कन्येची तंगडी धरून तो तिला शिळेवर आपटूं लागला,—तोंच ती त्याच्या हातांतून निसटून आकाशांत गेली, आणि मोठ्यानं कडाडून गरजली कीं, ‘ कंसा, मला मारून जिवंत राहण्याचा तुझा बेत फसला ! तुझा शत्रु गोकुळांत आहे ! ’ ”

हा प्रसंग ऐकतांच कृष्ण-स्त्रियांत चलबिचल सुरू झाली. कथा ऐकण्यास आलेल्या गोपी म्हणूं लागल्या, ‘ कोण बरं ही देवता ? जें ऐकावं तें नवलच !’ जांबुवंतीनं विचारलं, ‘ देवा, विचारूं का प्रश्न ? तुमचे तात आणि माता कारागृहांत होते, त्या गृहावर कंसाचे पहारे असतीलच; शिवाय कवाडांना कड्या–कुलुपंहि घातलेलीं असतील, नाहीं का ? मग ते बाहेर कसे पडले ? ’

श्रीकृष्ण न अडखळतां म्हणाला,

“ माझ्या आयुष्यांत असे कांहीं प्रसंग घडले आहेत कीं, त्यांचीं कारणं मलाहि अजून समजलीं नाहींत. माझ्या तातांनीं आपणहोऊन त्या गोष्टी कधीं मला सांगितल्या नाहींत, व मीहि त्या गोष्टींबद्दल त्यांना विचारायला धजलों नाहीं. राजकारणांतील कांहीं गोष्टी अशा असतात कीं, त्या आपल्या चितेंतच जळून जायला हव्यात. प्रसंग संपला तरीहि त्याचा स्फोट राजकारणी पुरुष कधीं करीत नाहींत. माझे तात मोठे धोरणी म्हणूनच ते मोठ्या बिकट प्रसंगांतून निभावले. ”

सत्यभामा यावर म्हणाली, “ नका सांगूं तुमचीं राजकारणांतील गुपितं; परंतु श्रावण महिन्यांत नदीला पूर आला असेल, नाहीं का ? मग त्या पुरांतून तुमच्या तातांनीं डोक्यावर पेटारा घेऊन तुम्हांला कसं सुरक्षित नेलं ? यांत तर कांहीं राजकारण नाहीं ना ? ”

कृष्ण म्हणाला, “ यांत कसलं राजकारण ! यांत होतं देवकारण ! पुष्कळ वेळां अतर्क्य शक्ति जीवनांतील कठीण प्रसंगीं सात्त्विक मनुष्याला साहाय्य

देत असतात ! मात्र ते प्रसंग आणीबाणीचे असावे लागतात. वसुदेवतात या प्रसंगासंबंधानं एकदां म्हणाले कीं, 'मी यमुनेंतून कसा तरून गेलों व परत कसा आलों हें मलादेखील कळलं नाहीं. कंसाचे हेर मला पकडतील का या धास्तींत मी सारखा होतों. मी काय करीत होतों हें मलाच समजत नव्हतं. मीं कांहीं केलं असं म्हणण्यापेक्षां माझ्या हातून तें झालं, कोणत्या तरी शक्तीनं तें घडवून आणलं हेंच खरं !'

"देवी, तातांचे हे बोल मला नेहमीं प्रत्ययास आले आहेत. माझ्याहि आयुष्यांत पुष्कळ वेळां अतर्क्य शक्तीनंच माझा हात धरून अघटित घटना घडवून आणल्या आहेत. असो. आपण यासंबंधानं पुन्हां बोलूं."

यानंतर कृष्ण आत्मकथेकडे वळला व म्हणाला, "यानंतर माझ्या मातेस अपत्य झालं नाहीं. तातनंदांनीं बांबूच्या पेटाऱ्यांत मला घालून नंदपत्नीच्या पुढं ठेवून माझं रक्षण केलं. ही अशी माझ्या जन्माची कथा आहे. याच वेळीं दुसरा एक प्रसंग घडला. ज्या प्रसंगानं मला जन्माचा जोडीदार मिळाला तो प्रसंग सांगून आपण आज थांबूं या.

"माझ्या तातांना रोहिणी नांवाची दुसरी एक भार्या होती. तिलाहि देवकीमातेबरोबरच गर्भ राहिला होता. हिच्या अपत्याचाहि कंसराजा कदाचित् प्राण घेईल म्हणून तात-वसुदेवांनीं रोहिणीमातेला पुष्कळ दिवसांपासून गोकुळांत आणून ठेवलं होतं. तिलाहि माझे अगोदर एक सुंदर पुत्र झाला. तो रूपानं जसा सुंदर तसा शरीरानं जन्मापासूनच सुदृढ होता. शिवाय त्याचा वर्णहि गोरा होता; म्हणून त्याचं नांव बलराम असं ठेवलं होतं. त्याच्या मानानं मी श्यामवर्णी, म्हणून मला लोक आणि यशोदामाता 'कृष्ण' म्हणूं लागलीं. मी वसुदेव-देवकींचा पुत्र आहें हें मला कित्येक वर्षं माहिती नव्हतं. नंद-यशोदेलाच मी पिता-माता म्हणून समजत असें. तींहि मला आपलं अपत्य समजून कल्पनातीत प्रेम करीत. माझे बंधु बलरामदादा आणि मी एकत्रच वाढलों, खेळलों, ही हकीकत यथावकाश पुढं येईल."

इतका भाग संपवून कृष्ण नगरांत जाण्यास निघाला.

## २

# अभिमन्यूच्या शिक्षणाची जबाबदारी

आज सकाळीं एक हेर श्रीकृष्णाकडे पांडवांचें पत्र घेऊन आला. त्या पत्रांत धर्मानें लिहिलें होतें कीं, आम्हीं द्यूतांत राज्य हरविलें, व बारा वर्षांचा वनवास पतकरला आहे. आम्हांबरोबर द्रौपदी आहे. अभिमन्यूच्या शिक्षणाची या वनवासांत आबाळ होऊं नये म्हणून सुभद्रेसह त्याला तुमचेकडे पाठवीत आहोंत, वगैरे वगैरे.

हें पत्र वाचून झाल्यावर श्रीकृष्णानें हेराबरोबर उलट निरोप धाडला कीं, ‘ अभिमन्यूबद्दल निश्चिंत असा. ’ नंतर त्यानें रुक्मिणीस बोलावून घेतलें व पांडवांच्या पत्राचा आशय तिला सांगून म्हटलें, “ पांडवांनीं राज्य गमावल्यामुळं सुभद्रेच्या मनाची स्थिति विशेष नाजुक झालेली असणार. चुकून जरी एखादा शब्द तुमच्या तोंडांतून वावगा बाहेर पडला तर तो तिला या वेळीं विशेष लागेल; पांडव वनवासांतून परत येईपर्यंत सुभद्रा व तिचा पुत्र यांना आपल्या इथं स्वतःच्या घराइतकाच मोकळेपणा वाटला पाहिजे. सुभद्रेच्या डोळ्यांत पुढील कांहीं वर्षांत एकदांहि अश्रु उभा राहणार नाहीं अशी तजवीज आपल्याला करायला हवी, नाहीं का ? ”

यावर रुक्मिणी म्हणाली, “ बरं झालं, सुभद्रावन्सं इकडे येत आहेत. नाहीं तर अभिमन्यूच्या शिक्षणाची आबाळ झाली असती ! आपण स्वतः त्याच्या शिक्षणाकडे पाहणार ना ? का कोणावर संकट आलं कीं आपली ही जबाबदारी टाकून धांवत सुटणार ? ” रुक्मिणीनें टोला मारला.

यावर कृष्ण भ्रुकुटि वक्र करून म्हणाला, “ आम्ही आपल्या जबाबदाऱ्या कधीं टाकून देतों ? पांडवांनीं बोलाविल्याबरोबर मी त्यांच्याकडे अनेकदां जातों हें खरं; पण त्यामुळं प्रद्युम्नाच्या व सांबाच्या शिक्षणांत कांहीं कमी पडलं का ? वृष्णीकुलाला भूषण होतील असे हे कुमार आज तयार झाले नाहींत का ? तूं मला स्थितप्रज्ञ म्हणून चिडवतेस; पण तूं लक्षांत घेत

नाहींस कीं, मी स्वधर्माकडे कधींच दुर्लक्ष करीत नाहीं. परवां जांबुवंतीला बरं नव्हतं, तेव्हां वैद्यराजांना तिजकडे पाठवून मी स्वस्थ बसलों नाहीं. तिचे उपचारांत मीं स्वतः लक्ष घातलं होतं ! — भोजनोत्तर घ्यायचं औषध ती भोजनापूर्वी घेत होती, हें वैद्याचे ध्यानांत कोणीं आणून दिलं? अभिमन्यूच्या शिक्षणाची तजवीज मी जातीनं करणार आहें. सामान्य विद्या शिकवायला शिक्षक ठेवून देऊं व विशेष अस्त्रं मी शिकवीन. अभिमन्यु अर्जुनाप्रमाणं सूक्ष्म बुद्धीचा व प्रखर प्रज्ञेचा बालक आहे असं ऐकतों. आणि आम्ही पडलों गुराखी ! तेव्हां आमचं शिक्षण – सुभद्रेस राहिलं, पण तुझ्या तरी पसंतीस येईल का ? ”

रुक्मिणीनें यावर कांहींच उत्तर दिलें नाहीं. कृष्णाला नर्म भाषणें करून रुक्मिणीस चिडवायची संवय होती; पण सत्यभामेप्रमाणें ती सहसा एवढ्या-तेवढ्या शब्दावरून रागावत नसे.

नेहमींप्रमाणें सायंकाळीं कृष्ण, सत्यभामा, रुक्मिणी इत्यादि स्त्रियांबरोबर रथांत बसून गोकुळांत आला. त्याचा बालपणचा सवंगडी पेंद्या, कृष्णप्रेमानें द्वारकेंत येऊन बरेच दिवस राहिला होता. त्याची लहर लागेल त्याप्रमाणें कोणा तरी कृष्ण-पत्नीच्या घरीं तो जेवावयास जावयाचा. कोठेंहि हिंडला-फिरला तरी रात्रीं मात्र कृष्णाकडेच त्याचा मुक्काम असे. कृष्णस्त्रिया त्याला गोकुळांतल्या गंमती विचारीत; पण एकहि प्रसंग सुसंगत असा त्याला सांगतां यायचा नाहीं. जेवतांना जर का वाढप्यानें दहीं, दूध चुकून कमी वाढलें, तर श्रीकृष्णाच्या लाडानें अधिकच मिजासखोर बनलेला पेंद्या, जेवणाचें ताट एकदम लोटून देई आणि उठून जाई ! कृष्णाला ही गोष्ट कळल्यावर मग तो त्याची समजूत करून जेवायला बसवून घेई.

आज पेंद्याला काय लहर आली कोण जाणे ! तो सर्वांच्या पुढेंच थोडा लवकर गोकुळांत गेला, आणि तेथील गोपालांना दटावून म्हणाला, “ हें पहा, गोष्ट चालू असतां कोणीं रडायचं नाहीं, हंसायचं नाहीं, बरं का ! ”

ठरलेल्या वेळीं कृष्ण आपल्या मंडळीसह गौळवाड्यात आला, आणि त्यानें आपल्या कथेस आरंभ केला.—

“ मनुष्याच्या जीवनांत सुखदुःखांचे प्रसंग येणारच. त्या सर्वांना हंसत-मुखानं तोंड देणं यांत मौज आहे. चटका बसला म्हणजे हंसावं, असं मी

म्हणत नाहीं. जीभ भाजली म्हणजे खुशाल ओरडावं, रडावं पाहिजे तर; पण प्रसंग संपल्यावर मागचीं दुःखं आठवून आठवून तीं उगाळींत बसूं नये. तात वसुदेवांना सुखदुःखांच्या ऊर्मि पचविण्याची कला चांगली साधली आहे. आपल्या पोटचे मुलगे कंसराजा एकामागून एक शिळेवर आपटून मारीत असतां ते आपल्या वृत्ति आवरून धरीत, आणि राजा परत गेल्यावर माझ्या मातेचं सान्त्वन करीत. सान्त्वन करण्यांतहि त्यांची खुबी असे. प्रथम ते तिच्या भावनेंत शिरून कंसावर खूप राग काढीत. कधीं कधीं शिव्या-शापही देत, आणि नंतर माझ्या मातेला विचारीत, ‘ या क्रूर अधमाला मारून टाकूं का एकदांचा ? त्याचेविरुद्ध पुष्कळ लोक आहेत. त्यांची मदत घेऊन त्याला मारणं मला कठीण नाहीं. ’ मग माझी माता भानावर येऊन म्हणे, ‘ नका तुमचा जीव धोक्यांत घालूं. शिवाय कांहीं असलं तरी तो माझा भाऊ आहे. त्याचं डोकं आज शुद्धीवर नाहीं, देवाच्या कृपेनं होतील आपणांला पुत्र ! —”

कथा चालू असतां ती ऐकण्यास आलेला एक गोपाळ मध्येंच कृष्णास म्हणाला, “ तुम्ही मथुरेचे लोक बरेच थंड डोक्याचे दिसतां. आम्हीं इकडचे लोक असे थंड नाहीं. आमच्या पोरांना कोणीं नुसता हात लावला तर आम्ही त्याला खायला धांवतों ! ”

यानंतर कृष्ण म्हणाला, “ तात वसुदेवांनीं मला गोकुळांत नेऊन कसं ठेवलं हें परवां मीं तुम्हांला सांगितलंच आहे. यशोदामाता पुष्कळदां आपल्या मैत्रिणींना सांगे कीं, मी लहानपणीं पुष्कळ खोडकर होतों. गाई-बैलांच्या, शेळया-मेंढ्यांच्या मागं लागून त्यांच्या शेंपट्या ओढायचा, लहान लहान मुलं जमवून शिंक्यांवरील दहीं-दूध खायचा, जरा मोठा झाल्यावर मी घरांतलंच दहीं-दूध चोरीत असें असं नाहीं, तर आमची गोपालांची फौज गोपी पाणी आणायला नदीवर गेल्या म्हणजे त्यांच्या घरांत शिरायची, शिंक्यांवरील दहीं-दूध गटागट पिऊन पुन्हां रिकामं मडकं जिथल्या तिथं ठेवून पळून जायची ! कधीं कधीं आम्ही गवळणींच्या हातांत सांपडत असूं, आणि मग गयावया करून ‘ पुन्हां नाहीं करायचं ’ असं म्हटलं कीं त्या भोळ्या गोपी आम्हांला सोडून देत. कधीं कधीं मला धरून यशोदामातेकडे आणीत व

म्हणत, 'हा पहा तुमचा लबाड मुलगा,—याला कांहीं रीत लावा!' मग यशोदामाता म्हणायची, 'भारी खोडकर झालाय; तुम्हीच त्याला पकडून ठेवा अन् द्या चांगला मार!' पण मला मार देणं कोणालाच साधलं नाहीं. एक तर मी नंदराजाचा मुलगा, आणि दुसरी गोष्ट—त्या गोपी उदार हृदयाच्या असत. 'बालक आहे, खाल्लं असेल–' असं म्हणून मजवरचा राग त्या चटकन् विसरून जात. आम्ही यमुनेच्या वाळवंटांत चेंडू-दांडू खेळायचे, खूप मस्ती करायचे—"

पेंद्या मध्येंच म्हणाला, "हा कृष्ण आम्हांला आटपायचा नाहीं. मग आम्ही तीन-चार जणं मिळून त्याला पकडून पाडीत असूं, आणि त्याच्या छातीवर बसत असूं; पण तो कधीं चिडायचा नाहीं. आम्हीं त्याला मारलं तर हंसून म्हणे, 'माझं अंग दुखत होतंच. तुम्हीं चेपून दिलंत, बरं झालं!' विटीदांडू खेळतांना कृष्णाचा टोला कधीं चुकायचा नाहीं. त्यानं टोला हाणला म्हणजे विटी कुठल्या कुठं जाऊन पडायची, आणि मग आम्हांला ती शोधून काढतांना पुरे वाट होई! मला किनई चांगलं कधीं खेळतां येत नव्हतं. त्यामुळं इतर मुलं मला खेळायला घेत नसत. मग मी रडत बसायचा. मग कृष्ण मजजवळ येई व म्हणे, 'मी खेळतों तुझ्याबरोबर!' कृष्ण मला टाकून कधीं खेळला नाहीं.—कृष्णा, सांग ना तूं! गप्प कां बसलास?"

कृष्ण पेंद्याकडे पाहून हंसून म्हणाला, "अरे दोस्त, मला वाटलं तूंच आतां सर्व कथा सांगशील—"

पेंद्यानें डोकें खाजवीत म्हटलें, 'अरे कृष्णा, माझं डोकं तुझ्यासारखं कुठं चलाख आहे? सर्व कांहीं मला आठवत नाहीं. जर डोकं चांगलं असतं तर मी तुझ्यासारखा राजा नसतों का झालों? आई म्हणे, 'पेंद्या, तुझा भोळा भाव सिद्धीस जावो!'

कृष्णानें कथा चालू केली, "माझ्या खोड्या कधीं कधीं विशेष उपद्रवी असत. एखादी गवळण जर आमच्या टोळीच्या मागं लागली तर आम्ही तिची एखाद्या दिवशीं फजिती करीत असूं. पाण्यानं भरलेला मातीचा घडा डोक्यावर घेऊन ती मैत्रिणींशीं गप्पा मारीत घरीं येऊं लागली म्हणजे आम्ही त्या घड्याला झाडाआड लपून नेम धरून दगड मारीत असूं. दगडानं तो घडा

फुटला,-आणि ती ओली चिंब झाली-म्हणजे मग आम्ही खो खो हंसून तेथून पळ काढीत असूं. पण या आमच्या खोड्या आम्ही जसजसे मोठे झालों तसतशा आपोआप थांबल्या."

"मला आठवतं, कीं गांवांत एकदां लांडगे आल्याची आवई उठली. लोक बोलूं लागले कीं, 'लांडग्यांचे कळपच्या कळप गोकुळांतील चरायला गेलेल्या शेळया-मेंढ्यांवर आणि गाई-बैलांवर तुटून पडतात.' गांवांतले लोक पुष्कळदां लांडग्यांना मारण्याकरितां काठ्या घेऊन जायचे; पण लांडगे त्यांना दाद द्यायचे नाहींत. गोकुळांत जनावरं पुष्कळ होतीं. त्यामुळं दूरदूरचे लांडगे, तेथें येऊं लागले. मग नंदतातांनीं एक सभा भरविली. लोक काय बोलले तें सर्व कांहीं मला आठवत नाहीं. आम्ही दूर उभे राहून त्यांचीं बोलणीं ऐकत होतों. दुसऱ्या दिवशीं पहाटेला यशोदामातेनें मला सांगितलें, 'चला, आपल्याला आतां दुसऱ्या गांवीं लांबवर जायचं आहे. न्याहारी करून घ्या.' बाहेरगांवीं जायचं, तेवढाच आनंद आम्हांला झाला. लवकरच सबंध गांव जायला निघाला. घरांतलं सर्व सामान लोकांनीं आपआपल्यां गाड्यांवर भरलं. कांहीं बैलांवर लादलं. पांच-सातशें लोक पुरुष, बायका, मुलं, गुरं-ढोरं असे आम्ही एकदमच निघालों. मोठी मौज दिसत होती. नंदतात आणखी दोन-चार प्रमुख मंडळी मार्ग दाखवायला पुढं चालत होती. दोनप्रहरीं आम्ही नव्या जागेंत गेलों. तेथें पाण्याची चंगळ होती. गवत मुबलक होतं, आणि जवळच एक टेंकडी होती. नंदतातांनीं गोपांना पाहिजे तेवढी जमीन आंखून घ्यायला सांगितली. गोपांचीं घरं उभारायला वेळच लागला नाहीं. संध्याकाळपर्यंत तीं उभींहि राहिलीं. गुरं बांधण्याकरितां खुंट ठोकले गेले. जातीं जमिनींत पुरलीं गेलीं, आणि सायंकाळीं प्रत्येक झोंपडींत ताजा स्वयंपाक गोपांना खायला मिळाला. दुसऱ्या दिवसांपासून आम्हीं आमच्या गुरांना चरायला नेत असतां नवा प्रदेश खूप पाहून घेतला; तो आम्हांला फार आवडला. कारण तेथें डुंबायला खूप पाणी होतं. नदींत एक खोल डोह होता, त्यांत भराभर उड्या मारण्याची सोय होती. रानटी फळांचीं झाडंहि कांहीं कमी नव्हतीं. तेव्हां नव्या जागेंत आम्ही खूप रमलों. आम्हांला आतां दहीं-दुधाच्या चोऱ्यांपेक्षां दंगा-मस्तीचा नाद अधिक लागला. गाई-बैलांना चरायला सोडलं कीं मग आम्हांला

उद्योग काय होता? झाडांवरून उड्या माराव्या, पाण्यांत यथेच्छ डुंबावं, मस्ती-कुस्ती करावी. माझ्यापेक्षां दादा अधिक उंच आणि हाडापेरानं फार बळकट. लहान लहान झाडं ते सहज झटक्यासरशीं उपटून घेत, आणि आम्हांला मारायला धांवत. आम्ही त्यांना फार भीत असूं. एक दिवस ते आपल्या सौंगड्यांना म्हणाले, 'अरे, आपण नुसता दंगा करतों हें बरं नव्हे. शेतकऱ्याप्रमाणं आपण नांगर धरून जमीन मोकळी करूं या, आणि धान्य पिकवूं या. मला शेतीपेक्षां गाई-बैलांची सेवाच अधिक आवडे. मीं चांगले चांगले बैल तयार करावे आणि दादांना द्यावे. आम्ही नंदाचे मुलगे-आतां दंगा करीत नाहीं, कांहीं तरी काम करतों, हें पाहून गोकुळांतील लोक आमच्यावर फार खुष झाले. त्यांतल्या त्यांत गोपींची मर्जी आमच्यावर फार. कारण आम्हां दोघांना गाणीं म्हणतां येत असत. आमच्या दादांचा आवाज मोठा असला तरी मधुर असे. मला गातां येत असे; पण पांवा वाजवून दादांना साथ देण्यांत मला मजा वाटे. कधीं कधीं सायंकाळीं किंवा सकाळीं एखाद्या झाडाखालीं बसून मी पांवा वाजवूं लागलों कीं गोपी आपला कामधंदा टाकून तो पांवा ऐकायला धांवत, आणि मग त्यांच्या सासवा त्यांची अशी खरडपट्टी काढीत कीं कांहीं विचारूं नका!"

पेंद्या मध्येंच म्हणाला, "कृष्णा, आणखी गंमत नाहीं सांगितलीस. ती अक्कामावशी एक दिवस लाटणंच घेऊन सुनेला शोधून काढायला आली. तिच्या मनांत पांवा ऐकत असलेल्या सुनेला चांगलं मारावं असं होतं; पण गंमत काय झाली? ती स्वतःच पांवा ऐकण्यांत गुंग होऊन गेली नि काय? सुनेला मारायचं अगदींच विसरली. मग आम्ही तिच्या मागं लागलों आणि म्हणूं लागलों—

सुनेला मारायला मावशी धांवली।
पांवा ऐकण्यांत गुंगून गेली॥

झालं! तें गाणं गांवभर पसरलं! तिला बाया विचारूं लागल्या, 'काय हो मावशी, हीं पोरं काय म्हणतात?' तेव्हां ती हसून म्हणे, 'पोरं बोलतात तें अगदीं खरं. मी गेलें सुनेला मारायला, पण तिथंच रमून गेलें पांव्याच्या नादांत. हा कृष्ण आम्हांला कामधंदा सुचूं देत नाहीं! एक दिवस मीं अक्का-

मावशींचा पदर धरून म्हटलं, 'मावशी, पांवा काय ऐकतां? घरीं भाकरी करायच्या राहिल्या ना? मग ती खट्याळ मावशी मला थप्पड मारून म्हणे, 'थांब रे मेल्या, ऐकूं दे मला ती मुरली!' या गवळणींत राधा नांवाची एक गवळण होती. तिला मुरली ऐकण्याचं तर फारच वेड! आम्ही तिला 'येडी राधा' म्हणत असूं! हं कृष्णा! चालूं दे तुझी गोष्ट पुढं."

कृष्ण—अशा रीतीनं आमचा काळ जात असतां आमच्या नव्या गोकुळावर एकामागून एक संकटं आलीं. रानांत राहण्यांत मोकळ्या हवेचं मोठं सौख्य असतं. त्यामुळं साध्या अन्नालाहि रुचि फार; पण त्याबरोबर तेथें रानटी जनावरांचाहि उपद्रव असतो. एक दिवस काय झालं, कोठूनसा एक भला मोठा बैल जंगलांतून आमच्या वृंदावनांत आला. आम्ही लहान-मोठीं मुलं खेळत होतों त्यांच्या अंगावर धांवला. कांहीं मुलांना तर त्यानं शिंगावर घेऊन फेकून दिलं. त्याला पाहून आमच्या गाई पळूं लागल्या. त्याच्या अंगांत मस्ती फार होती. हिरवं गवत खाऊन तो माजला होता. आपल्या अंगची रग जिरविण्याकरितां तो आम्हीं लावलेल्या झाडांनाहि धडका देऊन पाडूं लागला. एका म्हाताऱ्या गवळणीला त्यानं ढुसणी देऊन खालीं पाडलं. ही बातमी आम्हांला लागतांच आम्ही लहानमोठ्या काठ्या हातांत घेऊन जमा झालों. मग तो बैल इतरांना सोडून आमच्याच टोळक्यावर धांवला. आम्हीं त्याला खूप बडवून ठार मारलं!

पेंद्या—आम्हीं सर्वांनीं कसलं रे?-आम्ही तर भिऊन पळत होतों. इतक्यांत आमचा हा दोस्त एकदम पुढं झाला. त्यानं त्या मस्त बैलाचीं शिंगं धरलीं, आणि त्याला रेटीत मागं नेलं. मग आम्हांलाहि अवसान आलं. आम्हीं काठ्यांनीं त्याचे पायांवर मारलं. कृष्णानं त्याचं शिंगच उपटलं. अशा रीतीनं तो मस्त बैल रक्त ओकायला लागून मरून पडला!

रुक्मिणी—एवढी का शक्ति होती भाउजी, यांच्या अंगांत?

कृष्ण—देवी, त्या वेळेला मी तरुण होतों. संसाराची काळजी नव्हती. त्या मस्त बैलासारखे आम्हीहि वृंदावनाच्या मोकळ्या जागेंत खाऊन-पिऊन मस्त बनलों होतों! यशोदामातेनं आम्हांला हात राखून वाढलं

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ....
मराठी ग्रंथ संग्रहालय
९३५९३
ता. क्र. १४.५.५२



नाहीं;–पण आतां त्याचं काय? आतां प्रपंच पडलाय ना अंगावर! त्या वेळीं नंदतात म्हणायचे, 'कृष्णा, मोठेपणीं तूं राजा झालीस तरीहि असं खायला पुन्हां मिळायचं नाहीं. बायका ह्या,–गांठचं सोनं एक वेळ देतील, पण दुधाची साय मोकळ्या हातानं कधीं नवऱ्याला वाढायच्या नाहींत!'

सत्यभामा— कांहीं तरी बोलतां, झालं!

कृष्ण— मी नाहीं म्हणत असं! मला असं म्हणून कसं भागेल? तुमच्या-बरोबर वागायचं आहे ना मला! माझं मत तसं नाहीं! आमचे नंद-तात म्हणत होते तें मीं आपलं सांगितलं, झालं. असो. एक दिवस रान–गाढवांनींच आमच्या वृंदावनाला सतावून सोडलं. तीं गाढवं आमच्या गाईंना चावायला धांवायचीं, आणि त्यांना मारायला गेलं कीं चटकन् तोंड फिरवून लाथा मारायला सुरुवात करीत. शेवटीं आम्ही सर्व तरुण मंडळी एकत्र झालों आणि त्यांना पिटाळून लावलं. हा प्रसंग पुढच्या प्रसंगाच्या मानानं कठीण नव्हता.

आमच्या यमुनेच्या डोहांत सुसरी व चावरे मासे ज्याप्रमाणं होते त्या-प्रमाणं तिथं पाण्याबरोबर लहान–मोठे सापहि वाहत येत. खडकांत जागा सांपडली कीं घर करून राहात, आणि संधि साधून लहान–मोठ्या बेडकांचा चट्टामट्टा करीत. यामुळं या डोहांत उड्या मारून पोहणं आम्हांला कठीण जाऊं लागलं. एकदां एक भला मोठा काळाकुळकुळीत साप नदीच्या पाण्याबरोबर वाहात येऊन डोहांत राहिला होता. मुलांनीं दगड मारून त्याला हुसकण्याचा प्रयत्न केला; पण कांहीं केल्या तो तेथून निघेच ना. कारण त्या डोहांतले बेडूक त्याला खायला मिळत. शिवाय रात्र पडली म्हणजे तो डोहाच्या बाहेर येई, आणि शेतांतले उंदीरहि पकडून खाई. डोहाची जागा पाणी भरण्यास चांगली होती; पण ह्या काळ्या कालियाच्या भीतीमुळं गोपी पाणी आणण्यास धजत नसत. त्यांना दुरून पाणी आणावं लागे, आणि मग त्रास होई.

ह्या कालियाचा कसा बंदोबस्त करायचा ह्याची चर्चा गांवांत चालत असे. आम्हीं तरुण मंडळींनीं याबद्दल विचार केला. बळरामदादा कुठंसे बाहेर गेले होते. मीं म्हटलं, आपण सर्व जण त्या डोहांत एकदम उड्या मारूं

आणि कालियाला पकडून बाहेर आणूं! पण कालियाची धास्ती लोकांनीं इतकी घेतली होती कीं, या कामांत कुणी जोडीदारच मला मिळेना. यशोदा-मातेनं मला बजावून सांगितलं होतं कीं, 'खबरदार कृष्णा—जर त्या दुष्ट कालियाच्या वाटेस जाशील तर! देवाला आहे आपली काळजी! तोच त्याला नाहींसा करील!'

मग मीं विचार केला कीं, हें काम आपण एकट्यानंच उरकावं. धाडस केल्याशिवाय लोकांचं संकट तरी दूर कसं होणार? आपण इतके दिवस त्यांचं दूध–लोणी यथेच्छ खाल्लं, त्याची फेड करण्याची ही वेळ आहे. कालियावर हल्ला करण्यापूर्वी मी लहान–मोठे साप धरून मारूं लागलों, तेव्हां मला साप अंगावर येतो कसा, व शेपटीचा तडाखा देतो कसा, डोकं धरायला गेलं तर तो आपल्या मनगटाला घट्ट विळखा घालतो कसा, वगैरे सापांच्या प्रवृत्ती मीं पाहून घेतल्या, आणि नंतर एक दिवस दुपारीं माझे मित्र झाडाखालीं भाकर खाऊन झोंपले असतां मी एकटाच डोहावर गेलों. तेथें एक मोठं कदंबाचं झाड होतं. त्या झाडावर चढलों. नंतर पाण्याकडे झुकलेल्या फांदीवर तोल सावरीत जाऊन उभा राहिलों. दंड जोरानं थोपटला. मातापितरांचं स्मरण करून 'कालिया, चल ये बाहेर!' अशी आरोळी ठोकून डोहांत धाडकन् उडी मारली! त्याबरोबर पाणी खूप उसळलं, आणि पाण्यांत राहिलेला कालिया एकदम वर आला. तो सावध नव्हता. मी सावध होतों, आणि काय करायचं हें ठरविलं. होतं. मीं एकदम त्याचे अंगावर जाऊन त्याची मुंडी घट्ट पकडली, त्याबरोबर त्यानं मला विळखा घातला. तेव्हां मी एकीकडे अंग फुगवीत गेलों, अन् दुसरीकडे त्याची मुंडी भयंकर आवळून त्याला गुदमरून टाकलं, अन् तसाच एका मोठ्या दगडाकडे जाऊन त्यावर ती जोरानं आपटली; त्याबरोबर त्याचा विळखा सुटला. तो केविलवाणा झाला! मीहि थकलों होतों; म्हणून मीं त्याला क्षणभर सोडून अन् पुन्हां त्याची फणी धरून त्याला पाण्यांत बुडविलें. शेवटीं तो गयावया करूं लागला व म्हणाला, 'मला वांचव.' मीं त्याला म्हटलं, 'तूं जर हा डोह सोडून दूर जाशील, आणि पुन्हां कधीं इकडे फिरकणार नाहींस तर मी तुला सोडतों!' त्यानं अर्थात् माझं म्हणणं कबूल केलं; तेथून तो डोहांतून कसाबसा बाहेर गेला, आणि पुन्हां म्हणून वृंदावनाच्या आसपास फिरकला नाहीं!

हा प्रकार चालला असतां माझे सवंगडी माझ्या उडीचा आवाज ऐकून माझा शोध करीत डोहावर आले. कालियाशीं माझी झटापट चालली होती. ती पाहून ते घाबरले! त्यांनीं आरोळ्या देऊन तेथें सगळा गांव जमा केला. मजवर साऱ्या गोकुळचं मोठं प्रेम ! माझीं मातापितरंच केवळ नव्हे, तर गोप-गोपी कालिया कृष्णाला खातो म्हणून रडूं लागल्या! इतक्यांत दादाहि तेथें आले. त्या वेळीं मी कालियाला घालवून डोहाबाहेर आलें होतों! दादा प्रेमानं रागावून ओरडले, 'कृष्णा, काय हा वेडेपणा! आपण नेहमीं एकदम लढायचे, आणि आज तूं एकटाच कां कालियाला मारायला गेलास? मीं त्याचीं खांडोळीं करून टाकलीं असतीं!' मीं म्हटलं, 'दादा, मला कालियाला मारायचं नव्हतं. त्याला डोहांतून हांकून द्यायचा होता. साप शेताचं रक्षण करतो, त्याला मारूं नये. साप नसते तर उंदरांनीं शेतं खाऊन कुरतडून टाकलीं असतीं असं तुम्हीच आम्हांला नेहमीं सांगत होतां ना!' मीं असं म्हटल्या-बरोबर दादा खुष झाले, आणि त्यांनीं माझ्या पाठीवर शाबासकी देण्या-करितां जोरानं थाप मारली. केवढी जबरदस्त थाप ती! अजून माझी पाठ त्यानं दुखते आहे!" असें म्हणून कृष्णानें पाठ दुखत असल्याचा आविर्भाव केला. क्षणभरानें तो म्हणाला, "यानंतर यशोदामातेनं माझ्या या धाडसा-बद्दल प्रेमानं माझी खूप हजेरी घेतली. म्हाताऱ्या गवळणींनीं माझे अंगावर बोटं मोडलीं, आणि मला दीर्घायुष्य चिंतिलं."

पेंद्या—आम्ही सर्व सवंगड्यांनीं कृष्णाला खांद्यावर घेऊन त्याचा जयजयकार करीत घरीं आणला! कृष्णा, हें सांगायला तूं कसा रे विसरतोस?

कृष्ण—"या वेळीं प्रत्येक गोपानं मला आपल्या घरीं जेवायचं निमंत्रण दिलं. सगळ्यांच्या घरीं मी एका वेळींच कसा जाणार? मीं त्यांना म्हटलं कीं, 'तुम्हांला जो चांगला पदार्थ करतां येत असेल तो करा. मी खायला येईन.' मग सायंकाळीं त्यांच्याकडे गेलों. थाळ्यांत प्रत्येकाच्या घरचा पदार्थ घेतला अन् सगळ्यांना सांगितलं,–'आमच्या अंगणांत जेवायला या.' मग ते सर्व पदार्थ एकत्र करून यशोदामातेनं माझ्या सांगण्यावरून सर्व गोप-गोपींना थोडे थोडे दिले. मींहि यथेच्छ खाल्लं. मीं आजपर्यंत आमच्या महालांत

पुष्कळ पक्वान्नं खाल्लीं; पण आमच्या त्या वृंदावनांतल्या गोपाळकाल्याची गोडी मला पुन्हां म्हणून चाखायला मिळाली नाहीं.

सत्यभामा—जातां जातां आम्हांला दोन कोपरखळ्या दिल्याशिवाय तुम्हांला बरंच वाटत नाहीं का हो?

यानंतर सर्व मंडळी हंसत-खेळत उठली, आणि रथांत बसून जातांना रुक्मिणी सत्यभामेस म्हणाली, "देवी, आपण करूं या यांच्याकरितां असाच गोपाळकाला!"

# ३

## श्रीकृष्णाचा दरबार

आज सकाळीं प्रातःकाळची गांवांत फेरी करून श्रीकृष्ण आपल्या दरबारांत येऊन बसल्यावर त्याला भेटण्याकरितां अर्जदार मंडळी पलीकडच्या दालनांत बसली होती. कृष्णाचे वडील वसुदेवमहाराज हे वृद्ध झाल्यामुळं ते नित्याच्या कारभारांत लक्ष घालीत नसत. सर्व राज्यकारभाराची व्यवस्था त्यांनीं कृष्णावरच सोंपविली होती. मोठ्या विशेष प्रसंगाशिवाय ते दरबारांत येतहि नसत. तरी पण श्रीकृष्ण प्रत्येक महत्त्वाची गोष्ट करतांना त्यांचा सल्ला घेई, आणि मानाच्या प्रसंगीं त्यांना राजाचा मान देऊन आपण प्रतिनिधीचं काम करी. असो. वर सांगितल्याप्रमाणें अर्जदार मंडळींना चोपदार एकापाठीमागून एक असे श्रीकृष्णाकडे घेऊन आला. अर्जदारांत पहिल्या प्रथम सरकारी खात्यावरील नोकर असत.

आज पहिल्या प्रथम दरबारच्या गजसैन्याला पोहण्याकरितां एक जें मोठें सरोवर बांधलें होतें त्याचें उद्‌घाटन कसें, कोणाचे हस्तें करायचें याबद्दल आज्ञापत्र घेण्याकरितां श्रीकृष्णाकडे एक अधिकारी आला होता. आल्यावर नेहमींप्रमाणें मुजरा करून तो दूर उभा राहिला आणि म्हणाला, "सरोवर बांधून पूर्ण होत आलं आहे. त्याचं उद्‌घाटन आपण कराल ना?"

कृष्ण—'नाहीं; वसुदेवमहाराज यांचे हस्तें त्याचं उद्‌घाटन करूं. तडागांत पहिला गज जो सोडायचा तो सत्यभामादेवींचा सोडायचा असं ठरलं आहे. कारण त्यांच्याच सूचनेवरून हें एक क्रीडासरोवर बांधलं जात आहे. अर्थात् आम्ही तेथें उपस्थित राहूंच!

अधिकाऱ्यानें पुन्हां वंदन केलें आणि तो दरबाराच्या बाहेर पडला.

दुसरा अर्जदार आला. वंदन करून उभा राहिला. तो कांहीं एक बोलला नाहीं. कृष्णानें त्याचेकडे सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें, आणि ओळख पटल्याचें नजरेनें दर्शित केलें. तो आला तसा चालता झाला. श्रीकृष्णाचा तो हेर

होता. आपण आलों आहों एवढेंच त्यानें या वेळीं सूचित केलें. अशा हेरांशीं श्रीकृष्णाचें जें भाषण होई तें मध्यरात्रीं खलबतखान्यांत होई. खलबतखान्याच्या खोलीच्या आसपास कोणाहि मनुष्यास येण्यास बंदी असे. पहारेकरीसुद्धां खलबतखान्यापासून दूर उभे रहात असत. आज हेरानें बातमी आणली होती कीं, ' पांडव हे विराटराजाकडे नोकरीस राहिले आहेत. ' या हेराबरोबर कृष्णानें पांडवांना निरोप पाठविला कीं, 'तुम्ही चांगल्या गृहीं आहांत; परंतु तुम्हांला सेनापति कीचकापासून भय आहे. तेव्हां सावधगिरीनं द्रौपदीचं कीचकापासून रक्षण करा ! '

तिसरा अर्जदार कृष्णास वंदन करून म्हणाला, ' आम्हां भावांत वंशपरंपरेच्या भूमीबद्दल तंटा लागला आहे. तेव्हां आपण आमचा न्याय करा. '

कृष्णानें मृदु स्मित करून म्हटलें, " असले तंटे तुम्हीं आमच्या न्यायाधिशाकडे नेले पाहिजेत. पण माझा सल्ला जर तुम्हांला हवा असेल तर धाकटया भावास वडिलार्जित धन देऊन टाकावं, आणि स्वपराक्रमानं दुसरं धन मिळवावं. तें ताज्या अन्नासारखं पुष्टिवर्धक ठरेल. हा मार्ग जर पसंत नसेल तर तुम्हांला न्यायालयाचा मार्ग मोकळा आहेच ! अर्जदार म्हणाला, ' धर्म-निर्णय-खात्यावर आपले सांदीपनीगुरुजी आहेत. तेव्हां त्यांना दोन शब्द माझे वतीनं सांगा. ते तुमच्या आश्रयास आहेत ना ? '

आतांपर्यंत श्रीकृष्ण गालावर हात ठेवून शान्तपणें बोलत होता; पण हे अर्जदाराचे शब्द ऐकतांच तो ताड्कन् ताठ झाला आणि म्हणाला, " हें काम मजकडून होणार नाहीं. सांदीपनीगुरुजी हे अत्यंत निःस्पृह धर्मज्ञ आहेत; ते योग्य तोच न्याय देतील. तुम्हीं प्रजाजनांनीं ध्यानांत ठेवलं पाहिजे कीं, गुरुजी हे माझ्या आश्रयास नाहींत; आम्ही त्यांच्या आश्रयास आहोंत. "

यानंतर एक स्त्री अर्ज घेऊन आली. ती म्हणाली, " माझा पति मद्यपान खूप करतो आणि मला नित्य मारतो. तेव्हां त्याचा बंदोबस्त देवांनीं करावा. "

गोकुळचा चोर !



कालिया-दमन

श्रीकृष्ण— हे पतिपत्नींतले तंटे मी कसे तोडूं? या गोष्टी रुक्मिणीदेवींना चांगल्या समजतात. माझ्या अगोदर तूं त्यांनाच भेटली असतीस तर चांगलं झालं असतं!

अशा रीतीनें एकामागून एक अर्जांचा निकाल लागल्यावर श्रीकृष्ण दरबारांतून उठून भोजनास गेला. भोजनोत्तर तांबूल ग्रहण करून त्यानें अर्धी घटका वामकुक्षी केली, आणि नंतर उपनिषदें श्रवण केलीं. तीं ऐकल्यावर वाचक निघून गेला. मग श्रीकृष्णानें कांहीं काळ एकान्तांत घालविला. पुढें ठरलेल्या वेळीं आपल्या स्त्रियांसह रथांत बसून तो गांवाबाहेरच्या गौळवाड्यांत नेहमींप्रमाणें आला. आज रासक्रीडेचें कथानक चालणार होतें, म्हणून कृष्णस्त्रियांपैकीं अधिक स्त्रिया कथाश्रवणास आल्या होत्या. गौळवाड्यांतदेखील आज स्त्री-श्रोत्यांची गर्दी अधिक होती.

श्रीकृष्ण रथांतून उतरला. त्याच्या वदनावर आज विशेष प्रसन्नता दिसत होती. त्यानें आपला शेला कमरेस बांधला. नेहमींप्रमाणें मोरमुकुट घातला. मोठ्या बांबूच्या नळकांड्यांत जपून ठेवलेली मुरली बाहेर काढली. काष्ठासनावर बसल्यावर त्यानें सभोंवार एकदां दृष्टि टाकली. कर्मधर्मसंयोगानें आज आश्विन महिन्याच्या शुक्ल द्वादशीचें सुंदर चांदणें पडत चाललें होतें. त्यामुळें सर्वांच्या मनावर प्रसन्नता विलसूं लागली. अशा गोड वातावरणांत श्रीकृष्णानें आपल्या कथेस आरंभ केला :—

श्रीकृष्ण म्हणाला, "मित्रांनो, या आश्विन महिन्यांतलं हें चांदणं किती मौजेचं आहे! येथल्यापेक्षां उत्तर प्रदेशांत संथ प्रवाहाच्या यमुनेच्या विस्तीर्ण पुळणीवर आश्विन महिन्यांतलं चांदणं फारच बहारीचं चमकतं. या काळांत तिकडचे लोक रात्रीं घरीं बसून न राहतां रस्त्यावरून, बागेंत अगर नदीकांठीं मध्यरात्रीपर्यंत हिंडतात. भगवान् चंद्राच्या प्रसन्न किरणांचा परिणाम लोकांच्या मनावर विशेष आल्हादकारक होतो. लहान मुलं आणि कोंकरं तर चांदण्यांत उत्साहानं उड्या मारीत असतात."

एक गोपाल— महाराज, अगदीं बरोबर बोललांत. आम्ही गोपाल मंडळी आश्विन मासांत घरीं कुठलीं निजायला! आम्ही बाहेरच खाटलीं टाकून गप्पा मारीत असतों. आमच्या बायकांना त्या वेळीं गाणीं म्हणायला

आवडतं. आश्विनांत दूध रग्गड होतं. तें आम्ही गरम करून पितों, मित्रांना देतों. सर्व महिन्यांत आम्हां गोपालांना आश्विन मास फार पसंत! गुरांना चरायला मुबलक रान, नदीला स्वच्छ पाणी—आणखी काय पाहिजे?

श्रीकृष्ण—अगदीं बरोबर आहे. तुमच्या बायकांप्रमाणंच आमच्या मथुरा-वृंदावनच्या बायकांनाहि गायची आणि नाचायची खूप हौस. रोजचं डोक्यावरून पाण्याच्या घागरी आणतांनादेखील त्या टाळ्या वाजवीत गाणीं म्हणत जातात-येतात. चांदण्या रात्रीं मुलंहि वेडींवांकडीं नाचत व गात. कुणी त्यांना बोलत नसे. त्यांचीं वेडींवांकडीं गाणीं आणि कसं तरी नाचणं मला आवडत नसे. मीं तुम्हांला सांगितलंच होतं कीं, आमच्या बलरामदादांचा आवाज मोठा गोड. त्यांना नाचायलाहि खूप आवडे; पुष्कळ वेळां मी ताल धरीं. मी व दादांनीं आमच्या सवंगड्यांना चांगलं कसं नाचावं, टिपऱ्यांचा ताल कसा धरावा, सुराला धरून गावं कसं, हें बरेच दिवस शिकाविलं. लहान मुलांबरोबर त्यांच्या बहिणीहि येत. पुढं तरुण मुलींहि त्यांत सामील झाल्या. मी मध्यें उभा राहून मुरली वाजवीत असें, आणि तीं लहान-मोठीं मुलं फेर धरून टिपऱ्यांच्या तालावर गाणीं म्हणतांना नाचत.

"आश्विन पौर्णिमेस आमच्याकडे मोठा उत्सव होई. त्या दिवशीं दुधाचीं पक्वान्नं करून खाण्याची पद्धत आहे. एका पौर्णिमेस गोप-गोपी नाचून खूप दमल्या, आणि नंतर पहाटेला घरोघर गेल्या. घरीं जाण्यास उशीर झाला, म्हणून वडील माणसं त्यांना खूप रागावलीं. या रासक्रीडेचे वेळीं उत्साहाचे भरांत गोपगोपींनीं थट्टामस्करी करण्यांत कांहीं वेळां मर्यादा ओलांडली. माझी अपेक्षा नव्हती अशी. घरचं शिक्षण जर संयमाचं असलं तर—मुलं मर्यादा उल्लंघीत नाहींत. अगदीं थोड्या गोपगोपींनीं त्या रात्रीं मर्यादा उल्लंघिली, तरी पण त्यामुळं मला दोष लागला. पण मीं त्यांच्या नाचण्या-गाण्याला पद्धत लावली हें प्रथम कोणाच्या लक्षांत आलं नाहीं; तेव्हां त्यांनीं दोष देणं साहजिकच होतं. या रासक्रीडेंत थोड्या जणांनीं चुका जरी केल्या असल्या तरी पुष्कळशा गोपगोपी निर्मळ अंतःकरणानं नाचत-वागडत होत्या. तें चित्र इतकं मनोहर होतं कीं, देवांनीं येऊन पहावं! माझ्या आयुष्यांत जे अनेक सुखद

प्रसंग झाले त्यांत भोळया, निष्पाप गोपगोपींच्या रासक्रीडेला मी वरचं स्थान देतों."

असें म्हणून कृष्णानें मुरली वाजविण्यास आरंभ केला. त्या वेळीं आपण वृंदावनांतल्या गोकुळांत गोपगोपींमध्येंच आहों अशा कल्पनेच्या वातावरणांत तो गुंग होऊन गेल्यामुळें मुरलीच्या वादनांत अपूर्व रंग भरला; व या रंगांत तेथील गोपगोपी आणि कृष्णस्त्रियाहि रंगल्या. मुरली थांबली तरी श्रोते-मंडळी कांहीं काळ भानावर आलीच नाहींत. मग कृष्णस्त्रिया म्हणाल्या, 'देवा, मुरलीरवानं जर आपण या वयांत आम्हांस बेभान करतां, तर त्या वेळीं तुमच्या मुरलीनं गोपगोपींना वेड लावलं असल्यास नवल काय?'

रथांत बसल्यावर कृष्ण पुष्कळ वेळ कोणाशींच बोलला नाहीं. कारण वृंदावनांतले सर्व प्रसंग त्याचे नजरेसमोरून जात होते. रुक्मिणीनें शेवटीं विचारलें, "देवा, उद्यां कोणता प्रसंग सांगणार ?"

"उद्यां होय ? यानंतर—आम्हांवर एकामागून एक संकटं कशीं आलीं तें आतां निवेदन करणार आहें. गोकुळ–वृंदावनांतलं निष्काळजी आयुष्य यापुढं संपलं होतं. वसंत संपून ग्रीष्मऋतु कसा सुरू झाला—ती कथा उद्यां सांगेन म्हणतों."

# ४

## अभिमन्यूचें जीवन-शिक्षण

पांडव वनवासांत गेल्यावर सुभद्रा आपल्या पुत्रासह माहेरीं आली होती, आणि तिच्या मुलाच्या शिक्षणाकडे कृष्ण स्वतः लक्ष घालणार होता, ह्याचा उल्लेख मागच्या एका प्रकरणांत आलाच आहे. त्याचप्रमाणें कृष्णानें त्याला सांदीपनीगुरुजींकडे पाठवावयाचा; परंतु गुरुजींना धर्म-निर्णयाचें खातें सांभाळावयाचें होतें. यामुळें त्यांना विद्यार्थ्यांना शिकविण्यास वेळ मिळत नव्हता. म्हणून इतर शिक्षकांच्या मदतीनें कृष्णानें अभिमन्यूचें शिक्षण आपल्या देखरेखीखालीं केलें. शस्त्रास्त्रविद्याच केवळ नव्हे, तर अश्व-गज-रथ यांची विद्या देखील त्यानें त्यास शिकविली. राज्यकारभार कसा चालवावा, देशाचें संरक्षण कसें करावें इत्यादि गोष्टीहि तो आपल्या इतर पुत्रांबरोबर अभिमन्यूस शिकवीत असे. या सर्व विद्या आकलन करण्यास त्या राजपुत्रांना कठीण जात नव्हतें; कारण रोजच्या व्यवहारांत या विद्यांचा उपयोग त्यांना पाहतां येत होता. कृष्णाबरोबर ते अश्वशालेंत गेले किंवा दरबारांत जाऊन बसले, किंवा मृगयेंत त्याच्यासमवेत राहिले, तर त्यांचें प्रात्यक्षिक शिक्षण सहज होई. कृष्णाचें जरी आतां वय होऊं लागलें होतें तरी थोडा-बहुत व्यायाम आणि शस्त्रास्त्रविद्येचा अभ्यास— ती विद्या ताजी ठेवण्या-करितां—तो करीत असेच. यामुळें मुलांचा अनेक विद्यांत लीलेनें प्रवेश होऊं शकला.

कृष्णाच्या लवकरच ध्यानांत आलें कीं, अभिमन्यूची आकलन-शक्ति व महत्त्वाकांक्षा जबरदस्त आहे. अर्जुनाप्रमाणें त्याचा स्वभाव धीमा नाहीं. गुरुजींकडून एखादा धडा घेतल्यावर अर्जुन तो घटवून घटवून पुष्कळ वेळ तयार करीत बसे; याच्याउलट अभिमन्यूचा स्वभाव. पुढें पुढें धांवत जाण्याची त्याला हौस. एकदां गुरुजी सैन्याची व्यूहरचना आणि भेद करण्याची युक्ति शिष्यांना सांगत होते. गुरुजी म्हणाले, “अभिमन्यु, चक्रव्यूह-रचना तुला जरी आकलन झाली आहे तरी ह्या व्यूहाचा भेद करणं हें सोपं काम

नाहीं. शत्रूच्या व्यूहाचा भेद एक वेळ करतां येईल; परंतु पुन्हा त्यांतून बाहेर पडणं हें भेद करण्यापेक्षांहि अधिक अवघड काम आहे. यांत सावधानता विशेष लागते." इतकें बोलणें झाल्यावर गुरुजींना कांहीं दुसरें काम निघालें, आणि विषय तितकाच राहिला. दुसऱ्या दिवशीं अभिमन्यूनें गुरुजींजवळ 'एखादी नवी व्यूह-रचना सांगा' म्हणून आग्रह धरला. गुरुजींनीं 'सुपर्ण' व्यूहाची रचना सांगितली. 'चक्रव्यूह-भेद' यावर अधिक सांगण्यास ते विसरले, आणि अभिमन्यूनेंहि त्यावर कांहीं विचारलें नाहीं. अशा प्रसंगीं अर्जुन जर असता तर त्यानें अर्धवट राहिलेल्या विषयाची गुरुजींस आठवण करून दिली असती. एक दिवस गुरुजी कृष्णाला म्हणाले, "हा सुभद्रापुत्र तैलबुद्धीचा आहे. याची तडफ आश्चर्य उत्पन्न करते,—तरी पण याचे स्वभावांत क्षणोक्षणीं अधीरता दिसते. —प्रदीर्घ युद्धांत अधीरता उपयोगाची नाहीं. तेव्हां आपण या बाबतींत त्याच्याजवळ बोलावं."

तेव्हां श्रीकृष्ण त्यांना म्हणाला, "गुरु हा शिष्याचे मूळचे गुण फार तर विकसित करूं शकतो; परंतु त्याचे दोष समूलतः काढूं शकत नाहीं. जीवनामध्यें धीरवृत्तीचा अर्जुन यशस्वी होईल, आणि अभिमन्यु आपल्या अद्भुत पराक्रमानं पित्यापेक्षांहि अधिक कीर्तिमान होईल असं मला दिसतं!"

सायंकाळ झाली. श्रीकृष्ण सुभद्रा-अभिमन्यु यांच्यासह गोकुळांत आला. आज त्यानें मोरमुकुट घातला नव्हता. आपले लांबसडक केस दोन्ही खांद्यांवर त्यानें टाकले होते. वय अधिक होऊनहि त्याचे केस बरेच काळे राहूं शकले. तरी कांहीं पांढरे केस मधून मधून चमकत असत. नेहमींप्रमाणें त्यानें आपला शेला कमरेस बांधला. त्याच्या रेखीव अंगलटीचा पिळदारपणा अजूनहि कायम होता. मुखावर उतरत्या वयाची झांक मारत होती. तरी तें सुरकुतलें नव्हतें. आपलें शरीर नेहमीं तल्लख आणि नेटकें ठेवण्याकडे त्याचें लक्ष असे. स्नानापूर्वीं संवाहक त्याचे अंगास विविध तैलें आणि उट्या लावून अंगमर्दन करीत. त्यामुळें त्याची कान्तीच केवळ नव्हे तर त्याच्या बुद्धीचा ताजेपणाहि कायम राहिला होता.

आज कृष्ण विशेष प्रसन्न जसा नव्हता तसा दुःखीहि नव्हता. आज त्याच्या चेहऱ्यावर गांभीर्य दिसत होतें. आपल्या जिवावर उठलेल्या कंस-

मामाबद्दल त्याला आज बोलावयाचें होतें. उपनिषदांच्या वाचन-मननांत त्याचीं अनेक वर्षें गेलीं होतीं. त्यामुळें आजची कथा संयमपूर्वक सांगण्याचें त्यानें ठरविलें होतें.

## कंसानें पाठविलेले मारेकरी

कृष्णानें कथेस आरंभ करतांना म्हटलें, " काल आपण आश्विन महिन्यांतील बहार अनुभविली. आज जीवनाचं उग्र स्वरूप तुम्हांला मी दाखविणार आहें. मथुरेच्या बंदिवासांतून मला वसुदेवतातांनीं गोकुळांत आणलं, हें कंसराजाला प्रथम कांहीं दिवस कळलंच नाहीं. योगमायेनं आकाशांत जातांना 'तुझा शत्रु गोकुळांत वाढत आहे' असं सांगितलं होतं खरं; पण शत्रु नक्की कोणत्या घरांत वाढतो आहे याचा त्याला पत्ता नव्हता. बराच शोध केल्यावर त्याला कळलं कीं, वसुदेवांनीं आपला आठवा पुत्र गोकुळांत नंदाच्या घरीं आणून ठेवला आहे. ही बातमी लागल्यावर त्यानं माझा जीव घेण्याकरितां एकामागून एक अनेक उपाय योजले. मी बालक असतांना मला मारण्याकरितां त्यानं पूतना नांवाची एक विषकन्या पाठविली. ह्या बाईचं दूध अत्यंत विषारी होतं. ती ज्याला पाजील तें बालक हटकून मरत असे. पूतना गोकुळांत आली, अन् तिनं मला पाजण्याचा प्रयत्न केला; पण त्यांत ती यशस्वी न होतां तिलाच मृत्यु आला! मग गोकुळांत अशी वार्ता पसरली कीं, मीं तिचं दूध इतकं शोषण केलं कीं, त्यांत तिचा प्राणच गेला! खरं काय घडलं हें मला माहीत नाहीं; पण पूतना माझा जीव घेण्यास आली होती ही गोष्ट मात्र खरी.

" कंसानं एकदां केशी नांवाचा दैत्य मला मारण्याकरितां पाठविला. तो एका उन्मत्त घोड्यावर बसून आला होता. हा घोडा जो मनुष्य समोर दिसेल त्याला चावायला जाई. केशीनं संधि साधून माझ्याहि अंगावर तो घोडा घातला. मी त्याच्यावर चालून गेलों. त्याच्या उघड्या तोंडांत मीं माझं मनगट इतक्या जोरानं दाबलं कीं, त्यांत त्याचं तोंड फाटून तें रक्तबंबाळ झालं. मुष्टीवर मुष्टी मारून त्याचे दांत मीं उखळून टाकले. मग तो तोंड फिरवून माझ्या अंगावर टापा झाडूं लागला. मीं त्याचे दोन्ही पाय घट्ट धरले, अन् त्याला जमिनीवर लोळविलं. अर्थात् मला माझ्या मित्रांची मदत झालीच."

पेंद्या ( मध्येंच )—ऐका हो ऐका,—मला कांहीं सांगायचं आहे. कृष्ण म्हणतो, आमची त्यास मदत झाली. कृष्णानं त्या घोडयाला अन् केशीला जमिनीवर लोळविल्यावर मग आम्ही काठ्या घेऊन धांवलों, आणि कृष्णाच्या मदतीनं केशीला मारलं हें खरं; पण प्रत्येक वेळीं कृष्णच शत्रूचा कांटा काढी, अन् शत्रु घायाळ झाल्यावर मग आम्ही हल्ला करीत असूं!

कृष्ण—ह्या गडबडींत दादाहि पुढं सरसावले, आणि त्यांनीं केशीला बुक्क्या मार-मारून यमसदनास पाठविलं. लोकांच्या लवकरच लक्षांत आलं कीं, कंसाचा राग आम्हां दोघां भावांवर—विशेषतः मजवर आहे. त्यामुळं गोपगोपी दुःखी झाले. पण मी त्यांचं सान्त्वन करून म्हटलं, ‘तुम्ही घाबरूं नका. देव आपला पाठिराखा आहे. आपण कोणाचं वाईट का केलं आहे?’

## गोवर्धन-यज्ञ

यानंतर मी एक नवी योजना आंखली. आतांपर्यंत लोक दर वर्षी इंद्राला दूध, तूप, दहीं, धान्य इत्यादिकांचं हवन करीत असत. मीं त्यांना म्हटलं, ‘हा इंद्रदेव राहिला आकाशांत, त्याचा आपला संबंध काय? आपल्या शेळ्या, मेंढ्या, गाई, गोऱ्ह्यांचं रक्षण कोण करतं? हा वृंदावनाजवळचा गोवर्धन पर्वतच करीत नाहीं का? तेथूनच आपल्याला लागणारा लांकूड-फांटा आपण आणतों. तेव्हां आपण इंद्राची पूजा न करतां गोवर्धन पर्वताचीच पूजा करूं. सारा नैवेद्य त्यालाच अर्पण करूं.’

ही माझी सूचना वृद्ध गोपांस प्रथम आवडली नाहीं. ते म्हणाले, ‘इंद्रदेव मोठा मत्सरी आहे. त्याला सोडून आपण जर या पर्वताची पूजा केली तर त्याला राग येईल, आणि मग तो आपल्यावर संकट आणल्याशिवाय राहणार नाहीं!’

तेव्हां मीं त्यांना म्हटलं, ‘संकटाला भिऊन कसं चालेल? जो आपलं हित करतो त्याला नैवेद्य दाखविणं हें आपलं कर्तव्य आहे. यंदां पाहूं या काय होतं तें!’ पुढं होय-नाहीं करतां करतां मंडळी तयार झाली. आमच्या त्या लहानशा गोकुळांतले लोक दहीं-दुधाच्या हंड्या अन् इतर खाद्य पदार्थ टोपलींत घेऊन गोवर्धन पर्वतावर गेले. तेथें आम्हीं सर्वांनीं पर्वताला नैवेद्य

दाखविला आणि पर्वताचा प्रसाद आनंदानं भक्षण केला. त्या दिवशीं लहान-थोर सर्व मोठ्या आनंदांत होते. मुलं-मुली नाचत-बागडत होतीं; पण माझें मन स्वस्थ नव्हतें.

सुभद्रा— कां बरं ? तुझ्या मनाप्रमाणं सर्व कांहीं आतां झालं होतं. मग तूं अस्वस्थ कां झालास? तुला किनई पुढच्या पुढच्या गोष्टींच्या कल्पना करीत राहण्याची संवयच आहे !

कृष्ण— कोणाहि माणसाला सुधारणा करायची झाली तर त्याला हें ध्यानांत ठेवावं लागतं कीं, त्याच्या सुधारणेला गुप्त अगर उघड विरोध होणारच. मला खात्री होती, जनतेकडून हविर्भाग नेहमीं ग्रहण करण्याची संवय लागलेल्या इंद्राला हा माझा उपक्रम आवडणार नाहीं ! आणि मग तो आम्हांला घाबरून सोडण्याकरितां मुसळधार पावसाचा वर्षाव करील. एखाद्या वेळीं आपलं वज्रहि टाकील. मीं अगोदर हें हेरूनच यावर उपाय योजून ठेवला होता.

सुभद्रा— कृष्णा, या गोष्टी तुला नेहमीं आधीं रे कशा सुचतात? माझ्या लग्नाच्या वेळीं तूं अशींच कांहीं युक्ति केली होतीस म्हणे. रुक्मिणी वहिनी, तुझ्या लग्नाच्या वेळीं कृष्णानं तुला आणण्याकरितां काय ग युक्ति योजली होती?

कृष्ण-- हें पहा सुभद्रा, त्या बाबतींत माझा हात कांहीं नव्हता. हिनंच सर्व व्यूह रचला. मला रथ घेऊन या, एवढी आज्ञा केली. सर्व युक्त्या तुझ्या वहिनीच्या होत्या;— अन् ती त्या घालते माझ्यावर. यावर आमचा नेहमीं तंटा होतो,- तेव्हां आपण तो प्रश्न सोडून पुढं जाऊं या !

## प्रसंगावधान

" पर्वतावर सर्व मंडळी जाण्याचे अगोदर मीं दोन-चार दिवस त्या पर्वतांतील भुयारं, गुहा नीट पाहून ठेवल्या होत्या. यज्ञ समाप्त होण्याचे वेळीं माझे अंदाजाप्रमाणं इंद्रानं पर्जन्यास्त्र सोडलं. त्याबरोबर मुसळधार पाऊस पर्वतावर पडूं लागला. लोक घाबरले. मग मीं त्यांना पर्वताच्या गुहेंत नेलं. सर्वांचा समावेश एका गुहेंत होईना. मग मी त्यांना पर्वताच्या दरडीखालीं उभं

राहण्यास सांगितलं. मुसळधार पाऊस पडल्यामुळं दरडी कोसळून पडतात कीं काय अशी भीति उत्पन्न झाली. तेव्हां मीं लोकांना सांगितलं, ‘घाबरू नका. माझ्यासारखा हाताचा नेट दरडीच्या दगडांना द्या.’ मी चार घटका हात वर करून कोसळणारा दगड धरून उभा होतों. मग इतरांनींहि तसंच केलं. कोणी काठ्यांचा नेट लावला. स्त्री-पुरुषच केवळ नव्हे तर लहान लहान मुलांनींहि आपले हात उंचावून दगड कोसळूं दिले नाहींत. गोकुळांतलं हें सहकार्य अपूर्व होतं. माझी प्रत्येक हौस गोकुळवासीयांनीं पुरविली. आजच्यापेक्षां त्या वेळीं मी अधिक गरीब स्थितींत होतों. आज आपल्याजवळ असंख्य घोडे, हत्ती, रथ आहेत. त्या वेळीं रथ आमच्या दृष्टीसहि पडत नव्हता. हा पहा मुक्ताफळांचा हार,—त्या वेळीं गुंजफळांचे हार अन् रानफुलांचीं भूषणं आम्ही घालीत होतों; पण सहकार्यामुळं त्या वेळच्या प्रत्येक गोष्टीला तजेला येई. असो. मी काय बरं सांगत होतों—हं, पर्जन्यास्त्राला गोपगोपी घाबरत नाहींत हें पाहून इंद्रानं आपलं अस्त्र मागं घेतलं. अशा रीतीनं गोवर्धनयज्ञाचा प्रसंग मीं तुम्हांस जातां जातां सांगितला. उद्यां आपण कंसराजाच्या आत्मसंरक्षणाच्या उद्योगाबद्दल बोलूं.”

## ५

# कृष्णाची दूरदृष्टि

घरीं आल्यावर नेहमींप्रमाणें मध्यरात्रीं खलबतखान्यांत कृष्णाचा खास हेर आला. त्याचा आजचा वेष व्यापाऱ्याचा होता. कानांत भिकबाळी, गळ्यांत कंठी, व नेसूं उंची चिनांशुक. त्यानें कृष्णाला निरोप पाठविला कीं, 'अर्जुन-श्रेष्ठी भेटायला आलेले आहेत.' कृष्णानें जाणलें कीं, आपला गूढात्मा नांवाचा हेर आला आहे. दोघेहि खलबतखान्यांत गेले. तेथें तो मुजरा करून कृष्णासमोर उभा राहिला. राजेलोकांत विचारल्याशिवाय सेवकानें कांहीं एक बोलायचें नसतें. आणि स्वामीनें सेवकांजवळ थोडेंच—कधीं कधीं नुसतें इशारतीचें बोलावयाची प्रथा आहे. कृष्णानें त्याचें स्मित वदनानें स्वागत करून म्हटलें, " तिकडची हकीकत सांग. " गूढात्मा म्हणाला, " आपला इशारा मीं पांडवांस दिला. द्रौपदी कीचकाबद्दल सावध होती. आपल्या अंदाजाप्रमाणं कीचकाचे हेर द्रौपदीभोंवतीं घिरट्या घालूं लागले. पुढं त्यानं जेव्हां द्रौपदीची प्रत्यक्ष मागणीच राणीजवळ केली तेव्हां भीमानं एके रात्रीं कीचकाचा वध केला. आतां वध करणाऱ्याचा शोध जारीनं चालू आहे. "

कृष्णानें क्षणभर आपल्या तळहातावर मस्तक धरलें; विचार करून एक सुस्कारा टाकला, आणि आपल्याशीं म्हणाला, " ही घटना म्हणजे अनेक अनिष्ट घटनांची सूचना आहे!—बरं, तूं परत अर्जुनाकडे जा, आणि त्याला सांग, आतां अधिक सावध रहा. तुम्हांला अज्ञातवासांतून बाहेर काढण्याचा प्रयत्न कौरवांकडून होईल. कौरव कांहीं तरी निमित्तानं विराट-नगरीवर हल्ला करतील. मग तुम्हांला नगरीच्या रक्षणार्थ प्रगट व्हावं लागेल. आणि मग अज्ञातवासाचा करार पुरा न केल्याचा कांगावा कौरव केल्या-शिवाय राहणार नाहींत. तरी अज्ञातवासांतून शक्य तितकं बाहेर येऊं नका. " हा निरोप ऐकून हेरानें श्रीकृष्णाला अभिवादन केलें आणि तो हळूच पाऊल न वाजवितां तेथून गेला. यानंतर नेहमींप्रमाणें विश्वात्मक भावाचें अर्धी घटका चिंतन करून श्रीकृष्ण निद्रावश झाला.

दुसऱ्या दिवशीं अर्ज-सुनावणीच्या वेळीं पुष्कळसे शेतकरी यंदां पीक भरपूर न मिळाल्यामुळें सरकारसारा देतां येणार नाहीं, असें कळवावयास आले होते. कृष्णानें उत्तर दिलें, "हा प्रश्न बलरामदादांच्या अधिकारांतला आहे, तिकडे जा. ते जो निकाल देतील तो मान्य करा." यावर अर्जदार म्हणाले, "दादा नीट ऐकून घेत नाहींत; ते रागावतात. त्यांनीं आम्हांला घालवून दिलं."

कृष्णानें स्मित करून उत्तर दिलें, "तुम्ही दादांकडे पुन्हा जा आणि त्यांना म्हणावं, सारा माफ करा अशी विनंति करायला आम्ही आलों नाहीं; फक्त यंदां सारा तहकूब करा. भरपूर पीक आल्यावर आम्ही मागचं देणं देऊन टाकूं. असं सांगून तर पहा. आपण कांहीं तरी करण्यास तयार व्हावं, म्हणजे आपल्या मागण्याला किंमत येते. बरं, या."—असें बोलून त्यानें शेतकऱ्यांना निरोप दिला.

दुपारीं वामकुक्षीनंतर श्रीकृष्ण उपनिषदें श्रवण करीत असे. या वाचनाचे वेळीं त्याच्या अष्टनायिकांपैकीं कांहीं स्त्रिया तीं श्रवण करण्यास येत असत. श्रीकृष्ण उपनिषद्श्रवणाचे वेळीं साधा वेष परिधान करून बसत असे. सत्यभामेनें त्याबद्दल एकदां प्रश्न विचारला. तेव्हां कृष्ण म्हणाला कीं, "हीं उपनिषदं गुरुमुखानं जीं मीं प्रथम ऐकलीं, त्याचा ठसा माझे मनावर वेद-विद्येपेक्षांहि खोल उमटला आहे. ईशावास्य-उपनिषद् मी ऐकूं लागलों कीं माझे गुरुमहाराजांची ती धीर-गंभीर वाणी माझे कानांत घुमूं लागते. सोळाव्या मंत्रांतील शेवटचे शब्द '**तुझें तें परम कल्याण रूप— तें मी आतां पहात आहें. तो जो परात्पर पुरुष — तो मी आहें.**' गुरुजी हे शब्द इतके तन्मयतेनं उच्चारीत कीं, असं वाटे,-त्या परात्पर पुरुषाशीं ते एकरूप होऊन गेले आहेत. उपनिषदें देहात्मभाव विसरलेल्या स्थितींत स्फुरलीं आहेत. तेव्हां अहंकार वाढविणारा वेष आपण उपनिषद् श्रवणाचे वेळीं जर धारण केला तर त्याचं श्रवण व्यर्थ होईल, नाहीं का?"

उपनिषदाचें वाचन आटपलें; पण कृष्णाची तन्मयता विसर्जन पावली नाहीं. कांहीं वेळानें त्यानें डोळे उघडले, व सर्वांकडे पाहून स्मित केलें. नंतर नेहमींप्रमाणें सर्वांना प्रसाद देण्यांत आला. याच वेळीं उपनिषद्-श्रवणास

ना. क्र. ७७८

भाविकतेनें बसलेली रुक्मिणी जांबुवंतीला म्हणाली, "पाहिलंत, देव कसे चटकन् ध्यानस्थ होतात? ते आपल्यांत राहतात, हंसतात, खेळतात, पण त्यांची भूमिका एखाद्या योग्यासारखी आहे." जांबुवंती आपला सूर रुक्मिणीच्या सुरांत मिसळून म्हणाली, "माझाहि तोच अनुभव आहे. परवां मला देव म्हणाले, 'आज मला फराळाचे वेळीं दहींपोहेच दे.' मी चांदीच्या वाटींत ते आणून दिले. तेव्हां ते म्हणाले, 'ते पळसाच्या द्रोणांतच दिले असतेस तर ते अधिक गोड लागले असते.' आणि पोहे खाऊं लागले. पुन्हां त्यांना गोकुळची आठवण झाली, आणि मला म्हणाले, 'हे पोहे माझ्या मागून येऊन हिसकून घ्यायला बालरूपांत दादा येथें नाहींत. दहीं-पोहे खायचे तर गोकुळांतच खावे असं मला वाटतं. आणि तेहि यशोदामातेनं कालविलेले असावेत.' असं ते बोलूं लागले कीं मग माझे डोळे भरून येतात कीं हो—"

## कंसाचा घातकी विचार

सायंकाळीं श्रीकृष्णानें गौळवाड्यांत जाऊन आत्मकथा-कथनास आरंभ केला.—

"गोपालहो, परवां तुम्हांला मीं सांगितलंच कीं. मी जसजसा मोठा होत चाललों तसतसे माझे मामा कंसराजे अधिक बेचैन होत चालले. माझं वय आतां अठरा-एकोणीस वर्षांचं झालं होतं. बळरामदादाहि माझ्यापेक्षां थोडे वडील,—म्हणजे आम्हीं जवळजवळ समान वयाचेच होतों. तारुण्य आमचे अंगांत मुसमुसूं लागलं होतं, व त्याचं तेज अंगावर रोजच्या रोज चढत होतं. कसरत करून, पोहून, दंगा करून, दहीं-दूध यथेच्छ खाऊन आम्ही दोघे स्वच्छंदी मस्त बैलाप्रमाणं हिंडूं लागलों कीं कोणालाहि आमचेबद्दल थोडं भयच वाटायचं! त्यांत मदोन्मत्त जनावरांचा आम्हीं निकाल लावल्या-मुळं आमच्या सामर्थ्याविषयीं गांवांत भलत्याच कल्पना पसरल्या होत्या. कोणी म्हणत, आम्हांला देवताप्रसादानं अलौकिक शक्ति प्राप्त झाली आहे. प्रेम आणि भक्ति यांचा कधीं कधीं अतिरेक होतो. आम्हांवर प्रेम करणाऱ्या एका भोळ्या म्हाताऱ्या गोपालानं आपल्या लोकांस सांगितलं कीं, आपल्या गांवांत या मुलांच्या रूपानं शेषशायी भगवान् विष्णु अवतरले आहेत. मला एकदां राधा गवळणीन उघड प्रश्न केला कीं, 'तूं विष्णूचा अवतार आहेस

का?' तेव्हां मीं म्हटलं, 'तूं एखाद्या देवतेचा अवतार असलीस तर मीहि एक कोणी तरी देव — स्वर्गातील देव अवतरलों आहें.'

लोकांमध्यें जे विचार चालतात, ते हळूहळू राजाचे कानांवर जातातच. त्याचप्रमाणं कुणीं तरी कंसराजांना जाऊन सांगितलं कीं, गोकुळांत विष्णूचा अवतार झाला आहे. तेव्हां त्या राजाचा राग अनावर होऊन तो भर दरबारांत गर्जून म्हणाला, 'तो चिमुरडा कृष्ण स्वतःला विष्णूचा अवतार म्हणवून घेत आहे. त्याला म्हणावं, तूं विष्णूचा नाहीं तर शिवाचा अवतार असलास तरी माझ्यापुढं तुझा टिकाव लागणार नाहीं. माझा पाठिराखा बलाढ्य रुक्मी आणि सम्राट् जरासंध आहे हें त्या पोरट्याला अजून माहीत नाहीं!'

यानंतर कंसराजांनीं तातवसुदेवांना आपले दरबारांत बोलावून घेतलं, आणि त्यांना ते टाकून बोलले कीं, "वसुदेवा! तूं काय समजतोस? मला तुझ्या हिकमती समजत नाहींत म्हणून? मला वाटलं होतं कीं, तूं सत्यवचनी, साधुवृत्तीचा गृहस्थ आहेस, म्हणून मी तुझ्या वचनावर विश्वास ठेवून स्वस्थ बसलों. पण शेवटीं तूं माझा विश्वासघात केलास. तुला आतां मी मोकळा ठेवीत नाहीं. बंदिखान्यांत तुम्हां दोघांची आतांच रवानगी करतों, आणि गोकुळांतल्या धष्टपुष्ट बनत चाललेल्या तुझ्या कार्ट्याचा समाचार घेण्यास लागतों!"

यानंतर माझ्या पूज्य वसुदेवतातांना व निष्पाप मातेला माझ्या मामांनीं रागाच्या भरांत कारागृहांत टाकलं, आणि नंतर ते माझा नाश कसा करतां येईल याचा विचार करूं लागले. माझा प्राण तर घ्यावा, पण आपल्याला त्याबद्दल कोणीं दोष लावूं नये, अशी युक्ति ते बरेच दिवस योजीत होते.

पेंद्या—पण तूं आम्हांला त्या वेळीं हें कोठं सांगितलंस? हें जर आम्हांला अगोदर कळतं, तर आम्ही सर्व गोपाल एकत्र झालों असतों आणि कंसराजाचा कांटाच काढला असता!

कृष्ण—तुझं म्हणणं बरोबर आहे रे, मित्रा! माझेकरितां तुम्ही मंडळी

कांहींहि करण्यास तयार झालां असतां यांत संशय नाहीं. पण कंस हा मोठ्या सामर्थ्याचा पुरुष होता. त्याचे पाठिराखेहि बलाढ्य होते. मथुरेंतील कारस्थान आम्हांला रोज कोणी तरी सांगत असे कीं, आम्हां दोघांना मारून टाकण्याचा बेत कंस करीत आहे. राजाचं हें वागणं बरं नव्हे, असं पुष्कळ सज्जनांना वाटे; पण ते शक्तिशाली पुरुष नव्हते. त्यामुळं त्यांची कळकळ फुकट होती. राजमंडळाची सहानुभूति तातवसुदेवांकडे होती; पण कंसापुढं आपलं चालणार नाहीं, असं त्यांच्या मनानं घेतलं होतं. मामांनीं पुष्कळ विचार करून अन् मित्रमंडळाचा सल्ला घेऊन असं ठरविलं होतं कीं, एक धनुर्यांग करावा. तो पाहण्याकरितां मला व दादांना रथ पाठवून मोठ्या सन्मानपूर्वक बोलवावं. धनुर्यागामिमित्त होणाऱ्या मल्लयुद्धांत राजमल्ल **चाणूर** आणि **मुष्टिक** यांनीं आम्हां दोघांना मारून टाकावं, आणि जगाला सांगावं कीं, ‘कुस्ती करतां करतां रक्त ओकून कृष्ण–बलराम मेले!’

एक गोप— पण देवा, कुस्तीच्या खेळांत जोडीदार बरोबरीचा लागतो. मग तुमच्याशीं ते मोठे मल्ल कसे बरं खेळले?

कृष्ण— तुझं म्हणणं बरोबर आहे. मला माझ्या बरोबरीचा मल्ल खेळण्याकरितां द्यायला हवा होता; पण राजानं मुद्दामच चाणूराला माझ्याशीं कुस्ती करायला भाग पाडलं. मुष्टिक व चाणूर हे मल्ल म्हणजे शुद्ध राक्षस होते. राजाच्या घरचं यथेच्छ खाऊन, तो सांगेल त्याला कुस्तीला बोलावून ठार मारावं, हा त्यांचा धंदा. न्याय-अन्याय याचा ते बिलकूल विचार करीत नसत.

यानंतर कंसराजानं कुवलयापीड नांवाचा एक महाबलाढ्य हत्ती माझे अंगावर घालण्याचा बेत करून ठेवला होता. नंतर त्यानं त्याच्या दरबारांतील मधुरवाणीच्या आणि साधुवृत्तीच्या अक्रूर नांवाच्या एका सरदाराला बोलावून घेतलं. नंतर त्याला म्हणाला, “अक्रूरा, या धनुर्यांगाकरितां मीं अनेक लोकांना निमंत्रणं पाठविलीं आहेत. तूं आमचा स्नेही. तूं वृंदावनांत जा. तेथें नंदगोप आपला पक्षपाती आहे. त्याला म्हणावं, तुझ्या दोन पुत्रांसह धनुर्यांग पाहण्यास ये. माझा खास रथ त्या बालवीरांना आणण्याकरितां घेऊन जा. ते खेडयांत वाढलेले आहेत, तेव्हां शहरांत

यायला संकोच करतील; तेव्हां त्यांना धीर देऊन विशेष आग्रह करून घेऊन ये."

रुक्मिणी—तुम्हांला जर कंसाचा दुष्ट बेत माहिती होता, तर तुम्ही तिथं गेलां कशाला? तुम्ही वृंदावनांतून दूर कुठं तरी निघून जायचं होतं.

कृष्ण—तें मला शक्य नव्हतं. कारण कंसाचे गुप्त हेर आमच्या गांवचे आसपास हिंडत होते. त्यांची माझ्या हालचालीवर कित्येक दिवस नजर होती. मीं जर कोठें जाण्याचा प्रयत्न केला असता, तर त्यांनीं मला पकडून आणलंच असतं. तेव्हां या प्रसंगाला धिटाईनंच तोंड द्यायचं आम्हीं ठरविलं. हा बेत आम्हीं आमच्या गोप-मित्रांना कळविला नाहीं. कारण ती मंडळी आमचेवरच्या प्रेमानं बेभान होऊन कंसाला मारायलाहि गेली असती; आणि मग त्यांचा आणि सबंध गोकुळाचा कंसानं नाश केला असता. असो.

राजाची आज्ञा प्रमाण मानून अक्रूर कंसाच्या रथांत बसून निघाला खरा; पण त्याला मनांतून धास्ती वाटत होती कीं, हा दुष्ट राजा कदाचित् मला मारून टाकील. पण करतो काय! कंसाच्या हुकुमाप्रमाणं त्याला जाणं भागच होतं आमचं गोकुळ म्हटलं म्हणजे अगदींच खेडं! राजाचा भव्य रथ आम्हीं कधीं पाहिलाच नव्हता. आमच्या गाड्यांना आम्ही आमचे बैल जोडीत असूं. अश्वांचा आम्हांला विशेष परिचय नव्हता. अक्रूराचा रथ दुरून पाहतांच गोपाल-बालकं त्याचेभोंवतीं जमा झालीं. त्यांनीं नंदतातांचं घर अक्रूराला दाखविलं. आमचे घराजवळ एवढा मोठा रथ उभा राहिलेला पाहून आम्ही दोघे ताबडतोब घरीं आलों. अक्रूरानं आमचं मोठं स्वागत केलं, आणि कंसराजाचा निरोप आम्हांला कळविला. हा निरोप ऐकून नंदतातांना कसंसंच झालं. त्यांनीं काकुळतीस येऊन अक्रूराला म्हटलं, 'आमचीं हीं मुलं अजून अज्ञान आहेत. नगराचा त्यांस परिचय नाहीं. धनुर्मखांत ते भांबावतील. जरा मोठे होऊं द्या, मग नेऊं त्यांना राजदर्शनास!'

यशोदामातेला कंसाचा बेत मुळींच माहीत नव्हता. आम्हांला दूर पाठविणं तिच्या जिवावर आलं. यशोदा व नंद यांचा नकार ऐकून अक्रूरानं त्यांना आश्वासन दिलं व शेवटीं सांगितलं, कंसराजाचं निमंत्रण डावलणं बरं नव्हे. तो एखाद्या वेळीं तुमचीं गुरं-ढोरं जप्त करून तुम्हांला बंदिवासात

टाकील. तुम्ही दोघांना पाठवा तर खरे; आम्ही आहोंत त्यांचे पाठिराखे! शेवटीं नाहीं-होय करतां करतां आमची दोघांची रवानगी अक्रूराबरोबर झाली. सगळं गांव आम्हांला वेशीपर्यंत पोंचवायला आलं होतं. काय असेल तें असो, त्यांना आज बरं वाटत नव्हतं. राजाच्या रथांतून आम्ही चाललों होतों खरे; पण लोकांना वाटत होतं—आम्हां दोघांवर कांहीं तरी संकट खास येणार! म्हणून ते लोक रथाला आडवे झाले. गोपी म्हणूं लागल्या, 'आम्ही अन्न वर्ज्य करूं.' सर्वत्र एकच आकान्त झाला. त्या वेळेला मला गोकुळवासीयांचं प्रेम कळलं. अशा प्रेमळ जीवांकरितां एकदां नव्हे शंभरदां कालियाच्या काळमुखांत जाणं मी आनंदानं पत्करीन. गोकुळची आठवण झाली कीं माझे नेत्र पाण्यानं कां भरून येतात याचं रहस्य तुम्हांला आतां कळून येईल.

पेंद्या—कृष्ण ज्या वेळीं गोकुळांतून गेला त्या वेळीं रडून रडून आमचे डोळे सुजले. त्या दिवशीं कोणीं भाकरी खाल्ली नाहीं. गांवाला जणुं काय सुतक आलं होतं असं दिसलं. कृष्ण आम्हांला आश्वासन देत होता कीं, कांहीं काळजी करूं नका; ज्या देवानं मला कालियाच्या मुखांतून सोडविलं तोच माझं याहि वेळीं रक्षण करील. मग कृष्ण रथांत उभा राहून आम्हां सौंगडयांना दंड थोपटून म्हणाला, 'गडयांनो, कांहीं काळजी करूं नका. मी कुस्ती मारून येतों पहा!'

कृष्ण—गोकुळवासीयांना माझ्या या आश्वासनानं बरं वाटलं, आणि मग ते उत्साहानं म्हणाले, 'कळूं दे त्या कंसराजाला आमच्या राम—कृष्णाचा पराक्रम!' गोपांच्या लहान लहान मुली रथामागं धांवत येऊन म्हणाल्या, 'किष्ना, कुस्ती जिंकून ये. आम्ही तुला ओवाळायला येतोंच बघ!' कांहीं गोपींचो इच्छा मथुरेस यायची होती; पण मीं त्यांचं निवारण केलं आणि म्हटलं, 'कुस्ती मारून आल्यावर तुमच्याच घरीं जेवायला येऊं म्हणजे झालं. दहीं-दूध तयार ठेवा हं.' असं मीं म्हटल्यावर त्या शान्त झाल्या. रथांत बसतां बसतां एका गोपीनं माझे हातावर दहीं घातलं. तें मला इतकं पवित्र वाटलं कीं, अजून मी कोठं जायचं झालं तर हातावर दहीं मागून घेतों आणि तें खाऊन बाहेर पडतों.

यशोदामातेच्या पायां पडून आम्ही रथांत बसलों. मग अक्रूरानं कंसाचा सर्व बेत आम्हांला सांगितला. तेव्हां अंगांत वीरश्री चढली. राग अनावर झाला, आणि आम्हीं बेफामपणं वागायचं ठरविलं. नंदतात आमचे-बरोबर होतेंच. त्यांनीं राजाकरितां नेहमींप्रमाणें लोणी, खवा, भाज्या बरोबर घेतल्या.

आमचा रथ त्या वैभवसंपन्न मथुरानगरीजवळ येतांच अक्रूर मला म्हणाला, ‘ प्रथम माझ्या घरीं चला आणि माझा पाहुणचार घ्या. ’ तेव्हां मीं म्हटलं, ‘ आम्ही कंसराजाचे पाहुणे आहोंत ना ! तेव्हा आम्हांला प्रथम तिकडेच जायचं आहे. सायंकाळीं तुजकडे येऊं. आम्ही नगरीची शोभा पहात पहात धनुर्मखाच्या जागेकडे जातों. ’

मघाशीं तुम्हांला मीं सांगितलं कीं, वीरश्रीनं आमचे अंगांत संचार केला होता. आमच्या शक्तीची चुणूक मथुरानगरीच्या लोकांस दाखवावी असंहि आमच्या मनांत त्या वेळीं आलं. नगरींत आम्हीं प्रवेश केला तों तेथील रुंद व स्वच्छ रस्ते पाहून आम्हांला आनंद झाला. रस्त्याच्या दुतर्फा असलेलीं गृहं आज तोरणं लावून सुशोभित केलेलीं होतीं. उंच उंच माड्यां-मधून स्त्रिया अलंकृत होऊन आमचं हर्षभरानं स्वागत करीत होत्या. रस्त्यां-तहि आम्हांला पाहण्याकरितां स्त्री–पुरुषांची गर्दी झाली होती. मनुष्य अगोदरच स्तुतिप्रिय असतो; अन् त्यांत तो तारुण्यांत असला, आणि त्याचा जर अनेकांकडून गुणगौरव झाला तर मग काय विचारतां ! मनुष्याचं मस्त-कच फिरतं. सर्व कर्त्या पुरुषांचा असा अनुभव आहे कीं, मद्यापेक्षां स्तुतीनंच मनुष्याचं मस्तक अधिक प्रमत्त होतं. मद्याचा कैफ दोनचार घटकांत तरी उतरतो; पण स्तुतीचा कैफ मोठा पराजय होईपर्यंत उतरतच नाहीं. असो. लोकांच्या कौतुकामुळं आमच्यांत थोडासा प्रमत्तपणा आला असल्यास नवल तें काय !

नगरींतून जात असतां, आम्हाला कंसराजाचीं वस्त्रं धुणारा धोबी भेटला. आम्हीं मनांत म्हटलं, आपल्याला जर राजाच्या इथं जायचं तर खेड्यांतलीं वस्त्रं शोभावयाचीं नाहींत. म्हणून आम्हीं त्या धोब्याला म्हटलं, ‘ आम्हांलाहि यांतील कांहीं वस्त्रं दे.’ तो धोबी राजाच्या आश्रयानं फुगून गेला

होता. आमची वस्त्राची मागणी त्याला अर्थात् उद्धटपणाची वाटली. त्यानं आमच्या गांवढळ वेषाकडे तुच्छतेनं पाहिलं, आणि म्हटलं, ' राजाचीं वस्त्रं मागण्याचा उद्धटपणा पुन्हां करूं नको. पुन्हां मागाल तर तुम्हांला चांगली शिक्षा भोगावी लागेल. '

कृष्णानें डोक्यावरून हात फिरवीत म्हटलें, " कोणत्याहि स्वरूपाचा विरोध सहन करण्याच्या स्थितींत आम्ही त्या वेळीं नव्हतों. दादांनीं व मीं त्या परटावर एकदम हल्ला केला, व त्याला यथेच्छ बडवून मृतप्राय करून टाकलं. मग आम्हीं त्याच्याजवळच्या वस्त्रांतील दोन दोन वस्त्रं काढून घेतलीं, आणि तीं परिधान करून पुढं गेलों. राजदरबारांत जायचं तर प्रतिष्ठित लोकांच्या चालीप्रमाणं गळ्यांत पुष्पहार हवा, हें आम्हांला माहीत होतं. म्हणून आम्ही एका मालाकाराच्या दुकानांत गेलों, आणि त्याचेजवळ दोन हार मागितले. जगांत जशीं उद्धट स्वभावाचीं माणसं असतात त्याप्रमाणं गोड स्वभावाचीं माणसंहि भेटतात. आमचीं तारुण्यानं मुसमुसलेलीं शरीरं आणि बोलण्यांतील धीटपणा अवलोकून त्या मालाकाराला मोठं कौतुक वाटलं, अन् त्यानं हंसतमुखानं आमच्या गळ्यांत सुंदर हार घातले. सुंदर वस्त्रं मिळालीं, हारहि मिळाले; आतां राहिली चंदनाची उटी. म्हणून उटीचीं दुकानं आम्ही पाहूं लागलों. तों इतक्यांत तुमची सखी — ती बसली आहे ती, कुब्जा — आमच्या नजरेस पडली. तिच्या पाठीला थोडंसं पोंक होतं, पण मोठी चलाख आणि बोलण्यांत लाघवी होती. ती कंसाकरितां खास विलेपन तयार करून घेऊन जात होती. रोज नवीं नवीं सुगंधित विलेपनं तयार करण्याचं काम तिच्याकडे होतं. आम्हीं तिच्याजवळ आंगाला लावण्याकरितां उटी मागितली. तेव्हां तिनं प्रसन्न होऊन आमच्या अंगाला उटी लावली. तिचा सुगंध इतका टिकाऊ होता कीं अजून माझ्या अंगाला तो येत असतो. पेंद्या, पहा तर खरा, माझ्या हाताला सुवास अजून येतो आहे कीं नाहीं!"

पेंद्या पुढें होऊन म्हणाला, " कृष्णा, तूं कांहीं तरी बोलतोस. इतकीं वर्षं उटीचा गंध कसा रे राहील ! पाहूं तुझा हात. ( कृष्णाचा हात हातांत घेऊन ) मुळींच नाहीं येत वास !

कुब्जा—भाऊजी, त्यांच्या बोलण्याकडे काय लक्ष देतां?— ते माझी उगाच चेष्टा करतात.

कृष्ण—कृष्ण कधीं खोटं बोलत नाहीं. कुब्जेनं लाविलेल्या उटीचा सुगंध आज कृष्णाशिवाय इतरांना कसा येईल ? कुब्जेची भक्ति कृष्णच जाणूं शकतो, अन् भक्तीचा सुगंध चिरकाल टिकणारा असतो. असें म्हणून कृष्ण मूळ कथानकाकडे वळला.

अशा तऱ्हेनं लोकांनीं आमचं स्वागत केलेलं पाहून आम्हीं मनांत म्हटलं, कंस जरी आपल्या विरुद्ध असला तरी नगरवासीयांना आमच्याबद्दल प्रेम आहे, आस्था आहे, कौतुक आहे. तेव्हां आपणांला भिण्याचं कांहीं एक कारण नाहीं. या विचारानं आम्हांला अधिकच आवेश चढला.

"आम्हीं प्रथम धनुर्मखाच्या मंडपांत गेलों. तेथल्या रक्षकानं आम्हांला प्रथम अडवलं; त्याबरोबर आम्ही त्याच्या मुखांत चपराक मारून पुढं गेलों तों तेथें एका भल्या मोठ्या धनुष्याला पुष्पं वाहिलेलीं आम्हीं पाहिलीं. तें धनुष्य उचलून पाहूं का, असं आम्हीं तेथील अंमलदाराला विचारलं, तों तोहि आमच्या अंगावर आला. मग त्याला आम्हीं जमिनीवर लोळविलं. पूजा केलेलं तें प्रचंड धनुष्य उचलून मी वांकवूं लागलों, तों मनगटाच्या हिसक्यानं तें कडकड आवाज करून मोडून गेलं. तें प्रचंड धनुष्य आम्हीं मोडलेलं पाहून त्या यज्ञमंडपांतील सर्व रक्षक आमचेवर साहेजिक धांवून आले. मग काय! आमच्यांत मोठी मारामारी झाली. त्या धनुष्याचे तुकडे आम्हीं दोघांनीं घेऊन पहारेकऱ्याला यथेच्छ बडवून काढलं. इतक्यांत सायंकाळ झाली; म्हणून आम्ही अक्रूराला वचन दिल्याप्रमाणं त्याचे घरीं गेलों. तेथें भोजन केलं आणि निर्धास्तपणं झोंपीं गेलों."

रुक्मिणी—धनुष्य मोडून कंसाचा तुम्हीं अपराध केला होता. तेव्हां तुम्हांला रात्रीं निर्धास्तपणं झोंप हो कशी आली ?

कृष्ण— तें आतां कसं सांगतां येईल ? त्या वेळीं तारुण्याची मस्ती अंगांत होती; त्यामुळं आपल्याला कांहीं अपाय होईल ही कल्पनाच मनाला शिवली नाहीं. असं मन ज्याचं नाहीं त्यानं मोठ्या पराक्रमाची अपेक्षा ठेवूं नये. **पराक्रमी पुरुषाचं पहिलं लक्षण निर्धास्त निद्रा हें असतं.**

सकाळीं उठून आम्ही दोघे रंगमंडपांत जाऊं लागलों, तों एका आड-जागीं एक भला मोठा हत्ती आमचे मार्गांत आला. मीं माहुताला सांगितलं कीं, 'हत्तीला आवर' पण त्यानं तसं न करतां राजाच्या आज्ञेप्रमाणं त्या हत्तीला अंकुश टोंचून आमचेवर मोहरा करण्यास लावलं. मीं त्या हत्तीचा मोहरा चुकविला, आणि त्याला हुलकावण्या देऊन देऊन दमविलं. त्यानं मजवर जोरानं हल्ला केला होता, व मी तर त्याला हुलकावणी दिली, तेव्हां त्याचे दांत जमिनींत घुसले. त्यामुळं त्याला भयंकर वेदना झाल्या. पुष्कळ झटापटीनंतर मी त्या हत्तीला व माहुताला रक्तबंबाळ करून यम-सदनास पाठविलं. मग रक्तानं न्हालेल्या स्थितींत आम्हीं दोघांनीं रंगमंडपांत प्रवेश केला !

सत्यभामा— देवा, आजची कथा आम्हीं आतांपर्यंत कशीबशी ऐकली. ती ऐकावीशी वाटते.—पण आज तरी माझ्याच्यानं ती ऐकवत नाहीं. तुम्ही सांगतां रक्तानं न्हालेले असे आम्ही रंगमंडपांत गेलों. तें दृश्य लोकांच्यानं पाहवलं तरी कसं ! माझ्याच्यानं तो प्रसंग नुसता ऐकवतहि नाहीं. माझं मस्तक फिरूं लागलं आहे. तेव्हां, देवा, आतां ही भीषण कथा आज इथंच थांबवा.

रुक्मिणी— देवा, सत्यभामा म्हणते तें अगदीं खरं आहे. आतां पुरे !

कृष्ण—पुरे तर पुरे. आपल्याला काय ! तुम्हांला मी आज कंसवध करावा असं वाटत नसलं तर नाहीं करणार बापडा !

असें म्हणून श्रीकृष्ण उठला. मग सर्व मंडळी आपापल्या रथांत जाऊन बसली.

# ६

## अन्यायाचा प्रतिकार

दुसऱ्या दिवशीं सकाळीं कृष्णस्त्रिया एकमेकींकडे गेल्या, आणि कृष्णाच्या पराक्रमाच्या गोष्टींची चर्चा त्यांनीं आपापसांत केली.

सत्यभामा — काय ग जांबुवंतीदेवी, आपल्याला नव्हतं माहीत — देवांवर इतकीं संकटं आलीं होतीं म्हणून.

जांबुवंती — खरंच, किती कोवळं वय ! आणि केवढा पराक्रम ! आपल्याला त्या कथा नुसत्या ऐकवतदेखील नाहींत. आणि ह्यांनीं तर प्रत्यक्ष त्या झुंजी दिल्या. माझे वडील जांबुवंत, महा-पराक्रमी ! युद्धांत दमणं ही गोष्ट त्यांना कधींच माहिती नव्हती. एकदां ह्यांचा त्यांच्याशीं भयंकर सामना झाला. शेवटीं ह्यांचा पराक्रम पाहून माझे वडील थक्क झाले, आणि त्यांनीं मला ह्यांना अर्पण केली. तें युद्ध मीं प्रत्यक्ष पाहिलं आहे. माझ्या वडिलांची शक्ति आणि चिकाटी मोठी; पण यांचं चापल्य आणि कुस्तींतले डाव पाहण्यासारखे असत. ह्यांचे प्रतिपक्षी अंगबलानं यांच्यापेक्षां केव्हांहि अधिक असत; परंतु यांच्याजवळ पेचांची माहिती आणि ते घालण्याची तडफ अधिक,—यामुळं हे सर्वत्र यशस्वी होतात.

अशाच तऱ्हेची चर्चा रुक्मिणीच्या महालांतहि चालू होती. कृष्णाच्या पराक्रमाची गोष्ट अशी होती कीं, ती ऐकल्याशिवाय या स्त्रियांना राहवत नव्हतं, आणि ते युद्धांतले भीषण प्रकार ऐकवतहि नव्हते. असो. सायंकाळीं ठरल्या-प्रमाणं सर्व मंडळी द्वारकेच्या गोकुळांत जमली. कृष्ण कथेस आरंभ करून कृष्ण म्हणाला, " रंगमंडपांत पुष्कळ लोक जमले होते. कंसराजानं अनेकांना धनुर्यागाचीं निमंत्रणं पाठविलीं होतीं. आमच्या आप्तजनांनाहि निमंत्रणं होतीं. यामुळं यादवहि मोठ्या संख्येनं उपस्थित होते. रंगमंडपांत शिरतांच सभासदांनीं आमचं उत्साहानं स्वागत केलं, तेव्हां आम्हांला मोठा हर्ष झाला. आम्हीं सगळीकडे नजर टाकली, तेव्हां आम्हांला दिसलं कीं,

राजपक्षाचे पक्षपाती जे लोक तेथें होते, आणि मल्लांनीं जेथें ठाण मांडलं होतं, त्या भागांत मात्र आमचं स्वागत झालेलं नाहीं. राजाश्रित मल्लवर्ग बहुतकरून मोठा गर्विष्ठ असून द्वेष व तुच्छता बाळगणारा असतो. कंसाकडच्या मल्लांत मुष्टिक आणि चाणूर हे प्रमुख होत. ते महान् शक्तिमान्, मल्लयुद्धांत प्रवीण, आणि वृत्तीचे कठोर होते. त्यांना पाहतांच मला असं वाटलं कीं, हीं माणसं नाहींत,–क्रूर पशु आहेत. आज कंसानं त्यांना मोठ्या बक्षिसाची लालूच दाखवून आम्हांला मल्लयुद्धांत ठार मारण्याचा आदेश दिला होता. रंगणांत आम्ही दोघे प्रथम उतरलों. नंतर चाणूर मजकडे हंसत आला, आणि माझ्या पाठीवर थाप मारून म्हणाला, ‘ कृष्णा, तूं काय–मी काय, आपण कंसराजाचे प्रजाजन. त्याला कुस्त्या फार आवडतात. तरी आज तूं माझेपाशीं मल्लयुद्ध करून राजाला खुष कर. तो प्रसन्न झाला म्हणजे मग आपणांला कांहीं कमी नाहीं. ’

“ चाणूर मजपक्षां आकारानं व शक्तीनं किती तरी पट अधिक होता. पुष्कळशा लहान–मोठ्या कुस्त्या मारून त्यानं मल्लविद्येंत प्राविण्य संपादन केलं होतं. माझ्यासमोर उभा राहिला तेव्हां तो मला पर्वतासारखा भासला. मी अशा प्रसंगांना नवखा होतों, तरी अवसान धरून चाणूराला म्हटलं, ‘ कुस्ती करण्याची माझी तयारी आहे, पण आम्हां दोघांना ती खेळण्यास जोडीदार नकोत का ? ’

“ पण हें माझं साधं बोलणं तो ऐकायला तयार नव्हता. त्याला कुस्तीचा खेळ खेळायची इच्छाच नव्हती. मला ठार मारायचं त्यानं ठरविलं होतं; म्हणून तो मला दटावणीच्या भाषेंत म्हणाला, ‘ तुला मजबरोबर युद्ध करावं लागेल. राजाची तशी आज्ञा आहे. ’

हें उद्दामपणाचं भाषण ऐकून मलाहि खूप चेव आला, आणि आल्या प्रसंगास शक्ति-सर्वस्व खर्च करून तोंड द्यायचं मीं ठरविलं.

इकडे कंसराजाच्या मनाची परिस्थिति मोठी केविलवाणी झाली होती. ”

रुक्मिणी— कां बरं ? तुम्ही खासे त्यांच्या तावडींत सांपडलां, म्हणून त्याला आनंद व्हायला पाहिजे.

पेंद्या—वहिनी, अहो कंसाचा धीर गेला होता हें तुम्हांला माहीत नाहीं वाटतं? बरं, मी विचारतों, इतकीं वर्षं तुमच्या लग्नाला झालीं तरी कंसवधाची कथा तुम्हीं पूर्वी कृष्णाकडून ऐकली नाहीं वाटतं?

कृष्ण—अरे पेंद्या, लग्न झाल्यावर बायका पतीची कथा ऐकण्याऐवजीं आपलीच कथा पुनः पुनः सांगत असतात!

सत्यभामा—रुक्मिणीदेवींनीं नसेल विचारलं; पण मी तर विचारीत होतें ना?

कृष्ण—हो; पुष्कळदां माझी कथा तूं विचारलीस, पण तुझे सर्व प्रश्न रुक्मिणीच्या विवाहप्रसंगाबद्दल असत, नाहीं का? कंसवधाची कथा तूं एकदां तरी विचारलीस का?

सत्यभामा—भीषण प्रसंग माझ्याच्यानं ऐकवत नव्हते!

कृष्ण—आतां तरी ऐकवतात का?

सत्यभामा—असे अडवून कथा लांबणीवर टाकूं नका.

कृष्ण—आमचे कंसमामा मोठे शूर होते, पण उघड युद्धात; मनुष्य कपटानं एखाद्याचा घात करण्यास प्रवृत्त होतो त्या वेळेस त्याचं मन भित्रं बनतं. त्याचे पापी विचार त्याला खायला येतात. त्याचप्रमाणं आमच्या मामांना धनुर्यागाचे आदले दिवशीं भयंकर वाईट स्वप्न पडलं. त्यांचा मृत्यु त्यांना दिसूं लागला!—आणि ते मनांतून खूप घाबरून गेले. तरी पण त्यांनीं आज रंगमंडपांत येऊन आसनावर बसतांना मोठी ऐट आणली होती. त्यांची कावरीबावरी मुद्रा,—त्यांचे मनांत काय चाललं होतं हें सूक्ष्म रीतीनं पाहाणारास दिसत होतें. आम्हीं केलेल्या धनुर्भंगाचा आणि कुवलयापीडाच्या नाशाचा वृत्तान्त ऐकून त्यांना वाटलं, आकाशवाणीनं सांगितलेलं भविष्य खरं होणार!—हाच माझा भाचा—देवकीपुत्र माझा जीव घेणार!

अशा वेळीं, अशा स्थितींत मामानीं आम्हां दोघांना जवळ बोलावून प्रेम दर्शविलं असतं तर आम्ही दोघे त्यांचे हितकर्ते नसतों का झालों? पण आज कंसमामांची बुद्धि फिरली होती. त्यांना स्वहिताचे कोणतेच मार्ग दिसत नव्हते!

रुक्मिणी— दुष्टाला सुबुद्धि कशी बरं सुचणार?

कृष्ण— दुष्ट बुद्धीपेक्षां तो भविष्याच्या चिखलांत आज रुतला गेला होता. त्यांतून बाहेर पडण्याकरितां तो जे जे उपाय करीत होता ते ते त्याच्या अंगलट येत होते. असो. माझी आणि चाणूराची कुस्ती एकदम सुरू झाली, त्याच वेळीं मुष्टिकानं बलरामदादाशीं युद्ध सुरू केलं. मीं मगाशीं सांगितलंच कीं, हे योद्धे असामान्य वर्गातले होते. ते क्रोधवश झाले नसते, आणि प्रतिपक्षाच्या बलाबद्दल त्यांचे ठिकाणीं तुच्छता नसती तर आम्हां दोघांना जय मिळणं दुरापास्त होतं यांत संशय नाहीं. त्यांना वाटलं, हीं काय कालचीं कोंवळीं पोरं! एका थपडीसरशीं लोळवून टाकूं! पण युद्ध सुरू झाल्यावर त्यांना निराळाच अनुभव आला. आम्ही वयानं व आकारानं लहान होतों ही गोष्ट खरी, पण आमच्यांत चापल्य अधिक होतं.

रुक्मिणी— तुमचा पक्ष न्यायाचा होता ना! त्यामुळं तुमचं धैर्य अभंग राहिलं असेल!

कृष्ण— अगदीं खरं, त्रिवार खरं! **जे सत्याचे पक्षपाती असतात, त्यांचं धैर्य नेहमीं टिकतं.** कपट आणि दुष्ट वृत्ति या पुष्कळदां पराक्रमी पुरुषांचं धैर्य कमी करतात. तसं चाणूर आणि मुष्टिक यांचं झालं. मी जेव्हां चाणूराशीं भिडलों तेव्हां त्याची छाती धडधडतांना मला ऐकूं आली. त्याचे सर्वांगास दरदरून घाम सुटला होता. त्या घामानं माझे हात चिकट झाले, आणि मग चाणूराला पकडणं मला कठीण झालं. इतक्यांत माझी नजर तेथें ठेवलेल्या वाळलेल्या गोमयाच्या चुऱ्याच्या ढिगाकडे गेली. त्यांतला भुगा मीं घेऊन हाताचा चिकटपणा काढून टाकला. नंतर चाणूराजवळ माझं भीषण युद्ध झालं. त्यांत मल्लयुद्धांतील सर्व डावपेंच लढवावे लागले. शेवटीं हाय खाऊन चाणूर जमिनीवर पडला, आणि मग मीं त्याच्या छातीवर बसून त्याचे उरांत वज्रमुष्टी मारून मारून त्याचा प्राण घेतला!

तिकडे बलरामदादांनीं मुष्टिकालाहि यमसदनास पाठविलं. हें पाहतांच दरबारचे इतर मल्ल आमचे अंगावर चवताळून आले. असं होणार हें आम्ही ओळखूनच होतों. त्याच लंगोटावर आम्हीं या धांवून आलेल्या मल्लांशीं युद्ध केलं अन् सर्वांचा पराजय केला! हा विजय आम्हांला सहजासहजीं मिळाला नाहीं.

त्याकरितां प्राणान्तिक युद्ध करावं लागलं! आम्ही विजयी होऊन रंगणांत जेव्हां दंड ठोकून उभे राहिलों तेव्हां सर्व सभा थक्क झाली! कंसहि थक्क नव्हे तर बेभान झाला,-आणि कांहीं विचार न करतां एकदम त्यानं वसुदेवास आणि इतर वृष्णींस ठार मारण्याचा हुकूम दिला! इतर गोपालांचं सामानसुमान लुटा असं आपल्या सेवकास त्यानं सांगितलं. तातनंदांनाहि तुरुंगांत टाका!– हे कंसाचे शब्द ऐकतांच मी चिडलों — रागानं बेभान झालों. माझ्या प्रिय पित्यासहि हा दुष्ट राजा अकारण कैद करणार, तेव्हां आतां त्याची कसली उपेक्षा करायची? असा विचार क्षणार्धांत मनांत आला, आणि लगेच मीं चित्त्यासारखा राजाच्या सिंहासनाकडे धांवून त्याची गचांडी धरली. त्यानं हत्यार उपसून स्वतःचा बचाव करण्याचा प्रयत्न केला, पण तो व्यर्थ होता. नुकत्याच मिळालेल्या यशानं माझं अवसान चढलं होतं. मी कंसाला सिंहासनावरून फरफरा ओढीत रंगणांत आणलं, त्याच्यावर एकामागून एक मुष्टिप्रहार केले, – तेव्हां तो रक्त ओकून गतप्राण झाला!

अगोदरच तेथें चाणूर, मुष्टिक व इतर मल्ल रक्तबंबाळ होऊन मरून पडले होते. त्यांतच आतां राजाच्या प्रेताची भर पडली. आमचीं अंगेंहि रक्तानं माखलेलीं होतीं. कंसाला मारल्यावर आम्ही दोघे विजयानंदानं दंड ठोकून उभे राहिलों, त्या वेळेला सर्व सभा स्तंभित झाली. आपण कुस्त्यांची मौज पाहण्याला आलों काय, आणि राजासकट इतर मल्ल मरून पडतात काय? राज्यक्रान्तीचाच तो समय! सत्ता कोणाच्या हातांत जायची हा प्रश्न होता. जनता आमच्या बाजूची होती यांत संशय नाहीं; आणि आम्ही जर मनांत आणलं असतं तर लोकांनीं मोठ्या खुषीनं दादांना राजे म्हणून निवडलं असतं. पण आम्ही कंसाचं राज्य घ्यायला आलोंच नव्हतों. ही कल्पनाहि आमचे मनास केव्हांच शिवली नव्हती. कुस्तींत विजय मिळवावा, आणि आम्ही चिरडून टाकण्याइतके क्षुल्लक नाहीं, असं राजाला दाखवावं, एवढीच आमची महत्त्वाकांक्षा होती; पण कंस जेव्हां माझ्या कुलावर, विशेषतः माझ्या जनकावर उलटला, तेव्हां त्याचं पारिपत्य केल्याशिवाय गत्यंतर नाहीं असं माझ्या मनानं घेतलं; पण हें पुष्कळांचे ध्यानांत त्या वेळींहि आलं नाहीं.

कंसवधानंतर आम्ही दोघे आमचे जनक–माता–पितरांस वंदन करण्या-

कंस-कंदन !



देवकीचा अत्यानंद

करितां गेलों. या वेळेपर्यंत आमचे जनक कोण याची आम्हांला कल्पना आली होती. आम्हां दोघांना पाहतांच तात-मातेच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या! इतक्यांत कंसाच्या स्त्रिया दीर्घ शोक करीत तेथें आल्या. त्यांनीं जो शोक केला तो आमच्याच्यानं ऐकवेना. कंसराजा गेल्यामुळं त्याचे वडील जे उग्रसेनमहाराज यांची कारागृहांतून मुक्तता करणं सुलभ झालं. ते कंसस्त्रियांसह आम्हांकडे आले आणि मला म्हणाले, 'कंस आपल्या पापानं मेला आहे. वैर मरणापर्यंतच असूं शकतं. तरी आतां त्याच्या मृत देहाची क्रिया करण्यास आम्हांला आज्ञा दे.'

"मीं विनम्र होऊन म्हटलं, आजोबा, 'आपणच राज्याचे अधिकारी आहां. मला राज्य नको, आपणच हें राज्य स्वीकारा!'

"या माझ्या उत्तरानं राज्यक्रान्तीचा व तदनुषंगानं होणाऱ्या रक्त-पाताचा प्रसंग टळला. आज फक्त काय झालं—कांहीं थोडेसे प्रसिद्ध मल्ल आणि स्वतः राजा काय तो मेला. बाकी सर्व राज्यकारभार आणि अधिकारीवर्ग जसाच्या तसाच कायम राहिल्यामुळं लोकांना धीर आला. यानंतर आम्हीं सर्वांनीं कंसाच्या मृत देहाचं राजाला शोभेशा वैभवानं दहन केलं."

उग्रसेनराजांना लवकरच राज्याभिषेक झाला. यानंतर परागंदा झालेले माझे यादव नातेवाईक परत मथुरेंत आले. त्यांचीं जप्त झालेलीं घरंदारं त्यांस परत मिळालीं. तातनंदांचं आम्ही पूजन करून, त्यांना वस्त्रं-भूषणं देऊन त्यांना गोकुळाकडे पाठवून दिलं. माझ्या जनकजननींची मला जरी आतां ओळख पटली, तरी ज्यांनीं माझं पुत्रवत् लालनपालन केलं, त्यांचेबद्दलचा माझा स्नेह आजहि कायम आहे, आणि तो आमरण राहीलच.

रुक्मिणी—देवा, मग तुम्ही लगेच गोकुळांत पुन्हां गेलां असाल, आणि तेथें तुमचा मोठा सत्कार झाला असेल?

कृष्ण—मी इतर दृष्टींनीं सुदैवी असलों तरी गोकुळांत परत जाण्याची संधि मला अनेक कारणांनीं पुन्हां मिळाली नाहीं. त्यामुळं मी स्वतःला तेवढ्यापुरता हतभागी समजतों. उग्रसेनराजे आतां वृद्ध झाले होते. त्यांच्या-च्यानं राज्याचा भार उचलून तें चालविणं शक्य नव्हतं. लोकांची मदार आतां

आमच्यावर होती. कंसाच्या कारभारी मंडळानं व तातवसुदेवांनीं आम्हांला सांगितलं कीं, 'राम-कृष्णांनो! तुम्हांला आतां ह्या राज्याचा भार उचललाच पाहिजे. हा क्रान्तीचा समय आहे. आज दिसत नसली तरी लौकरच राज्यांत बंडाळी माजेल, किंवा आपल्या राज्यावर आक्रमण होईल. तरी आतां तुम्हांला मथुरेंतून कोठेंच जातां येणार नाहीं.' आम्हीं गोकुळ सोडल्यावर राजकारणाच्या लहानमोठ्या प्रवाहांत जे एकदां सांपडलों ते अजून बाहेर पडलों नाहीं. वाढत्या वयाबरोबर आतां नवी नवी जबाबदारी आमचे अंगावर पडत गेली, आणि मग मला माझ्या गोकुळच्या सुखद स्मृती आठविण्यांतच समाधान मानून घ्यावं लागतं.

सत्यभामा—मग तुम्ही केव्हांच का गोकुळाला गेलां नाहीं? तेथें तुमच्या मित्रांनीं तुमचा विरह कसा सहन केला?

कृष्ण—कांहीं वर्षांनीं गोकुळवासीयांचं सान्त्वन करण्याकरितां बलरामदादा गेले. त्यांचं तेथें मोठ्या प्रेमानं स्वागत झालं. चार दिवस तेथें राहून नंतर दादा परत आले. सत्यभामेनं प्रश्नच काढला आहे म्हणून आणखी कांहीं गोष्टी गोकुळवासीयांबद्दल सांगतों.

मथुरेंतील राज्यक्रान्तीचा परिणाम आमच्या चिमुकल्या गोकुळावरहि झाला. पुष्कळसे माझे हुशार सौंगडी तें ग्राम सोडून मथुरेंत आले. त्यांना अर्थात् मीं लहानमोठ्या नोकऱ्या दिल्या. ज्या गोपी अविवाहित होत्या त्यांचीं आतां लग्नं होऊन त्या निरनिराळ्या गांवीं संसार करीत आहेत. कांहींना मुलं;-नातवंडं झाल्यामुळं त्यांत त्या रमल्या आहेत. आमच्या पिढींतील फारच थोडे लोक आतां गोकुळांत शिल्लक असतील. कालान्तरानं ग्रामाच्या वस्तींत सारखा फरक होत जातो. जुनी पिढी काल-ओघांत विलीन होते, आणि तिचं स्थान नवी पिढी घेते. आज जर मी गोकुळांत पुन्हां गेलों तर मला ओळखणारा एक तरी मनुष्य तेथें असेल कीं नसेल कोण जाणे! आमच्या आठवणी कांहीं लोकांना असतील, ते लोक एकमेकांना त्या सांगत असतील. अशा स्थितींत तेथें परत जाण्यांत तरी स्वारस्य काय? बरोबरचे लोक गेल्यावर जन्मस्थानाची रम्यताहि कमी होते. फक्त पूर्वस्मृतीमध्येंच आनंद देण्याची शक्ति असते.

असो, आज आतां ही कथा येथेंच संपवितों. यापुढं मजवर आणि माझ्यामुळं मथुरेच्या राज्यावर कशीं संकटं आलीं याचं निवेदन उद्यां करूं.

रथांतून परत येतांना रुक्मिणी कृष्णास म्हणाली, “आपल्या पराक्रमाला तोड नव्हती. एवढ्या मोठ्या सत्तेशीं आपण एकट्यानं झुंज घेऊन त्यांत यश मिळविलं हें आश्चर्यकारक नाहीं का?”

कृष्ण—यांत माझ्या एकट्याचा पराक्रम नाहीं. दादांचा पराक्रम मजपेक्षांहि मोठा होता; पण कंसाचा रोख मजवर असल्यामुळं, आणि माझे हातून कंस मेल्यामुळं माझं नांव लोकांना अधिक माहिती झालं. शिवाय मी लोकांत दादांपेक्षांहि अधिक मिसळतों, गप्पाहि अधिक मारतों. त्यामुळं लोक मला अधिक ओळखतात. मग तुम्हाला वाटतं—सर्व कांहीं मींच केलं. प्रत्येक युद्धांत दादांचा भाग फार मोठा असतो; परंतु युद्धानंतरच्या वाटाघाटींत ते फारसे पडत नाहींत. त्यांचा नांगर बरा अन् ते बरे! खरा संन्यस्त आणि योगी निरिच्छ पुरुष जर कोणाला पाहायचा असेल तर त्यानं दादांना जरूर पाहावं.

सत्यभामा — देवा, तुम्हां दोघां बंधूंचे स्वभाव इतके भिन्न असतां तुमचं सख्य अजूनपर्यंत कसं हो राहिलं?

कृष्ण—त्या प्रश्नाचं उत्तर आमच्या नित्य व्यवहारांत सांपडेल. तुम्हीं पाहिलंच असेल, कीं मजपेक्षां दादा पुष्कळच तापट आहेत; परंतु त्यांचा राग जसा एकदम वाढतो—तसाच तो निवतोहि. मीं त्यांची नाडी ओळखली आहे. मी नेहमीं प्रथम त्यांच्या कलानं घेतों; तसं घेतलं म्हणजे मग कांहीं काळानं ते आपला हट्ट सोडून देतात. शिवाय बारीकसारीक गोष्टींत ते कधीं लक्ष घालीत नाहींत. त्यांचा आपला धोपट मार्ग! आमच्या आजपर्यंतच्या सख्याची मुख्य किल्ली म्हणजे आमचं एकमेकांवरचं अकृत्रिम प्रेम! दादांच्या यशांत मला आनंद वाटतो, आणि मीं मिळविलेल्या यशाचा त्यांच्याइतका दुसऱ्या कोणासहि अभिमान वाटत नाहीं. भाग्यानं असा उदार भाऊ मिळतो; परंतु पुष्कळांना असा लाभूनहि त्याचं प्रेम संपादण्याची बुद्धि त्यांना होत नाहीं. त्यामुळं ते दुःखी होतात. दादांना गदायुद्धाप्रमाणंच शेतीची मोठी आवड. या आवडीमुळं त्यांनीं या प्रदेशाची केवढी सुधारणा

केली आहे! म्हणून तर आपले लोक समृद्ध अन् सुखी आहेत. कोणी तरी अशा उत्पादक कार्यास वाहून घेतल्याशिवाय घरांत लक्ष्मी नांदायला येत नाहीं.

सत्यभामा—देवा, मल्लविद्या आणि कृषि यांशिवाय तुमच्या भावाची तिसरी आवडती गोष्ट मला माहिती आहे.

कृष्ण—ती कोणती?—सांग पाहूं.

सत्यभामा—मद्यपान!

कृष्ण—हो; मद्यपानाच्या बाबतींत त्यांचं मन त्यांच्या स्वाधीन राहात नाहीं, असं जर तुला म्हणायचं असेल तर तें कांहीं अंशीं खरं आहे. पण तुला दादांची दुसरी गोष्ट माहिती नाहीं. ते एकदां आपल्या कृषीच्या कामांत गुंतले म्हणजे त्यांना मद्याची आठवण कित्येक महिने होत नाहीं, हें मीं पाहिलं आहे. कोणीं जर आग्रह केला तर त्यांच्यानं नकार देववत नाहीं ही गोष्ट खरी. मनुष्य कितीहि ज्ञानी झाला तरी त्याचे पूर्वसंस्कार त्याला सोडीत नाहींत. यामुळं इतर बाबतींत श्रेष्ठ असणारीं माणसं एखादद्दुसऱ्या बाबतींत घसरलेलीं दिसतात. त्या दोषांची जाणीव एखाद्या गुरूनं जर त्यांना योग्य समयीं करून दिली तर थोर लोकांचे अल्प-स्वल्पहि दोष—अग्नींत काष्ठ जसं जळतं तसे जळून जातात.

निंदा-स्तुतींत आपला पति ओढला जाऊं शकत नाहीं हें पाहून कृष्ण-स्त्रिया गप्प बसल्या. थोड्या वेळांत कृष्णाचा रथ त्याच्या मंदिरासमोर येऊन थडकला.

## ७

## गुरु बंधूचें हार्दिक स्वागत

आज सकाळीं श्रीकृष्णानें आपलें आह्निक आटोंपून दारुकास सांगितलें कीं, ‘ दक्षिण वेशीबाहेर जी धर्मशाळा आहे तिकडे आपल्याला प्रथम जायचं आहे. तरी त्या दिशेनं रथ न्यायचा. ’

रथांत बसण्यापूर्वी त्यानें रुक्मिणीस दासीकडून बोलावून घेऊन सांगितलें कीं, “ मी आज गांवावाबाहेर उतरलेल्या माझ्या जुन्या मित्रास भेटण्यास जात आहें. माझा तो सहाध्यायी आहे. पूज्य सांदीपनीगुरुजींच्या इथं आम्ही बरोबरच शिकलों. त्याचा स्वभाव निरिच्छ आणि भिडस्त असा आहे. त्याचं स्वागत आपल्या येथें विशेष चांगलं झालं पाहिजे, बरं का ? ”

रुक्मिणीनें सुचविलें, “ आपण स्वतः कशाला जातां ? एखादा अधिकारी त्यांना घेऊन येण्यास पाठविला तर नाहीं का चालणार ? ”

कृष्ण—तो माझा गुरुबंधु आहे. त्याचं-माझं नातं बरोबरीचं आहे. तेव्हां मीच स्वतः त्याला आणायला गेलं पाहिजे. रुक्मिणी, तुझा भाऊ जर येथें आला तर तूं जितक्या आस्थेनं-हौसेनं त्याचं स्वागत करशील तितक्याच आस्थेनं सुदामदेवांचं स्वागत व्हावं अशी माझी अपेक्षा आहे.

रुक्मिणी—भावाचं थाटानं स्वागत करायचं आहे कुठं माझ्या नशिबांत ! तो जर जरा नीट वागेल तर त्याचं स्वागत मी अशा थाटानं करीन कीं—

कृष्ण—( तिला अडवून थोड्याशा अधिकारवाणीनें ) तसं कांहीं कधीं घडण्याचा संभव दिसत नाहीं आणि—तसा असला तरी तुझ्या भावाचं थाटानं स्वागत मी करूं देणार नाहीं !

रुक्मिणी थोडी चिडून म्हणाली, “ कां ? माझा कांहीं या घरांत हक्कच नाहीं कीं काय ? ”

कृष्ण—तुला सर्व हक्क आहेत. फक्त माझे घरांत कलहाग्नि उत्पन्न करण्याचा तुलां अधिकार नाहीं !

रुक्मिणी—म्हणजे, मी का कधीं कलहाग्नि उत्पन्न केला आहे ?

कृष्ण—अग, तूं जर भावाचं थाटामाटानं स्वागत केलंस तर लगेच सत्यभामेला मत्सर वाटून तुझ्यापेक्षांहि ती मोठ्या स्वागताच्या तयारीस लागेल. मग इतरहि स्त्रिया आप्तांच्या स्वागताच्या बाबतींत चढाओढ लावतील. मग धुसफुशी वाढतील,—म्हणून मीं म्हटलं कीं, तुझ्या भावाचं स्वागत थाटानं करण्याची मी परवानगी देणार नाहीं ! पण जाऊं द्या, तुझा भाऊ कोठें यायला बसला आहे ! बरं, मग ठरलं ना ! हें सुदामदेवांचं स्वागत करण्याची जबाबदारी तुजवर ! मी आपला त्याच्याजवळ गप्पा मारीत बसेन.

कृष्णानें आज साधीं वस्त्रें परिधान केलीं होतीं. धर्मशाळेपासून रथ दूर उभा करून सुदाम्याच्या भेटीस तो गेला. दोघांच्या भेटीला फार फार वर्षें झालीं असल्यामुळें सुदाम्यानें प्रथम कृष्णाला ओळखलें नाहीं. तेव्हां कृष्णच थोडया तिऱ्हाईतपणानें सुदाम्याला म्हणाला, " भू-देवा, आपण किमर्थ द्वारकेला आपल्या शुभ आगमनानं पावन केलंत ? आपलं शुभ नाम विचारण्याची मी परवानगी घेऊं का ? "

सुदामा—मला कृष्णराजाची भेट घ्यायची आहे.

कृष्णानें मान हालवून थोडीशी आश्चर्यचकित मुद्रा करून म्हटलें, " देवा, आपण गांव किंवा नांव कांहीं तरी चुकलांत. द्वारकेंत कृष्णराजा या नांवाचा कोणीहि मनुष्य नाहीं. एक गोपालकृष्ण नांवाचा मनुष्य आहे. गोपालकृष्णाचे वडील मात्र येथें राजे आहेत. आपल्याला त्यांना भेटायचं आहे का ?

सुदामा—नाहीं. गोपालकृष्ण माझा सहाध्यायी होता; पण बरेच वर्षांत त्याची-माझी भेट नाहीं. तो आतां द्वारकाधीश झाल्याचं ऐकतों. तो मला आतां ओळखील कीं नाहीं हें सांगतां येत नाहीं.

कृष्ण—कां नाहीं ओळखणार ? मनुष्य पुढच्या पुढच्या ओळखी एक वेळ विसरेल; पण गुरुगृहांतील प्रसंग आणि मित्र तो विसरूं शकत नाहीं. त्याच्या-माझ्या पुष्कळ गप्पा होतात. गुरुगृहींच्या गोष्टी सांगायचं त्याला

वेडच आहे. त्याचा एक सुदामा या नांवाचा बुद्धिमान् सहाध्यायी होता. कृष्ण नेहमीं सांगतो कीं, वेदाध्ययनांत सुदाम्यानं आम्हांला कधीं पुढं जाऊं दिलं नाहीं!

सुदामा— अहो सुदामा-सुदामा म्हणून ज्याचं नांव तुम्हीं कृष्णाचे तोंडून ऐकलं तोच मी दरिद्री ब्राह्मण! अहो, आमचा कृष्ण मोठा वस्ताद. तो तुम्हांला आपल्या स्वतःच्या गुणांचा कधीं पत्ता लागूं द्यायचा नाहीं. खरं सांगूं?— तो काळ्या काळ्याभोऽर सुंदर डोळ्यांचा कृष्ण, अन् त्याचा गोरागोरा घाऱ्या डोळ्यांचा भाऊ—काय बरं त्याचं नांव—

कृष्ण— बलरामदादा.

सुदामा— अगदीं बरोबर. आतांशीं म्हातारपणामुळं स्मृति तितकी पूर्वी सारखी राहिली नाहीं. काय बरं,मी सांगत होतों? हं,-ते दोघे भाऊ राम व कृष्ण महा बुद्धिमान्. कोणतीहि विद्या आकलन करण्यांत ते नेहमीं माझ्यापुढं किती तरी जायचे. मी आपला मागं पडून निराश व्हायचा. पण कृष्णानं मला नेहमीं धीर द्यावा, आणि म्हणावं, 'सुदामा, तुला येतं पुष्कळ रे! पण उत्तरं देतांना तूं नेहमीं घाबरतोस. तुला आत्मविश्वास नाहीं. धीटपणानं उत्तरं द्यावींत. चुकलं तर चुकलं. —पण मला तें कधींच साधलं नाहीं. मी आपला नेहमींचाच शंकेखोर. आतांच पहा, कृष्ण आपल्याला ओळखणार नाहीं अशी शंका घेऊन मी परत जायला निघालों होतों;— पण बरं झालं, तुम्ही भेटलांत!

कृष्ण— बरं झालं, मी सहज इकडे आलों. तुम्हांला कृष्णाकडेच जायचं आहे ना?— मीच घेऊन जातों.

कृष्णानें सुदाम्याचा हात हातांत घेतला अन् तो म्हणाला, "देवा, चला."

चालतां चालतां कृष्णानें त्याला हळूच विचारलें, "भू-देवा! मित्राकरितां कांहीं भेट आणली असेल तर ती द्या बरोबर. कृष्णाला कोणीं पोह्यांची भेट आणली म्हणजे तो खुष. या वयांतहि त्याची पोह्यांची चटक पूर्वींसारखीच आहे.

सुदामा— अहो, कृष्णाला चटक शक्यच नाहीं. आपण खादाड आहों असं तो आम्हांला भासवील. खायचे पदार्थ गुरुपत्नीजवळून तो भांडून भांडून घ्यायचा आणि मग ह्याला-दे, त्याला दे, याच्या तोंडांत बळंच घांस कोंब, असं करायचा. त्याची आसक्ति जर कशांत असेल तर बंधुप्रेमांत !

कृष्णानं यावर कांहीं न बोलतां सुदाम्यास रथांत बसविलें. दारुकास नजरेनें सुचविलें कीं, तूं दुसऱ्या मार्गानें स्वगृहीं चालत जा. सुदाम्याला रथांत बसविल्यावर कृष्णानें घोड्यांचे लगाम हातांत घेतांच घोडे फुरफुरून नाचायला लागले. हें पाहून सुदामा म्हणाला, " घोड्यांचं तुमच्यावर विशेष प्रेम दिसतं. कृष्णाचं जनावरांवर मोठं प्रेम. गुरुजी आम्हांला अश्वविद्या शिकवितांना म्हणत, ' घोडयांना तुमची थाप कळते. तुमचे ठिकाणीं त्यांचे-बद्दल प्रेम असलं तर तुमच्या इशाऱ्याबरोबर ते चालतील, नव्हे जिवाचं रान करतील. ज्याला क्षणोक्षणीं चाबूक मारावा लागतो तो सारथीच नव्हे. ' काय हो, तुम्ही सारथ्यकर्म कृष्णाजवळ शिकलां वाटतं ? रथ किती लीलेनं चालवितां हो ! "

यावर कृष्ण कांहींच बोलला नाहीं. मंदिराजवळ रथ उभा करून कृष्ण सेवकास म्हणाला, "भू-देवांना कृष्णजींकडे जायचं आहे; तरी त्यांची भेट करव." असें म्हणून कृष्णानें सुदाम्यास अभिवादन करून तो तडक मागील दरवाजानें मंदिरांत शिरला, आणि झटपट वेष बदलून सुदाम्याचें स्वागत करण्याला तयार झाला. त्याचे मागोमाग रुक्मिणीदेवी आरती घेऊन उभी होतीच. तिनें सुदाम्यास ओवाळलें. यानंतर कृष्णानें नव्या वेषांत सुदाम्यास गाढ आलिंगन दिलें, आणि त्यास आग्रहानें आपल्या आसनावर बसवून घेतलें. सुदामा प्रथम थोडा बुचकळयांत पडला. तो मनांत म्हणाला, ' आपल्याला घेऊन येणाऱ्या गृहस्थाचा तोंडवळा ह्या कृष्णासारखाच दिसतो आहे. संशय कसला, तोच हा कृष्ण ! ' ओळख पटल्यावर सुदामा एकदम कृष्णाला म्हणाला, " कृष्णा, एवढा वयानं मोठा झालास तरी तुझा नटवा स्वभाव कांहीं अजून जात नाहीं. तरी मला वाटतच होतं, कीं हाच

कृष्ण असावा. कृष्णाशिवाय इतकं सहज लीलेनं सारथ्य दुसरा कोण करूं शकणार?"

रुक्मिणीदेवीला मध्येंच बोलण्यास ही संधि मिळाली. ती पुढें येऊन म्हणाली, "बरंच बिंग काढलंत, भाउजी! आम्हांला सदान्कदा अजून फसवीत असतात!"

सत्यभामा मागून पुढें येऊन म्हणाली, "मी देवींच्या वतीनं साक्ष देतें. परवां माझे महालांत हे गवळ्याच्या वेषांत लोण्याची भेट घेऊन आले. ह्यांना लोणी फार आवडतं, आणि यांनीं आणलेलं लोणी निर्मळ दिसलं म्हणून मीं दासीला म्हटलं कीं, 'तें ठेवून घे, आणि गवळ्याला परत भेट म्हणून फळं दे.' शेवटीं यांनीं वेष टाकून दिला आणि खो खो हंसूं लागले!"

कृष्ण—(मोठ्या आवाजांत) भाउजींची विचारपूस करायची, त्यांना अर्घ्यपाद्य द्यायचं तें राहिलं बाजूलाच, आणि घरच्या माणसाच्या चुगल्याच सांगत बसलांत! सुदामदेव हंसतील कीं तुम्हांला!

सुदामा स्मित करून म्हणाला, "कृष्णा, तुझ्याविरुद्ध तक्रारी सांगतांना-सुद्धां यांना गुदगुदल्या होत आहेत असं दिसतं."

रुक्मिणी-- (सत्यभामेस) सत्यभामा, हे आपले सुदामभाउजी. ही सर्व मंडळी गुरुगृहीं एकदम शिकत होती. आजचे आपले पाहुणे मोठे विद्वान्, निःस्पृह ब्राह्मण आहेत असं ऐकतें. चला, ह्यांना आपण अर्घ्यपाद्य देऊं.

कृष्ण-- अर्घ्यपाद्य अवश्य द्या; पण उपाहार देऊं नका हं. यानं वहिनींनीं पाठविलेली भेट मला अजून दिलेली नाहीं.

रुक्मिणी-- हें काय! तुम्ही काय अजून अनिरुद्धासारखे खाऊ मागायला लहान बालक आहांत वाटतं? तुमचा बालस्वभाव जाणार तरी कधीं?

यानंतर रुक्मिणीनें अर्घ्यपाद्य आणलें, आणि सुदाम्याची ती पूजा करूं लागली. तों कृष्ण पुढें येऊन म्हणाला, "हं; रुक्मिणी, हे तुझे लाड मी चालूं देणार नाहीं. पारिजातकाचीं दोन फुलं पाहिजे तर जास्त माग, पण माझ्या मित्राची पूजा मी तुला माझे अगोदर करूं देणार नाहीं."

सुदामा-- अशीं तुम्ही आपआपसांत भांडूं लागलां तर माझे कसें होणार ?

यानंतर सुदाम्यानें पति-पत्नींनीं दिलेलें अर्घ्यपाद्य प्रेमानें स्वीकारलें. मग गुरुबंधूंचें एकत्र भोजन झालें, आणि दोघांनीं नंतर विश्रान्ति घेतली.

## पाहुणचार

सुदाम्याला कृष्णानें व रुक्मिणी-सत्यभामा इत्यादि स्त्रियांनीं रोज अभ्यंग-स्नान घालावें, कृष्ण स्वतः त्याच्या वस्त्राच्या निऱ्या करी. रोज नवे नवे खाद्य पदार्थ करण्यांत येत. कृष्णाचा आग्रह कांहीं विचारूं नका. सुदामदेवानें म्हणावें, " कृष्णा, मला नाहीं रे असल्या पक्वान्नाच्या सेवनाची संवय, बलरामदादांनीं सुदाम्याला आपल्या घरीं नेऊन त्याचें खूप आतिथ्य केलें. पण सुदाम्याला बलरामदादाच्या गृहापेक्षां कृष्णाच्याच गृहांत अधिक मोकळेपणा वाटे. कारण दादा स्वभावाचे मोठे तापट ! ते घरांत आले कीं ज्याच्या त्याच्या अंगावर ओरडत. हें चुकलें, तें चुकलें, ही वस्तु येथें कां— जेवणास केलेल्या पदार्थांत जरा तिखट-मीठ कमीजास्त झालं--किंवा त्यांना तसा भास झाला कीं एकदम आपल्या पत्न्यांवर दुसऱ्यांच्यादेखत ओरडायचे; पण सुदाम्याशीं मात्र अगदीं सख्ख्या भावासारखी वर्तणूक. सुदामा मनांत म्हणे, दादांचें प्रेम मोठें, पण एकंदर त्यांच्या घरचें वातावरण तप्त आणि उग्र. यापेक्षां कृष्णाचे घरीं किती मौज ! त्याचीं खोडकर भाषणें तीसुद्धां ऐकणाराला सुखवीत. असो. सुदामा यामुळं कृष्णाच्याच घरीं दादांच्या गृहापेक्षां अधिक दिवस राहिला. एक दिवस कृष्णाचे पुत्रांनीं सुदामदेवांस म्हटलें कीं, " तुम्ही तातांबरोबर गुरुगृहीं होतां तेव्हां त्यांचं तेथील चरित्र तुम्हीं सांगावं अशी इच्छा आहे. "

कृष्ण— वाहवा ! मित्राच्या तोंडांतून त्या मधुर दिवसांचा वृतान्त ऐकणं मलाहि आवडेल. तुझ्या तोंडून उपनिषदं मला ऐकायचीं आहेत; पण तत्पूर्वी गुरुगृहवासाच्या आठवणींचं प्रवचनच तूं सुरू कर. या प्रवचनानंतर सत्यभामा तुला मोठी दक्षिणा देईल, बरं का !

सत्यभामा—भाउजी, हे पहा आतां उगाच माझे वाटेस जात आहेत ! दक्षिणेचा प्रश्न यांनीं उगाच कां काढावा ?

कृष्ण— मग काय, सत्पात्र ब्राह्मणाला दक्षिणा द्यायची नाहीं वाटतं? बरं तर मग, रुक्मिणी देईल !

रुक्मिणी— आमच्यांत भांडणं लावून गंमत पहायची ह्यांना आहे खोड. सत्यभामा, आपण भाउजींची स्वतंत्र पूजा करूं, बरं का ! प्रवचनाबद्दल यांनींच मित्राचा सत्कार केला पाहिजे.

सुदामदेवानें नाहीं हो म्हणतां म्हणतां गुरुगृहवासाची हकीकत सांगण्यास आरंभ केला. त्या वेळीं कृष्ण-स्त्रिया व कृष्णाचे पुत्र-पौत्र-स्नुषा— सर्व जण श्रोतृवर्गांत बसलीं होतीं.

सुदाम्यानें सगळ्यांकडे पाहिलें आणि म्हटलें, " आज माझ्या परमभाग्याचा दिवस उगवला असं वाटतं. आमच्या नवतारुण्यांतील मैत्रींत एवढंदेखील अंतर पडलेलं मला दिसत नाहीं. माझ्या मित्राचा संसार म्हणजे या भूलोकांतील स्वर्ग आहे. स्वर्गांत उद्योगाला स्थान नाहीं. येथें स्वपराक्रमाचा आनंद तुम्ही भोगीत आहांत. आकाशगंगेपेक्षांहि पवित्र अशी जी प्रेमगंगा तींत स्नान करतांना तुम्हांला पाहून मलासुद्धां तुमचा हेवा वाटतो. तुमच्या घरच्या मिष्टान्नापेक्षां तुमचे सुखसंवाद मला अधिक रुचकर वाटले. या तुमच्या आनंदांत आमच्या गुरुगृहवासांतील आठवणींचा आनंद मी आतां मिसळून देतों. कृष्णाच्या मुखांतून जर हे अनुभव तुम्हांला ऐकायला मिळाले असते तर बरं झालं असतं; पण तुमचा सर्वांचा आग्रह आहे, तेव्हां माझा निरुपाय आहे.

" माझ्या वडिलांचं मूळचं नांव मला माहीत नाहीं; पण लोक त्यांना गमतीनं ' गजाननसरस्वती ' म्हणत. ते प्रकाण्ड पंडित होते. त्यांचा स्वभाव फार तापट. एकदां पाठ त्यांनीं दिला कीं तो विद्यार्थ्यानं ताबडतोब कंठस्थ केला पाहिजे अशी त्यांची अपेक्षा. मला तें कांहीं जमायचं नाहीं, आणि मग ते मला टाकून बोलत. मुष्टिमोदकहि पुष्कळ चारीत. माझ्या मातेला तें खपत नव्हतं. ती म्हणे, ' तुम्ही असाल मोठे पंडित, पण मुलांना विद्या शिकवायचं तुम्हांला साधत नाहीं. तुम्ही आपलं त्याला दुसऱ्या गुरुकडेच अध्ययनाकरितां पाठवा. '

"वडिलांनीं तें मान्य केलं, आणि उज्जयिनीच्या सांदीपनी काश्य नांवाच्या प्रसिद्ध गुरूंकडे मला पाठविलं. गुरुजी अनेक शास्त्रांत जसे निष्णात होते तसे ते अखंड विद्या–व्यासंगीहि होते."

कृष्ण—( मध्येंच ) आजहि आहेत. येथेंच असतात. आपण भेटूं कीं त्यांना!

सुदामा— महत् भाग्याची गोष्ट आहे! कांहीं दिवस गेल्यावर गुरुजींकडे एक वृद्ध गृहस्थ आला. त्याचे नेत्र तेजस्वी व मुद्रा सौम्य दिसत होती. पोषाखावरून हा कोणी राजा किंवा राजपुरुष असावा असं मला वाटलं. त्यानं गुरुजींस अभिवादन केलं. नंतर दोघांचं एकान्तांत कांहीं भाषण झालं. नंतर तो गृहस्थ गुरुपत्नीस नमस्कार करून निघून गेला. एक–दोन सप्ताहां-नंतर तो पुन्हां आला. त्याचेबरोबर माझ्याच वयाचे पण अंगापिंडानं विशेष धष्टपुष्ट असे तेजस्वी दोन कुमार होते. त्या मुलांनीं गुरुजी व गुरु-पत्नींस विनयपूर्वक नमन केलं, आणि ते म्हणाले, 'आम्ही गोपालांत वाढलों आहोंत, नागरी जीवन आम्हांला अपरिचित आहे. वेदविद्या आणि धनुर्वेद यांचं शिक्षण घेण्याकरितां आम्ही येथें आलों आहोंत. तरी गुरु-माउलीची कृपा असावी!' गुरुजी या भाषणानें प्रसन्न झाले. त्यांनीं स्मित करून त्यांना आश्वासन दिलं. आमचे गुरुजी थोडं आणि मोजकं बोलत. ते आपला भाव नेत्रानं प्रकट करीत. त्यांच्या कुटींतील वातावरण नेहमीं प्रसन्न असे. त्यांच्या कुटीजवळ दुसरी एक कुटी असे. तींत गुरुपत्नी आणि आम्ही त्रिवर्ग शिष्य राहात असूं. गुरुपत्नीचा स्वभाव पतीपेक्षां पुष्कळ निराळा. त्या अत्यंत चपल आणि बहुभाषी होत्या. एकदां रागावल्या म्हणजे त्यांच्या-पुढं आमची उभं राहण्याची ताकद नव्हती. संसारांत मोठ्या दक्ष. लक्ष्मी विशेष प्रसन्न नसतांनाहि त्यांनीं संसारांत उणेपणा कधीं दिसूं दिला नाहीं. त्या स्वतः खूप श्रम करायच्या, आणि आम्हांलाहि करायला लावायच्या.

कृष्ण ( मध्येंच )— यामुळं आमचे अंगांत श्रमसहिष्णुता बाणली. क्षत्रियांना युद्धप्रसंगीं या गुणाचा फार उपयोग होतो.

सुदामा— आम्हांला लांबून खांद्यांवर पाणी आणावं लागे. लांकडं फोडावीं लागत. बलरामदादा मोठमोठीं झाडं कुऱ्हाडीनं सहज तोडून खालीं पाडा-

यचे. कृष्ण महावस्ताद ! लांकडं फोडण्यांतहि त्याचं कौशल्य दिसून येई. लांकडाचे हीर पाहून तो घाव घाली, यामुळं पुष्कळ काम करूनहि तो दमत नसे. त्यानं प्राणशक्तीवरहि ताबा मिळविला होता. तो केव्हां प्राणायाम करीत असे हें आम्हांला त्यानं कधीं कळूं दिलं नाहीं. प्राणायामामुळं त्याचा उत्साह कायम टिके. बलरामदादा व मी थकूनभागून घरीं यायचे, तर कृष्ण हंसत खेळत घरीं येई. आणि घरीं आल्यावरहि गुरुपत्नीस मदत करी. यामुळं गुरुपत्नींची कृष्णावर मोठी मर्जी.

कृष्णाप्रमाणं बलरामदादाची स्मरणशक्ति आणि ग्रहणशक्ति अलौकिकच होती. गुरुजी शिकवते भले, आणि हे शिकते भले ! मी त्यांचे मागं राहीं. तेव्हां गुरुजी मला म्हणत, 'तूं निराश होऊं नको. हे आहेत राजपुत्र. हे फार दिवस येथें राहणार नाहींत. त्यांना मथुरेचं राज्य चालवायचं आहे. तेव्हां थोड्या वेळांत यांना मला पुष्कळ शिकवायचं आहे. ते गेल्यावर तूं येथें रहा. मी तुला पुढं सर्व पुन्हां शिकवीन.'

अगदीं थोड्या काळांत राम–कृष्णांनीं वेदविद्या, उपनिषदं आत्मसात् केलीं. बलरामदादांना संहिता उच्च स्वरानं म्हणतांना मोठा आनंद व्हायचा. दादांची वाणी गंभीर, शब्दोच्चार सुस्पष्ट असत. त्यांनीं वेदघोष सुरू केला म्हणजे आपण प्रसन्न मेघगर्जना ऐकत आहोंत, असा भास व्हायचा. कृष्णानं वेदाध्ययन बरं केलं, पण तो उपनिषदांत अधिक रमायचा. बलरामदादांचा पठणावर विशेष भर, तर कृष्णाचा मननावर. गुरुजींना तो कधीं कधीं विचित्र प्रश्न विचारी; पण गुरुजी त्याचेवर रागावत नसत. आम्ही कृष्णाला म्हणत असूं, 'कृष्णा, तुझं डोकं कोणत्या देवानं घडविलं आहे रे ? गुरुजींना कांहीं तरी विचारीत बसतोस.' बलरामदादा सांगत कीं, 'कृष्ण गोकुळांत असतांना मोठा खिलाड्र होता. पण गुरुगृहीं आल्यावर त्याचे स्वभावांत विशेष फरक पडला. तो अधिक विचारी–मननशील झाला आहे. तो एकान्तांत पुष्कळदां विचार करीत बसे. बलरामदादा व मी त्याची खोडी काढायचे. ती तो सर्व हंसतमुखानं सहन करी. आम्हीं खेळायला बोलाविलं तर नाहीं म्हणायचा नाहीं. वेदविद्येनंतर गुरुजींनीं त्यांना अस्त्रविद्या व अश्वविद्या शिकविली. आमचे बलरामदादांना गदा फिरविण्याची फार

हौस. त्यांत ते भरभर प्रगति करीत; पण गुरुजींना ही कला विशेष अवगत नव्हती. ते म्हणत, 'रामा, तुला गदायुद्धाचं शिक्षण घेण्याकरितां दुसरीकडे जावं लागेल. एकाच मनुष्याला सर्व विद्या थोड्याच अवगत असतात! गदायुद्धाची कला परशुरामऋषींना चांगली अवगत आहे; त्यांना तूं प्रसन्न करून घेतलंस तर तूं त्या विद्येंत प्रवीण होशील. कृष्णाचं लक्ष अस्त्रविद्येकडे विशेष लागे. चक्र फेकून मारण्याचा अभ्यास तो विशेष करी. त्यानं चक्र झाडावरच्या फळाला नेम धरून मारावं तों तें चक्र तें फळ तोडून गुं गुं करीत कृष्णाच्या हातांत नेमकं परत यावं! त्याची आम्हांला मोठी मौज वाटे. हें चक्र आमच्या गुरुजींनीं भगवान् विष्णूच्या प्रसादानं मिळविलं होतं असं म्हणतात. त्यांनीं तें कृष्णाला शिकविलं. एक दिवस कृष्णानं चक्र फेंकण्याच्या कलेंत विशेष प्रावीण्य दाखविलं, तेव्हां गुरुजी कृष्णाला म्हणाले, 'कृष्णा, या दिव्य अस्त्राचा विशेष प्रसंग पडल्याशिवाय उपयोग करूं नकोस. दिव्य शक्तींचा उपयोग निरहंकार वृत्तीनंच केला पाहिजे. आसुरी वृत्तीचे दैत्य ही विद्या चटकन् ग्रहण करतात. पण मी त्यांना ही विद्या शिकवीत नाहीं.' मग आम्ही त्यांना लाडांत येऊन विचारीत असूं, 'गुरुजी, तुम्हांला सर्व शिष्य सारखे; मग असुरशिष्यांना तुम्ही ही विद्या कां शिकवीत नाहीं? यावर गुरुजी म्हणत, 'गुरूला सर्व शिष्य सारखे ही गोष्ट खरी आहे. गुरूनं श्रीमंत-गरीब असा भेद करूं नये; पण सुष्ट आणि दुष्ट हा भेद त्यानं केलाच पाहिजे.' असो.

एकदां आम्ही लांकडं आणण्याकरितां रानांत गेलों होतों. तों चहूंकडून आकाश मेघानं भरून आलं, आणि लगेच वळवाचा मुसळधार पाऊस सुरू झाला. मग आम्ही तिघे एका झाडाखालीं उभे राहिलों. मला भूक खूप लागली होती. गुरुपत्नीनं आम्हां तिघांकरितां फडक्यांत पोहे बांधून मजजवळ दिले होते. ती पुरचुंडी मीं हळूच सोडली आणि रामकृष्णांना चोरून तोंड वळवून पोहे खाऊं लागलों; तों दांतांचा आवाज होऊं लागला. तेव्हां कृष्ण कसा म्हणतो, 'सुदामा, थंडीनं दांत वाजताहेत. तुझी घोंगडी फाटकी आहे ती दे मला, आणि ही घे पाहूं माझी धडकी कांबळ.' असं म्हणून त्यानं माझी घोंगडी हिसकली तों पोह्यांची पुरचुंडी खालीं पडली. ती उचलून तो म्हणतो, 'मित्रा, काय बावळट आहेस रे! भूक लागली तरी तुला पोह्यांची आठवण

होऊं नये! तुझं पुढं कसं रे होणार?' मित्राचे दोष उघडे करून न दाखवितां ते अशा रीतीनं झांकणारा मित्र सर्व पृथ्वीवर शोधूनहि मिळणं कठीण! कृष्णाच्या पराक्रमापेक्षांहि त्याच्या प्रेमाची किंमत आम्हांला मोठी वाटे.— आणि हें प्रेम तो निरपेक्षपणं करी."

असें बोलतांना सुदामाचा कंठ दाटून आला, आणि त्याचे नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. जिकडे तिकडे गंभीर वातावरण उत्पन्न झालें. कृष्ण-स्त्रिया डोळयांना पदर लावून मुसमुसूं लागल्या. प्रद्युम्नादि पुत्रांचेहि डोळे पाणावले.

या गंभीर वातावरणाला कलाटणी देण्याकरितां कृष्ण रुक्मिणीला म्हणाला, 'रुक्मिणी, हेंच का तुझं आदरातिथ्य! माझ्या मित्राला भूक कंठत नाहीं. भुकेमुळं त्याचे प्राण कासावीस झाले आहेत. कांहीं फराळचं घेऊन येशील कीं नाहीं!'

सत्यभामा— तुमच्या मित्राचे नियम मोठे कठीण! ते अवेळीं तुमच्यासारखे खात नसतात.

कृष्ण— खात नाहीं म्हणजे काय गोष्ट आहे! असं वरवर आग्रह करून का कुठं भागतं? का रे सुदामा, तुझ्या वहिनींनीं जर कांहीं खायला आणलं तर तूं खाणार कीं नाहीं? आपल्याला तर अत्ता खूप भूक लागली आहे आणि तूं खाल्ल्याशिवाय मी खाऊं शकणार नाहीं. पहा बुवा, एक गरीब जीव भुकेनं तडफडत ठेवण्याचं तुला पातक लागेल!

ह्या कृष्णाच्या बोलण्यानें सर्व मंडळी हंसूं लागली. पावसानंतर आल्हाद-कारक ऊन पडावें तसें या वेळीं झालें. कृष्णकथा सांगतांना अशा तऱ्हेचा आनंद सुदाम्यानें कांहीं दिवस तेथें अनुभविला. नंतर एक दिवस तो जाण्यास निघाला. तो कृष्णाकडे पत्नीच्या आग्रहास्तव द्रव्य मागण्याकरितां आला होता; परंतु कृष्णाच्या प्रेमांत तो निःस्पृह ब्राह्मण इतका गुंग होऊन गेला कीं, त्याला आपल्या स्वतःच्या कार्याची स्मृति राहिली नाहीं. कृष्णाचा निरोप घेतांना त्याला आठवण झाली, पण संकोचामुळें त्यानें कृष्णाजवळ याचना केली नाहीं. कृष्णानेंहि मित्राला कांहीं भेट द्यायची गोष्ट काढली नाहीं. उलट कृष्ण केव्हां केव्हां म्हणायचा, 'सुदामा, भाग्यवान् आहेस बुवा

तूं! तुला या सुवर्णाचा कसा तो अभिलाष नाहीं. आम्ही पहा माया-मोहांत कसे बुडालों आहोंत! उपनिषदं आम्ही फुकट पढलों! तुझंच जीवन सार्थकीं लागलं. कारण तूं सोनं, पाषाण, मृत्तिका समान देखतोस!'

रुक्मिणीनें सुदामाच्या पत्नीकरितां व मुलांकरितां कांहीं अलंकार काढले, तेव्हां कृष्ण तिला सुदाम्याला ऐकूं जाईल अशा मोठ्या स्वरानें म्हणाला, 'देवी, अग या गरीब ब्राह्मणाला रस्त्यांत चोर लुटतील. तेव्हां सुवर्ण-अलंकार त्याचेबरोबर देणं बरं नाहीं. तूं त्याच्याबरोबर चार लाडू करून दे, झालं!'

सुदामा सर्वांचे प्रेमानें निरोप घेऊं लागला, तेव्हां कृष्ण-स्त्रियांच्या नेत्रांत पाणी आलें. कृष्णानें मित्राला दृढ आलिंगन दिलें, आणि म्हटलें, 'अशीच भेट वारंवार देऊन आम्हांला सुखवीत जा!'

सुदाम्याला पोंचविण्याकरितां एक खास दूत दिला गेला होता. तो प्रवासांत सुदामदेवाला विचारी, 'कृष्णराजानं तुम्हांला काय काय दिलं हो? आज-पर्यंत आमच्या मालकांनीं इतकं आतिथ्य दुसऱ्या कोणाचं केलेलं आम्हीं पाहिलं नाहीं. ते मोठे उदार आहेत. त्यांनीं तुम्हांला सुवर्णालंकार किंवा मौक्तिक हारहि दिले असतील.'

सुदाम्याला हे शब्द जिव्हारीं लागत. शेवटीं त्याच्यानें राहवेना. तो म्हणाला, 'खरं पाहिलं तर मला कांहींच नको होतं; पण माझे पत्नीला ऐश्वर्य नाहीं तरी अंगभर वस्त्र व पोटभर अन्न असावंसं वाटतं. मी असा रिकामा परत जात आहें, तेव्हां तिला तोंड कसं दाखवावं हा विचार मला भंडावीत आहे!' असें बोलतांना सुदाम्याच्या डोळ्यांतून अश्रु गळूं लागले. तेव्हां तो कृष्णाचे विश्वासांतला दूत हंसून म्हणाला, 'भू-देवा, कांहीं काळजी करूं नका. जो श्रीकृष्ण सर्वांची काळजी वाहतो तो काय तुमच्या-सारख्या सत्त्व-वृत्तीच्या मित्राची वाहणार नाहीं काय? तुम्ही ज्या गांवीं हल्लीं राहतां तो गांव कृष्णजींनीं तुम्हांला इनाम करून दिला आहे!— इतकंच नव्हे तर तुमच्या पत्नीला आणि मुलांना उंची उंची वस्त्रालंकार व पुष्कळ अमूल्य भेटी केव्हांच पुढं धाडल्या आहेत! तुम्ही घरीं जाल तर तुमचं स्वागत कसं होतं तें पहा तर खरं!! वस्त्रालंकारांनीं विभूषित होऊन तुमची पत्नी तुम्हांला सामोरी येईल!'

हे दूताचे बोल ऐकतांच सुदामा मटकन् खालीं बसला! एक सुस्कारा टाकून तो म्हणाला, 'भगवंता, मला वैभवाच्या मोहांत कशाला टाकतो आहेस? कदाचित् वैभवांत राहून मी अलिप्त राहतों कीं नाहीं याची तुला परीक्षा पहायची असेल!'

असें स्वतःशीं बोलून नंतर तो कृष्णदूताला म्हणाला, 'तुमच्या राजाला कळवा कीं, हा सुदामा तुझ्याइतका बुद्धिमान नसेल, पण विरक्तीच्या परीक्षेंत तुला खास हार जाणार नाहीं!'

## ८

# प्रापंचिक योगी

सुदामा गेल्यामुळें कृष्ण उदासीन झाला होता. त्यानें आज सकाळचा उपाहार नको म्हणून सेवकांस सांगितलें. रुक्मिणीचा एक असा नियम असे कीं, कृष्णाचे खाण्यापिण्याचे वेळीं स्वतः उपस्थित राहावयाचें, व आपल्या हातानें पतीला वाढावयाचें. आज उपाहार नको म्हणतांच रुक्मिणी कृष्णाकडे येऊन खोडकरपणानें म्हणाली, " मित्राचे वियोगामुळं तुम्ही इतके कसे कष्टी झालांत ? तुम्ही तर योगेश्वर म्हणून प्रसिद्ध आहांत ! धर्मराजांच्या राजसूय-यज्ञांत तुमची ज्ञानी, कर्मयोगी म्हणून भीष्माचार्यांच्या आज्ञेनें पूजा झाली. मग आज मायेनं तुमच्यावर पगडा कसा बसविला ? "

कृष्णानें रुक्मिणीच्या मुखाकडे मान वर करून थोडे क्षण टक लावून पाहिलें. नंतर मूठ हनुवटीखालीं ठेवून गालांतल्या गालांत हंसत म्हणाला, " आम्हांला नेमकं पकडून तूं विजय मिळविलास. मी आज मायेच्या प्रभावांत सांपडलों आहें यांत संशयच नाहीं. तरी पण तूं आज एक महत्त्वाचा प्रश्न या निमित्तानं उपस्थित केला आहेस. तेव्हां मीहि थोडासा खुलासा करतों. ज्ञान हें बुद्धीचं लक्षण आहे. मनुष्याला जशी बुद्धि असते त्याप्रमाणें मनहि असतं. मनांत नेहमीं निरनिराळ्या भावनांचे खेळ चालतात. बुद्धि-शक्तींचा उपयोग करून मनुष्यानं भावना आंवरून धरल्या तरी अष्टौप्रहर का मनुष्य मनाला बांधून ठेवूं शकतो ? मनाला ऋषींनीं वारूची उपमा दिलेली आहे. सारथ्याच्या हुकुमांत वारू असतात हें खरं, पण ते अष्टौप्रहर नसतात. त्यांना मधून मधून मोकळं सोडावंच लागतं. तसं, देहधारी ज्ञानी पुरुषाला भावनेंचे आहारीं नाहीं म्हटलं तरी जावं लागतंच. तूं म्हणतेस, मी मोठा योगेश्वर आहें ! ज्याची त्याला या बाबतींत पुरी ओळख असते. मी योगेश्वर वगैरे कांहीं नाहीं. फक्त मी नेहमीं प्रसन्न, हंसतमुख राहण्याचा सारखा प्रयत्न करीत असतों."

रुक्मिणी—आपल्यासारख्या ज्ञानी माणसाला जर भावनेच्या प्रवाहांत वाहून जावं लागतं, तर मग साधनेचा उपयोग तो काय?

कृष्ण— किती रास्त आणि मार्मिक प्रश्न तूं विचारलास! आमचे गुरुजी सांगत कीं, ज्ञानी माणसाला सुख-दुःखं होतातच, पण तो त्या भावनांचा आपल्यावर नेहमीं पगडा बसूं देत नाहीं. एवढाच सामान्य आणि ज्ञानी माणसांत फरक! ज्ञानी माणसावर कितीहि दुःखाचे प्रसंग ओढवले तरी तो आपलं प्राप्त कर्तव्य सोडून देत नाहीं. आमच्या गुरुजींना पुत्रवियोगाचं केवढं मोठं दुःख झालं होतं! परंतु त्याच्या ज्ञानसाधनेंत किंवा अध्यापनांत एवढाहि खंड पडला नाहीं. सुदामा माझा सहाध्यायी, स्नेही, तो परत गेला यामुळं मी उदासीन झालों यांत मला कांहीं कमीपणा आला असं नाहीं. यांत माणुसकी आहे. अशा दुःखानं मनुष्याच्या प्रेमभावना उंचावतात, आणि दृढहि होतात!

रुक्मिणी—हें एवढं ज्ञान सांगून माझी आपण समजूत केलीत खरी, तरी सुद्धां तुम्ही आहार घेतला नाहीं तर मला बरं वाटणार नाहीं, आणि तुम्ही लक्षांत घ्यायला पाहिजे कीं, धन्यानं जर आहार घेतला नाहीं तर तुमचे एकनिष्ठ सेवक कांहीं घेणार नाहींत.

कृष्ण— सर्वांवर तुझं लक्ष आहे तर! सेवकांच्या अडचणी जी जाणते तीच खरी मालकीण. बरं, तुझ्या इच्छेस येईल तो आहार घेऊन ये, दहीं-पोहे आणलेस तरी चालेल.

रुक्मिणी— ( कृष्ण-मंदिरांतून बाहेर पडतांना कृष्णाकडे खोडकरपणानं हंसत पाहून ) दहीं-पोहे! बालपणच्या आवडी-नावडी मनुष्य मोठा झाला तरी त्याला सोडीत नाहींत एकूण!

कृष्णानें रुक्मिणीच्या आग्रहास्तव दहीं-पोहे खाल्ल्यासारखें केलें. नंतर मुखप्रक्षालन करून शुभ्र वस्त्रें परिधान करून, कुंकुमतिलक लावून आरशांत त्यानें आपलें प्रतिबिंब पाहून घेतलें, आणि तो दारुकानें आणलेल्या रथांत जाऊन बसला. कृष्णाकडे दोन तऱ्हेचे रथ असत. एक मंदगति व एक शीघ्रगति. युद्धकार्यार्थ किंवा मृगयेचे वेळीं दोन चक्रांचा रथ तो वापरी. कारण त्याला

गति फार असे, परंतु अशा रथांत बसणाराला थोडेफार धक्के सोसावे लागतच. चार चाकी रथ हें सुखकारी वाहन. गांवांत फिरावयाचें असलें, किंवा उद्यानांत सहल करून यावयाचें असलें तर या रथाचा उपयोग केला जाई. या रथांत बसून निघालें तर पोटांतलें पाणी हालावयाचें नाहीं. पण गतिहि बेताचीच. हे रथ गाद्यागिरद्यांनीं मढविलेले असत.

कृष्णाच्या दोन पत्न्यांचे स्वभाव भिन्न भिन्न होते. रुक्मिणीला गृह-संसार चालविणें विशेष पसंत असे. सत्यभामा रुक्मिणीपेक्षां जास्त चपल; ती पुष्कळदां कृष्णाबरोबर स्वारी–शिकारींत असे. गजशाळा, अश्वशाळा पाहण्यांत तिला विशेष हौस वाटे. आज श्रीकृष्ण अश्वशाळा पाहण्यास निघणार होता, म्हणून पूर्वसूचनेप्रमाणें दारुक सत्यभामेचे मंदिरांत अगोदर जाऊन तिला कृष्णाकडे घेऊन आला होता. कृष्ण रथांत बसल्यावर ती म्हणाली—

"देवा, तुम्ही किती भाग्यवान् आहां हो! तुम्हांला सुदामभाउजींसारखा निष्कपटी थोर मनाचा मित्र आहे. तुम्ही त्याला देणगी काय हो दिलीत? माझ्या मनांत त्याच्या बायकोला एक शालू पाठवायचा होता."

कृष्ण—पण देवी, त्याच्या घरांत दोन वेळेला पुरेसं धान्य आहे कीं नाहीं ह्याची विचारपूस तूं केलीस का?

सत्यभामा—खरंच देवा! श्रीमंतींत वाढल्यामुळं,–नव्हे लोळूं लागल्यावर, गरिबांच्या परिस्थितीची मनुष्याला कल्पना होत नाहीं. (लाडकेपणानें) खरंच, मी तुमचेवर आज रागावलें आहें!

कृष्ण—(हंसून) तुम्हांला रागवायला कोण नाहीं म्हणतो? तुम्ही रुसलां नाहीं, रागावलां नाहीं तर हा संसार अळणी वाटेल!

सत्यभामा—मला उगाच चिडवूं नका. मी काय म्हणतें तें ऐकून तर घ्या. तुम्ही माझे पुष्कळ लाड केलेत, पण खरं शिक्षण जें तुम्हांला मिळालं, तें मला कधीं दिलं नाहींत. गरिबांचीं दुःखं कशीं समजून घ्यावीं हें तुम्हीं मला कधीं हो शिकवलंत?

कृष्ण— मीं जर तें शिक्षण तुला दिलं असतं तर सत्राजितांनीं मजवर आग पाखडली असती ! देवी, गरिबांचीं दुःखं गरिबी काढल्यानंच समजत असतात !

असा सुखसंवाद चालला असतां रथ अश्वशाळेजवळ आला. दारुकानें हात दिल्यावर कृष्ण खालीं उतरला. नंतर कृष्णानें हात देऊन सत्यभामेला खालीं उतरविलें, आणि आपण झपाट्यानें दारुकाबरोबर अश्वशाळेंत गेला. बरेचसे घोडे कुरणांत चरावयास गेले होते. कृष्णाच्या इच्छेवरून अश्वाध्यक्षानें इशारतीचा शंख फुंकला. तो ऐकतांच निरनिराळ्या ठिकाणीं स्वैरपणें संचार करीत असणारे घोडे तबेल्याकडे धांवत येऊन आपापल्या स्थानावर उभे राहिले. मग कृष्णानें त्यांची बारकाईनें पाहणी केली. कोणत्याहि घोड्याच्या अंगावर गोचिडी अगर मक्षिका नाहीं हें पाहून त्यानें समाधान व्यक्त केलें. एका घोडयाच्या पायाला कांटा लागून रक्त आलें होतें. कृष्णानें तिकडे दारुकाचें लक्ष वेधलें. नंतर हल्लीं घोडयांना खुराक कोणता चालू आहे, नवीन शिकाऊ घोडे कोणते हें कृष्णानें पाहून घेतलें. नंतर कृष्ण अश्वशाळेच्या अध्यक्षाला म्हणाला, ‘ घोडयांना तोबरा कोण देतो ? ’ तेव्हां रक्षकानें म्हटलें, ‘ त्या कामावर स्वतंत्र सेवक नेमले आहेत. ते खाद्य तयार करण्यांत गुंतले आहेत. ’ यावर कृष्णानें तेथील प्रमुखांना इशारा दिला कीं, ‘ सारथ्यानं घोडयांना आपल्या हातानं खुराक चारला पाहिजे. म्हणजे घोडे सारथ्यावर प्रेम करतात. आमचे गुरुजी आम्हां शिष्यांना म्हणत कीं, ‘ आपल्याला ज्यांच्याकडून काम करून घ्यायचं त्याला स्वतःच्या हातानं खाऊं घातलं पाहिजे. ’

द्वारकाधीशाजवळ घोडयांच्या अनेक पागा होत्या. त्यांतल्या हुजुरातीच्या पागेवर कृष्णाचें खास लक्ष असे. अश्वांची पाहणी करून भोजनाच्या वेळीं कृष्ण परत गृहीं आला. वैश्वदेव, काकबलि वगैरे गोष्टी उरकल्यावर तो इष्टमित्र-आश्रितांसह भोजनास बसला. कृष्णाचे घरीं पंक्तिप्रपंचास थारा नव्हता. इतर वेळीं सौम्य आणि क्षमाशील असणारा कृष्ण पंक्तींत जर कोणा सेवकानें अन्न वाढतांना भेद केला तर त्याला खूप राग येई, आणि मग त्या जबाबदार सेवकास कडक शिक्षा होई. मात्र ही शिक्षा सर्वांसमक्ष व्हायची नाहीं.

भोजनोत्तर तांबूल-ग्रहण केल्यावर कृष्ण वामकुक्षीकरितां पहुडावयाचा. एक दिवस रुक्मिणीनें प्रश्न केला,

“देवा, तुम्ही वामकुक्षी करून निद्रिस्त असतां असं दिसतं; पण अलीकडे माझ्या लक्षांत आलं आहे कीं, आपल्या उजव्या हाताचा अंगठा हालत असतो. यावरून आपण निद्रावश होत नाहीं असं दिसतं. असं कां?”

कृष्ण—देवी, अस्त्रांचा उपयोग सतत केल्यामुळं अलीकडे अंगुष्ठावरचा माझा संयम सुटत चालला आहे.

रुक्मिणी—तरीसुद्धां आपण झोंपत नाहीं हें खास. या वेळीं आपण ध्यान-मग्न असतां असं वाटतं. पहांटेस ध्यान करतां तें मी समजूं शकतें, पण आणखी दुपारीं ध्यान कां?

कृष्ण—गुरुजींनीं उपनिषदं शिकवितांना असं सांगितलं आहे कीं, आत्मचिंतन हें वेळ सांपडेल तेव्हां करावं. नाहीं तर मोकळं मन कु-कल्पना करीत बसतं. योग या शब्दाचा अर्थच अखंड अनुसंधान. पाहुण्यासारखं कधींमधीं आत्म्याशीं संधान ठेवून कार्यभाग उरकत नाहीं.

अशा तऱ्हेचे कृष्ण-रुक्मिणीचे अध्यात्मविषयासंबंधींचे संवाद नेहमीं चालत, आणि रुक्मिणीला प्रसंगाप्रसंगानें असा बोध होत जात असे.

सायंकाळीं नेहमींप्रमाणें सर्व मंडळी रथांत बसून गोकुळांत गेली. आज कृष्णाची नजर गौळवाड्याजवळ वाहत असलेल्या झऱ्याकडे जाऊन तेथें बसण्याची त्याला लहर लागली. ओढ्याकांठीं बसून वाळू हातांत घेऊन ती (मुठीनें) सोडीत असतां तो म्हणाला, “आपली गोष्ट कोठपर्यंत आली बरं?”

पेंद्या—कृष्णा, कंसवधापर्यंत तुझी आत्मकथा आली होती. काय रे कृष्णा, त्या वेळीं तूं एकटाच कां मथुरेस गेलास? आम्हांला कां मदतीस नेलं नाहींस?

कृष्ण—आईनं तुला मजबरोबर पाठवलं नसतं! असो. कंसाचे अंत्य-संस्कार पार पडल्यावर आमचे वडील मंडळींना आणि मुत्सद्द्यांना असं वाटूं

लागलं कीं, यापुढं राज्याची धुरा शेवटीं राम-कृष्णांनाच खांद्यावर घ्यावी लागणार; आणि यांना तर राज्यकारभार चालविण्याला लागणाऱ्या विद्यांचे संस्कार नाहींत. त्यांचं सगळं आयुष्य गोपालनांत गेलेलं. म्हणून त्यांनीं आमच्या दोघांचे व्रतबंधादि संस्कार करून आम्हांला उज्जयिनीस राहणारे सांदीपनी गुरुजी यांच्याकडे पाठविलं.

एक वृद्ध गोप म्हणाला, "उज्जयिनी मथुरेपासून किती हो लांब आहे ?

कृष्ण— दोनशें कोसांच्यापेक्षां जास्त.

वृद्ध गोप— इतक्या लांब आपलीं पोरं तुमच्या वडिलांनीं कशीं पाठविलीं ? मथुरेंत कोणी शिकवणारे नव्हते का ?

कृष्ण— चांगली अवलाद मिळविण्याकरितां तुम्ही गोप मंडळी किती दूर दूर जातां बरं ! तसंच चांगली विद्या मिळविण्याकरितां चांगला गुरु शोधीत दूर जाणं भाग होतं.

गुरूकडे जातांना तातांनीं मला उपदेश केला कीं, 'तुम्हांवर आतां मोठी जबाबदारी पडणार आहे. कंसराजाचे मित्र स्वस्थ बसणार नाहींत. ते मथुरेवर स्वारी करून आपल्याला भंडावून सोडतील. तरी गुरूजवळून शस्त्रास्त्रविद्या सत्वर शिकून या. शिवाय वेदाध्ययनहि चांगलं करून या. गुरूची सेवा निरलसपणं केल्याशिवाय विद्या प्राप्त होत नसते. गुरुगृहीं गेल्यावर आपण कोणी मोठे आहोंत ही कल्पना मनांत राहूं देऊं नका. पडेल तें काम करण्यांत पुण्य मानीत जा; म्हणजे गुरूंची मर्जी तुमच्यावर बसेल, आणि मग ते आपल्याजवळची सर्व विद्या तुम्हांला देतील.

तात-मातेचा निरोप आणि आशीर्वाद घेऊन आम्ही उज्जयिनीस आलों. गुरूंना पाहतांच आमचे मनांत आदर उत्पन्न झाला. त्यांचं तें उंच विस्तीर्ण ललाट पाहून आमचे मनांत आलं कीं, हें अनेक विद्यांचं माहेरघर आहे ! गुरुजींबद्दल आम्हांला आदर वाटे, पण हट्टच करायचा झाला तर तो गुरुपत्नीजवळ करीत असूं. एक दिवस गुरुजी बाहेर कोठें गेले होते; आणि आम्ही गुरुपत्नीजवळ भाजी निवडीत असतां गप्पा मारीत होतों. तेव्हां गुरुपत्नी आम्हांला म्हणाली, 'कृष्णा, आज इथं मला माता म्हणून गौरवतोस, पण

उद्यां राजा झालास म्हणजे आमची आठवण राहील का ?' तेव्हां दादांनीं आमच्या दोघांतर्फे तिला आश्वासन दिलं कीं, 'आम्ही जर तुम्हांला विसरलों तर आमची विद्या निष्फळ होईल.' माझे सहाध्यायी मित्र सुदामा यांनीं आमच्या तेथील जीवनाची माहिती तुम्हांला नुकतीच दिली आहे. तेव्हां आतां त्या काळासंबंधीं मला कांहीं विशेष सांगायचं नाहीं. आम्हांला मथुरेस येण्याची घाई होती, यामुळं गुरुगृह आम्हांला थोड्या काळांतच सोडावं लागलं. गुरुजींचा निरोप घेतांना आम्हीं म्हटलं, 'आपण कांहीं गुरुदक्षिणा मागून घ्या.' तेव्हां आमचे निरिच्छ गुरुजी आम्हांला म्हणाले, 'विद्यार्थ्यांनीं मन लावून विद्या ग्रहण केली म्हणजे आम्हांला दक्षिणा पावली असं होतं.' तेव्हां आम्हीं त्यांना पुन्हां म्हटलं कीं, 'कांहीं विशेष मागा.' तेव्हां ते म्हणाले, 'आमचा एकुलता एक पुत्र प्रभास-क्षेत्रीं समुद्रांत एका राक्षसानं ओढून नेला आहे, तरी त्याचा शोध लावून तुम्हांला आणतां आला तर पहा.'

गुरु-आज्ञा प्रमाण मानून आम्ही प्रभासक्षेत्रीं गेलों. तेथें कळलं कीं, पंचजन नांवाच्या असुरानं गुरुपुत्राला समुद्रांत ओढून नेलं आहे. मग आम्हीं त्याच्याशीं पुष्कळ दिवस युद्ध करून त्याला ठार मारलं, आणि त्यानं नेलेला गुरुपुत्र सोडवून गुरुजींस अर्पण केला. या पंचजनाजवळ एक सुंदर शंख होता. तो मीं स्वतःजवळ ठेवून घेतला आहे. लढाईचे वेळीं ह्याच्या नादानं शत्रु-हृदयांत धडकी भरते! असो. गुरुपुत्राचा शोध लावतांना आम्हांला प्रभासक्षेत्राची आणि तिकडील प्रांताची माहिती झाली. मीं दादांना म्हटलं, 'दादा, यदाकदाचित् मथुरेंत राहणं आपणांला अशक्य झालं तर हा प्रांत वस्ती करण्यास उत्तम आहे. प्रदेश सुपीक दिसतो, आणि आत्मसंरक्षणासाठीं आपणांला पाहिजे तसं एक बेटहि इथं आहे.' दादा म्हणाले, 'पाहूं या, पुढचं पुढं! आतां लवकरच मथुरेला आपल्याला गेलं पाहिजे. तेथें लोक आपली वाट पाहात असतील ना!' नंतर आम्ही मथुरेस परत आलों. तेथें आम्हांला गोकुळांतील मंडळी भेटली. यशोदामातेला पाहून आम्हांला गहिंवर आला. ती सर्व मंडळी आमच्या येथें कांहीं महिने सुखानं राहिली. याच वेळीं मथुरेंतील मुत्सद्दी आम्हांला भावी संकटाची कल्पना देतांना म्हणाले, 'कंसाच्या स्त्रियांना तुम्हीं औदार्यानं वागवलंत खरं,

पण त्या शेवटीं कृतघ्न ठरल्या आहेत. कंसाच्या स्त्रिया अस्ति आणि प्राप्ती ह्या दोघी बहिणी सम्राट् जरासंधाच्या कन्या होत. त्या आपलं दुःख विसरलेल्या नाहींत. बापाला भेटायला म्हणून त्या मगध देशांतील राजगृहास गेल्या. तेथें त्यांनीं बापाजवळ हट्ट धरला कीं, कंसाच्या वधाचा सूड तुम्हीं घेतलाच पाहिजे! दोन गुराख्यांचीं पोरं मथुरेस येतात काय, आणि तेथल्या बलवान् राजाला मारून मथुरेचं राज्य हिसकावून घेतात काय?—हें तुम्हीं सहन करतां कामा नये.'

"मी जरासंधाचा जांवई मारला होता. तेव्हां त्याला माझा राग येणं अगदीं साहजिक होतं. जांवई मीं कां मारला याचा शोध तो घेता तर पुढील अनर्थ झाले नसते. सर्व सत्ताधीशांना सारासार विचार राहात नाहीं. ते वरवरच्या गोष्टी पाहून निर्णय घेतात. जांवयाच्या वधाचा सूड घेण्याकरतां त्यानं मथुरेवर चाल करण्याचं ठरविलं, आणि रुक्मी, शिशुपाल इत्यादि आपल्या मांडलिकांना मदतीकरतां बोलावलं. हें संकट आमच्यावर येणार म्हणून आम्हीं अगोदरच मथुरा लढविण्याची चांगली तयारी करून ठेवली होती. जरासंधानं मथुरानगरीस वेढा देऊन आमची कुचंबणा करण्याचा बेत केला. अठ्ठावीस दिवस भयंकर युद्ध झालं. दादांनीं दक्षिण दिशेनं जाऊन जरासंधाचे हंस आणि डिंभीक नांवाचे दोन सेनापति मारले. तेव्हां त्या सम्राटानें कच खाल्ली. पश्चिम दिशेची जबाबदारी मजवर होती. दाक्षिणात्य राजांचा आमच्या सैन्यानं पराभव केला, तेव्हां जरासंधानं वेढा उठवून स्वदेशीं गमन केलं. अशा रीतीनं आम्हीं हा पहिला सामना जिंकला. परंतु मथुरेंतील अनुभवी मुत्सद्द्यांनीं आम्हांला बजावलं कीं, 'जरासंध हा सामान्य वीर नाहीं. तो जो परत गेला तो मोठं सैन्य पुन्हां घेऊन येण्याच्या उद्देशानं गेला आहे.' हें आम्हांला कळतांच आम्हीं मथुरेंतील जुने कारभारी एकत्र केले व त्यांना म्हणालों कीं, 'उग्रसेनराजाशीं जरासंधाचं वांकडं नाहीं; वांकडं आहे तें आमच्याशीं आहे. आम्ही येथें आहोंत म्हणून तो मथुरेला इतका उपद्रव देत आहे. तेव्हां मथुरेंतील आबालवृद्ध स्त्रियांना त्रास होऊं नये, आणि युद्धांत या सुंदर नगरीचा नाश होऊं नये म्हणून आम्हीच दोघे येथून निघून जातों. म्हणजे तुम्हांला शांततेचं सौख्य लाभेल.'

बराच वेळ या विषयाची चर्चा झाल्यावर मथुरेंतील प्रजाजनांच्या

रक्षणार्थ आमच्या हितचिंतकांनीं आम्हांला मथुरा सोडण्याची अनुज्ञा दिली.

आम्ही प्रथम दक्षिणेकडे असलेल्या करवीर नगरास गेलों. तेथें आम्हांला परशुरामदेवांनीं सांगितलं कीं, 'तुम्ही येथें राहूं नका. क्रौंचपुराला जा. तेथें यदुवंशीय राजा तुम्हांला मदत करील.' मग आम्ही क्रौंचपुराला गेलों अन् तेथील राजाच्या आश्रयानं गोमंतपर्वतावर जाऊन राहिलों; पण जरासंधानं आमची पाठ सोडली नाहीं. तो त्या पर्वतावर घाल करून आला आणि त्यानं पर्वताला चोहों बाजूंनीं आग लावून दिली. मग आम्ही पर्वत उतरून खालीं आलों आणि नवीनच शिकलेल्या विद्येच्या जोरावर जरासंधाचा शस्त्रास्त्रांनीं पराभव केला. नंतर आम्ही मथुरेस परत आलों. काय योगायोग आहे पहा!—ज्या शिशुपालानं मला पुढील आयुष्यांत सारखा विरोध केला, त्या शिशुपालाच्या वडिलांनीं म्हणजे दमघोषांनीं मला या संकटांत मदत केली! जगांत असेच विचित्र संबंध येतात! वाटेंत क्रौंचपूरच्या शृगालराजानं मला अकारण अडविलं. आम्हीं त्याचं कांहीं वाईट केलं नव्हतं. शेवटीं त्याच्याशीं युद्ध करून मला त्यास पारिपात्य द्यावं लागलं. यानंतर त्याचे मुलांस क्रौंचपूरचं राज्य देऊन आम्ही निघालों. निघतांना शृगालराजाजवळ असलेला उत्तम रथ तेवढा बरोबर घेतला. हा रथ आणि पांचजन्य शंख या दोन गोष्टी माझ्याजवळ अद्याप आहेत हें तुम्ही जाणतांच.

आज इतकं पुरे; उद्यां रुक्मिणीविवाहाची रम्य कथा सांगूं!" असें सूत उवाच करून कृष्ण उठला.

## १

## रुक्मिणी-स्वयंवर

आज श्रीकृष्ण रुक्मिणी-विवाह-प्रकरण सांगणार हें कळल्यावर कृष्ण-स्त्रियांच्या मेळाव्यांत एकच गडबड उडाली. रुक्मिणीचें तारुण्य संपून तिला आतां पोक्तपणा आला होता. तारुण्यांतील उन्मादी सौंदर्य जाऊन त्याची जागा आतां गांभीर्यानें विलसणाऱ्या रूपानें घेतली होती. ती अलीकडे रंगीत वस्त्रांऐवजीं शुभ्र वस्त्रें परिधान करी. बऱ्याचशा अलंकारांना अलीकडे तिनें रजा दिलेली होती.

कुठेंहि जा,–साध्या गरिबाच्या झोंपडींत, राजगृहांत अगर इंद्राच्या अमरावतींत,–सवतीमत्सर हा हवेप्रमाणें सर्वत्र संचार करीत असतो. पण कृष्णाच्या चतुर वागणुकीमुळें या मत्सराला वांकडें वळण लागलें नाहीं. कृष्णाचें प्रेम हेंच मोठें वैभव, असें त्याच्या सर्व स्त्रिया मानीत. असें असलें तरी निरनिराळ्या राजमहालांत जरा कांहीं नवीन घडलें, कीं त्याची बातमी दासींच्यामार्फत इतर महालांत पोंचावयास वेळ लागत नसे. आणि मग तेथें आंबटचिंबट चर्चा मानवी धर्माप्रमाणें थोडीबहुत चालावयाचीच. रुक्मिणी ही पट्टराणी, वयानें वडील, स्वभावानें गंभीर, वाणीनें गोड, आणि धोरणानें सर्वांना सांभाळून घेणारी असल्यामुळें तिला इतर स्त्रिया साहजिकच मान देत. सत्यभामा जरा जास्त धीट. इतरांची चेष्टा करण्यांत ती अग्रेसर असे; पण रुक्मिणीच्या वाटेस ती सहसा जात नसे. पण आज कृष्णाच्या इतर सर्व स्त्रियांनीं रुक्मिणीच्या विवाहकथाप्रसंगाचें निमित्त साधून तिची चेष्टा करावयाचें ठरविलें. अशा विवाहप्रसंगाबद्दलच्या चेष्टा स्त्रीजातीला फार आवडतात! आपल्या विवाहाची हकीकत समवयस्क मैत्रिणींना पुन्हां पुन्हां सांगण्यांत स्त्रियांना कधीं कंटाळा येत नाहीं. कारण त्यांत पूर्वानुभव घेतां येतो. रुक्मिणीला सकाळपासून आपल्या विवाहांतले सारे प्रसंग आठवत होते आणि त्याबरोबर तिचे मुखावर विविध भावनांच्या छटा उमटत होत्या.

सायंकाळीं कृष्णानें पाहिलें तों त्याचे रथामागोमाग अनेक रथ येत होते. त्यानें दारुकास विचारलें, 'हे रथ कोणाचे?' तेव्हां दारुक म्हणाला, 'देवा, आज सर्व देवींनीं कथाश्रवणाचा लाभ घेण्याचं ठरविलं आहे.'

कृष्ण—आज इतके दिवस मी आत्मकथा सांगत आहें, त्या वेळीं त्यांना उत्साह नव्हता, आणि आज तो कसा एकदम उत्पन्न झाला?

रुक्मिणी—आज माझ्या विवाहाची कथा आपण निवेदन करणार ना? तो प्रश्न आपणांला विशेष महत्त्वाचा वाटत नसेल, पण आम्हांला आयुष्यांत तोच अधिक महत्त्वाचा वाटतो. आपण पडलां थोर, तेव्हां आपलेकडे अनेक राजकन्या आपण होऊन धांवत येत होत्या. त्यांत माझ्यासारखीचं महत्त्व विशेष काय होतं! विदर्भराजकन्येशीं आपला विवाह झाला एवढं तरी आपल्याला स्मरण आहे हें काय कमी झालं?

गौळवाड्यांत आल्यावर त्यानें आज आपला राजवेष बदलला नाहीं. डोक्यास सोन्याचा हिरेजडित मुकुट, कांसेला पीतांबर, अंगावर उपरण्यासारखा घेतलेला शेला, गळ्यांत वैजयंती माळ, असा त्याचा आज वेष होता. त्यानें आल्याबरोबर थोडेंसें पाणी पिऊन कथेस आरंभ केला.—

"जरासंधाचा पराभव केल्यावर आम्ही मथुरेस येऊन राजधानी मजबूत करण्याच्या मार्गास लागलों. आतां थोडी विश्रान्ति मिळाली होती. माझे वडील-मातोश्रींना माझे विवाहाची काळजी लागली. दादाचं लग्न होऊन गेलं होतं. माझी अशी स्थिति होती कीं, माझ्याशीं कोणीहि राजकन्या विवाह करण्यास तयार झाली नसती! कारण मी राजा नव्हतों, कीं युवराजहि नव्हतों! तातवसुदेवांनंतर दादाच राज्याचे अधिकारी होते. शिवाय माझ्याशीं जरासंधासारख्या सम्राटाचं शत्रुत्व, तेव्हां माझ्याशीं लग्न करून कोणती राजकन्या कृतार्थ झाली असती? तेव्हां मीं मनांत म्हटलं कीं, आपला या जन्मांत तरी विवाह होत नाहीं! पण माझ्या विवाहाचा प्रसंग लवकरच आला. त्यांत किती विघ्नं आलीं तीं पहा! बरं, मी तुम्हांला एक गोष्ट विचारतों ती ही कीं, या विवाहाची हकीकत सविस्तर सांगूं का चटकन् आटोपून घेऊन दुसऱ्या प्रसंगाकडे वळूं?"

सत्यभामा— महादेवीच्या विवाहाची सविस्तर हकीकत आपल्या तोंडून ऐकायची आमची इच्छा आहे! का जांबुवंतीदेवी, असंच ना?

रुक्मिणी— सविस्तर सांगा, पण आमच्यापैकीं कोणाला जातां जातां चिमटे घ्यायचे नाहींत हं!

कुब्जा— हें पहा, महादेवी! द्वारकेंत आल्यावर देवांना आली आहे प्रतिष्ठा; खोड्या करणं शोभत नाहीं म्हणून हे मधून मधून कष्टी होतात. आपण देऊं या यांना खोड्या करण्याची संधि!

कृष्ण— महादेवी ह्या विदर्भराजाच्या कन्या. यांची सौंदर्याची कीर्ति सर्वत्र पसरली होती. असं स्त्रीरत्न आपल्याजवळ असावं असं प्रत्येक तरुण राजाला वाटूं लागलं. उगाच भांडण नको म्हणून भीष्मकराजांनीं रुक्मिणीचं स्वयंवरच करण्याचं ठरवून निरनिराळ्या राजांना निमंत्रणं पाठविलीं. खरं पाहिलं तर मला निमंत्रण यायला पाहिजे होतं, पण तें आलं नाहीं!

सत्यभामा— कां बरं, आपल्याइतका शूर आणि सुंदर—(जीभ चावून) तरुण राजा आर्यावर्तांत दुसरा कोण होता?

कृष्ण— पहिली गोष्ट माझ्याविरुद्ध जी होती ती ही कीं, मी राजा नव्हतों!

रुक्मिणी— म्हणजे? कंसाचं राज्य तुम्हीं पराक्रमानं कमावलं नव्हतं काय? तुम्हीं राज्याभिषेक करून घेतला नाहीं म्हणून तुम्ही राजे नाहीं असं म्हणणं कसं शोभेल?

कृष्ण— कसं शोभेल? (दीर्घ श्वास टाकून) हं; देवी, जगांत भांडणाच्या वेळीं आपले प्रतिपक्षी खऱ्या गोष्टी दृष्टीआड करून तांत्रिक गोष्टीला महत्त्व देऊन वाद माजवितात, तसं या वेळीं राजकन्येच्या भावानं केलं. हा भाऊ म्हणजे रुक्मी. तो होता कंसमामाच्या पक्षाचा. तेव्हां त्याला रुक्मिणीचा माझ्याशीं झालेला विवाह कसा पसंत पडणार? रुक्मीच्या पक्षांत शिशुपाल नांवाचा एक तरुण राजपुत्र होता. त्याचा रुक्मिणीशीं विवाह व्हावा असं रुक्मी व सम्राट् जरासंध यांना वाटत होतं. म्हणून मला विदर्भदेशाच्या राजाकडून निमंत्रण आलं नाहीं.

स्वयंवराची गोष्ट अशी आहे कीं, त्याला कन्येच्या पित्याचं निमंत्रण पाहिजेच असं नाहीं. कारण अशा विवाहांत वराची पसंती कन्या करीत असते. तेव्हां म्हटलं, जावं झालं. म्हणून रथ केला सज्ज आणि गेलों नि काय कुंडिनपुरास !

भीष्मक राजा धूर्त. त्याला कोणालाच दुखवायचं नव्हतं, म्हणून त्यानं माझं स्वागत चांगलं केलं. हें रुक्मी–जरासंधाला पसंत पडलं नाहीं. प्रत्यक्ष राजकन्येला माझं आगमन त्या वेळीं कितपत पसंत होतं हें मला कळलं नाहीं; असो. जरासंधादि राजे विदर्भराजांस म्हणाले, ‘कृष्णानं कंसाचा वध करून आमचा अपराध केला आहे. शिवाय स्वयंवर-मंडपांत त्याला आमचेबरोबर बसतां येणार नाहीं. कारण तो राजा नाहीं.’ तिथं माझे कांहीं मित्र होतेच. त्यांनीं रुक्मीला म्हटलं, ‘जो कमावील त्याचं राज्य असतं. तेव्हां कृष्ण राजा नाहीं कसा ? त्यानं आपण होऊन उग्रसेनाला राज्य नाहीं का दिलं ?’ माझ्या मित्रांना रुक्मी–जरासंधांनीं उत्तर दिलं कीं, ‘राज्य कोणीं कमावलं हें आम्हांला सांगू नका. कृष्णाला मूर्धाभिषेक झाला आहे का ?’ मग ही तांत्रिक अडचण दूर करावी म्हणून माझा मित्र क्रथकौशिक पुढं झाला. त्यानं आपलं राज्य मला अर्पण करून राज्याभिषेकहि तिथं करून टाकला ! मीं कधीं राज्याचा लोभ धरला नाहीं, पण हिची प्राप्ति........अरे पेंद्या, घसा कोरडा पडला कीं रे. पाणी तरी घेऊन ये.

रुक्मिणी— भावोजी, बसा. कांहीं नका उठूं !

कृष्ण— मला स्वयंवरमंडपांतून उठविण्याची कोणाची छाती नव्हती म्हणून जरासंधादि राजे आपले तळ उठवून गेले. भीष्मकराजांना जरासंधादि राजांना दुखवायचं नव्हतं, म्हणून त्यांनीं स्वयंवर बंद करून टाकला; मला मिळालेल्या राज्याचा आतां उपयोग नव्हता; म्हणून मी तें राज्य क्रथकौशिक राजास परत दिलं. विनावधू घरीं परत येणं ही दिसायला लाजिरवाणी गोष्ट होती. पण त्याला उपाय नव्हता ! तरी पण रुक्मिणीच्या प्राप्तीविषयीं मी निराश झालों नव्हतों.

कांहीं दिवसांनीं भीष्मकांनीं आपली कन्या शिशुपालराजास देण्याचं ठरवून लग्नास येण्याबद्दल राजेलोकांना पत्रं पाठविलीं. मला पत्र कसं येणार ?

मीं काय करावं या विचारांत पडलों. रुक्मी माझेविरुद्ध होता, पण भीष्मक राजे मनांतून माझेविरुद्ध नव्हते. रुक्मिणीच्या मनाचा थांग मला बरेच दिवस लागला नव्हता. तुम्हांला माहीत आहे कीं, मी जसा थोडा उतावळा आहे तशी तुमची भगिनी नाहीं. तिनं आपल्या एका विश्वासांतल्या सत्-प्रवृत्त वृद्ध गृहस्थाबरोबर मला एक पत्र पाठविलं.

रुक्मिणी— मीं पत्र लिहिलं नव्हतं.

कृष्ण— मग काय तुला शिशुपाल वर पसंत होता तर? खरं सांग; तुला सत्यभामेची शपथ आहे!

सत्यभामा— तुमच्या कलहांत माझा काय संबंध ?

कृष्ण— तुझा प्रत्येक कामांत संबंध आहे. तूं सामान्य भामा का आहेस? तूं सत्यभामा आहेस. आतां प्रश्न उत्पन्न झाला आहे, सत्य-निर्णयाचा, म्हणून तुझी शपथ घातली! मग रुक्मिणी, सांग, तूं मला पत्र पाठविलंस कीं नाहीं?

रुक्मिणी—याची शहानिशा आतां कशाला? तुम्ही आपली सरळ कथा सांगा ना!

कृष्ण— मी सरळपणं कथा सांगत होतों. तूंच माझ्या वचनाला हरकत घेतलीस. तूंच जर मी सांगतों तें सत्य मानलं नाहींस तर पुढं जग तरी या कथेवर कसा विश्वास ठेवील ?

रुक्मिणी—आतां वादांग काढूं नका. चालू द्या ना कथा!

कृष्ण— माझ्या स्मृतीप्रमाणं हिनं आपल्या विश्वासांतल्या ब्राह्मणाबरोबर पत्र को निरोप पाठविला. मी त्यांतील सर्व मजकूर सांगणार नाहीं. तो आमच्या पति-पत्नींतला खासगी प्रश्न आहे. निरोपाचो सारांश असा होता कीं, विवाहापूर्वी तुम्ही मला कसंहि करून घेऊन जा! मी ताबडतोब रथ सज्ज करून शीघ्र गतीनं निघालों. रुक्मिणी सकाळीं देवीचे दर्शनास गेली होती. दर्शन करून ती बाहेर येते तों माझा रथ तेथें सज्ज! ती कांहीं एक विचार न करतां सरळ आली आणि माझ्या रथांत बसली. मीं ताबडतोब रथ जोरानें हांकला. मग तिचा भाऊ रुक्मी आणि शिशुपाल

रुक्मिणीचें पत्र



रुक्मिणी-हरण

यांनीं माझा पाठलाग केला. मीं त्यांना मग पिटाळून लावलं; आणि मी आमच्या नव्या राजधानीस आलों. तेथें आमचा यथाविधि विवाह झाला. ती जी एकदां द्वारकेला आली ती परत पुन्हां माहेरीं गेलीच नाहीं. मला विवाहाची आशा नव्हती. पण विदर्भराजकन्येच्या कृपेमुळं मी चतुर्भुज झालों! रुक्मिणीनं जर मला पत्र पाठवून बोलाविलं नसतं तर मी दुसऱ्याचे लग्नांत विघ्न उत्पन्न करून तिला पळवून आणली असती का? रुक्मिणी, आतां तरी कबूल कर!

कुब्जा—महादेवी, करा ना कबूल. मी कबूल करतें कीं, देवांना पाहिल्याबरोबर मीं मनांत ठरविलं कीं, करीन तर यांच्याशींच लग्न करीन!

कृष्ण— अशा रीतीनं विघ्न दूर होऊन माझा विवाह झाला. माझ्या प्रत्येक विवाहांत कांहीं तरी भानगडी उत्पन्न व्हायच्याच. ही सत्यभामा, मला मिळाली ती सुखानं नव्हे. मजवर स्यमंतकमणि चोरल्याचा आरोप तिच्या वडिलांनीं एकदां राजरोस केला! पुढं तो आरोप खोटा होता असं मीं सिद्ध करून दिलं तेव्हां ते प्रसन्न झाले, आणि मग त्यांनीं आपली ही आवडती कन्या मला अर्पण केली! या जांबुवंतीच्या विवाहाची कथा अशीच. हिच्या वडिलांशीं स्यमंतकमण्याकरितां मला २१ दिवस युद्ध करावं लागलं. तेव्हां मला तो मणि आणि त्यांची सुकन्या प्राप्त झाली. असो. आज इतकं पुरे.

घरीं येतांना रथांत रुक्मिणी म्हणाली, " देवा, हें काय? माझ्या पत्राच्या गोष्टी चार–चौघांत सांगायच्या असतात काय? हें चुकलंच आपलं.

कृष्ण—वयोमानानं अलीकडे मला अवधान राहात नाहीं. खरंच चुकलं!

रुक्मिणी— बरं अवधान राहात नाहीं!

असा संवाद चालू असतां रथ मंदिरांत आला.

# १०

## नवीन पिढीचे विचार

आज दुपारीं जांबुवंतीच्या महालांत तिचा पुत्र सांब कांहीं कामासाठीं आला होता. तेव्हां जांबुवंतीनें त्याला म्हटलें, "सांबा, तुझे तात हल्लीं आपली आत्मकथा सांगत आहेत. ती ऐकतांना अंगावर रोमांच उठतात. तुम्हीं मुलांनीं खरं म्हटलं तर ती कथा ऐकायला यायला पाहिजे, नाहीं का?"

सांबानें थोडेंसें हंसल्यासारखें केलें व म्हटलें, 'मीं ती कथा ऐकायला यावं असं तूं म्हणत असशील तर येईन; पण आम्हां तरुण पिढीला पिताजींचे विचार व धोरण पसंत नाहीं. वडील माणसांचा मान ठेवला पाहिजे, म्हणून आम्ही बंधु कांहीं बोलत नाहीं. आम्हांला त्यांच्या चरित्रांत आकर्षक असं कांहीं दिसत नाहीं !

जांबुवंती— म्हणजे ? म्हणजे तूं बोलतोस काय सांबा ?

सांब— माते, खरं तेंच बोलतों. प्रत्येक वेळीं यांची आपली माघार. कंसाला मारल्यावर आयतं राज्य हातीं आलं होतं तें त्यांनीं घालवलं; आणि मग ते राजे नाहींत म्हणून स्वयंवर-मंडपांत त्यांना कोणी येऊं देईना. त्यांनीं जर राज्य स्वीकारलं असतं तर अभिमन्यूप्रमाणं आम्हींहि राजपुत्र म्हणून मिरवलों असतों, नाहीं का? तुम्हांला वाटतं तातांच्याहून अधिक पराक्रमी कोणी नाहीं—

जांबुवंती— त्यांत कांहीं संशय आहे काय ?

सांब— तुम्ही पडलां पतिव्रता; मंदिराच्या बाहेर कधीं पडत नाहीं. तेव्हां जगांत तातांच्याहून पराक्रमी लोक किती तरी आहेत हें तुम्हांला कसं कळणार ? तात जर अजिंक्य असते तर मथुरेंतून पळून ते इकडे कां आले असते ? त्यांच्या पडखाऊ धोरणामुळं आमची कुचंबणा किती होते त्याची तुम्हांला काय कल्पना ?

जांबुवंती— सांबा, तुझ्या जिभेला कांहीं हाड आहे का? म्हणे आमची कुचंबणा होते! माहीत आहे तुझा पराक्रम. गेला होतास वत्सलेचं हरण करायला, आणि झालास दुर्योधनाचा कैदी! यांनाच शेवटीं जाऊन तुझी सुटका करावी लागली ना? एवढ्यांत विसरलास वाटतं तो प्रसंग?

सांब— त्यांत आमचं थोडं चुकलं खरं; म्हणून तातांचं धोरण आम्हांला पसंत असावं असं होत नाहीं. हल्लीं आपल्या घरीं व्यास-शिष्याचं आणि नारद वगैरे ऋषींचं स्तोम जें माजलं आहे तें आम्हांस पसंत नाहीं. या वेदान्तचर्चेपासून आमच्या वैभवांत थोडी तरी भर पडते काय? पण आम्हीं ठरवलं आहे कीं, वृद्धांना विरोध करायचा नाहीं!

जांबुवंती— दुर्दैव आमचं, नि काय! कीं अशा पितृद्रोही पुत्रांना आम्हीं जन्म दिला!

जांबुवंतीचे हे शब्द ऐकून सांबाला राग आला, व तो दांत-ओठ चावीत तेथून निघून आपल्या मंदिरांत गेला.

जांबुवंतीला सांबाचे विचार ऐकून जें दुःख झालें तें कोणाजवळ सांगितल्याशिवाय तिला राहवेना, म्हणून ती रुक्मिणीचे मंदिरांत गेली. तेथें श्रीकृष्ण बसला होता.

जांबुवंतीचे डोळे पाण्यानें डबडबलेले पाहून व नाक-कान लाल झालेले पाहून कृष्ण म्हणाला, “काय भानगड घेऊन आलांत?”

जांबुवंती रुक्मिणीचे आसनाजवळ गेली, व तिचे पोटांत आपलें डोकें खुपसून मुक्तकंठानें हुंदके देऊं लागली. रुक्मिणीनें तिचे मस्तकावरून हात फिरवला, डोळे पुसले, व कष्टी होण्याचें कारण ममतेच्या शब्दांत विचारलें. जांबुवंतीनें हळूहळू नुकताच झालेला प्रकार निवेदन केला. तेव्हां रुक्मिणी म्हणाली, “ही सर्व चूक देवांची आहे. यांनीं पहिल्यापासून मुलांना धाकांत ठेवलं नाहीं!”

कृष्ण— महादेवी, मुलांच्या शिक्षणाची जेवढी काळजी घ्यायची तेवढी मीं घेतली आहे. सांबाला जसं शिक्षण दिलं तसंच अभिमन्यूला. मग दोघांच्या विनयसंपन्नतेंत एवढा फरक कां पडावा? शिक्षण, सत्संगति

यांचं फल मोठं आहे हें खरं, पण पूर्वजन्मींच्या संस्कारांचं बळ नाकारून चालत नाहीं. आपल्याला वीर्यवान् पुत्र लाभले हें खरं; पण त्यांना माझी विचारसरणी मान्य नाहीं. ते मजपासून दूर दूर राहतात, यामुळं पराक्रमाशिवाय ज्या दुसऱ्या गोष्टी जीवन यशस्वी करण्याला लागतात, त्यांचा त्यांस लाभ होत नाहीं. याबद्दल शोक करण्यांत अर्थ नाहीं. आपण असा विचार करावा कीं, आपण निपुत्रिकांपेक्षां भाग्यवान् नाहीं का ? तुम्हां दोघींना कोणी भीरु-प्रसवा म्हणेल का ? परवां मी येथें नव्हतों, तेव्हां या माझ्या वीर्यवान् पुत्रांनीं शत्रूपासून द्वारकेचं रक्षण नाहीं का केलं ? मागच्या पिढीची विचार-सरणी पुढच्या पिढीनं जर डोळे मिटून मान्य केली तर जगाची प्रगति होईल का ?

जांबुवंती— पण वडीलमंडळींबद्दल अनादराची भावना त्यांनीं बाळगणं युक्त होईल का ? नारदादि थोर ऋषींबद्दल त्यांना तिरस्कार वाटतो हें पाहून मला या मुलांचं धड चिन्ह दिसत नाहीं, असं वाटून वाईट वाटतं.

असें बोलणें होत आहे तोंच ‘ बाहेर रथ येऊन उभा आहे ’ असें दासीनें येऊन सांगितलें.

रुक्मिणी— जांबुवंती, देवांपासून मी एक धडा शिकलें आहें. त्यामुळं मला फारसं दुःख होत नाहीं.

जांबुवंती— तो कोणता, महादेवी ?

रुक्मिणी— आपल्याजवळ काय नाहीं, यापेक्षां काय आहे याचा विचार मनुष्यानं करावा; म्हणजे त्याला समाधानाचं सौख्य लाभतं !

दा. क्र. ७७८९

यानंतर सर्व जण रथांत बसून गौळवाड्यांत गेलीं.

गौळवाड्यांत आल्याबरोबर कृष्ण म्हणाला.—

“ मी मथुरेचं राज्य सोडून इकडे द्वारकेंत येऊन राहिलों तरी माझे प्रति-पक्षीयांनीं माझी पाठ सोडली नाहीं. सम्राट् जरासंधाच्या सैन्याला मी दाद देत नाहीं असं पाहून त्या दीर्घद्वेषी राजानं कालयवनाची मदत घेऊन माझा निकाल करायचं ठरविलं. कालयवन व शाल्व यांनीं पश्चिमेकडून व जरा-संधानं पूर्वेकडून मथुरेवर हल्ला करायचं ठरवलं. मनुष्य कितीहि शूर असला

तरी आपल्यापेक्षां संख्येनं अनेक पट असलेल्या सैन्याशीं तो यशस्वीपणानं तोंड कसा देऊं शकेल? अशा वेळीं लढा टाळणं हें युद्धनीतीला धरून आहे. म्हणून मीं मथुरा सोडली, आणि दक्षिण दिशेनं निघालों तो एका पर्वतराजींत शिरलों. कालयवन सैन्य सोडून एकटाच माझेमागं धांवला.

जेव्हां सैन्यबलानं युद्ध जिंकणं अशक्य होतं तेव्हां बुद्धिबलाचा आश्रय करून जयप्राप्ति करून घ्यावी लागते. मी पुढं धांवत होतों; मी गलितधैर्य होऊन धांवत होतों असा कालयवनानं भलताच समज करून घेतला. माझं धैर्य अभंग होतं. माझी बुद्धि बचावाचा मार्ग शोधीत होती. इतक्यांत माझ्या लक्षांत आलं कीं, मुचकुंदराजाची गुहा जवळ आहे. मी सरळ त्या गुहेंत शिरलों, व जेथें तो राजा झोंपला होता त्या जागेपासून जरा दूर अशा कोपऱ्यांत जाऊन उभा राहिलों. माझ्या अंदाजाप्रमाणं कालयवन त्या गुहेंत शिरला, व मुचकुंद राजा पांघरूण घेऊन झोंपलेला पाहून त्याला वाटलं मीच झोंपेचं सोंग घेऊन पडलों आहें. कालयवन शूर होता. बलवान् होता; पण त्याला आपल्या बलाचा गर्व झाला होता. शिवाय त्याचेवर नागरिक शिष्टाचाराचे संस्कारहि झाले नव्हते. म्हणून त्यानं मुचकुंदाला शिवी देऊन लाथ मारली. त्याबरोबर तो राजा जागा झाला, व त्यानं संतापानं कालयवनाकडे पाहिलं. तेव्हां त्याच्या नेत्रांतून निघालेल्या ज्वालेनं कालयवन तेथल्या तेथें भस्म झाला! अशा रीतीनं माझा एक महाबलाढ्य शत्रु नाहींसा झाला!

पेंद्या—कृष्णा, नुसत्या पाहण्यानं मुचकुंदराजानं कालयवनाला भस्म कसं केलं तें समजलं नाहीं बुवा!

कृष्ण—मुचकुंदराजानं देवांना दैत्यांचं पारिपत्य करण्यास चांगली मदत केली होती. म्हणून देवांनीं त्या राजाला म्हटलं कीं, 'वाटेल तो वर मागून घे.' तेव्हां मुचकुंद म्हणाला, 'मला अखंड निद्रा प्राप्त व्हावी; आणि जो माझ्या निद्रेचा भंग करील तो माझ्या दृष्टिक्षेपानं भस्म व्हावा!' कालयवनानं त्या मुचकुंदाला जागा केला, म्हणून तो भस्मसात् झाला.

सत्यभामा—मुचकुंदाच्या गुहेची आणि त्याला मिळालेल्या वराची माहिती तुम्हांला कोणीं सांगितली?

कृष्ण— कालयवनानं माझा जो पाठलाग केला तो कित्येक महिने चालला होता. एके दिवशीं मी थकून वटवृक्षाखालीं विश्रान्ति घेत पडलों होतों. इतक्यांत एक किरात हिंडत तेथें आला व मजजवळ गप्पा मारीत बसला. मीं बोलतां बोलतां त्याला विचारलं कीं, 'इकडे एखादी मोकळी गुहा आहे का?' तेव्हां तो म्हणाला, 'आहे एक; पण तुम्ही तेथें चुकूनहि जाऊं नका. तेथें एक राजा निजला आहे. तो म्हणे नेहमींच झोंपलेला असतो. लोक म्हणतात, त्याला जर कोणीं जागं केलं तर तो राजा जागं करणारास जाळून टाकतो!' ही माहिती मला त्या किराताकडून मिळाली. तिचा फायदा मीं वर सांगितल्याप्रमाणं घेतला. संकटांतून सुटण्याकरितां मनुष्यानं नेहमीं जागृत राहिलं पाहिजे. मी गुराखी, किरात वगैरे लोकांत मिसळत असें, यामुळं मला जंगलांतील अनेक गोष्टींची सहज माहिती मिळे. असो.

ज्या सम्राट् जरासंधानं कालयवनास बोलावून मला मारण्याचा बेत केला होता त्यानं अनेक राजांना कैदेंत टाकून शंभर पुरुषांचा नरयज्ञ करायचं ठरविलं होतं. ही घोर हत्या कशी थांबवावी या विचारांत मी असतां माझा मित्र धर्मराज याचं इंद्रप्रस्थाहून मला निमंत्रण आलं. मी तेथें गेल्यावर धर्मराज म्हणाला, 'मला राजसूययज्ञ करायचा आहे. तरी तुझा सल्ला काय आहे?'

मीं म्हटलं, 'राजसूययज्ञ करण्याची कल्पना ठीक आहे; परंतु जरासंध राजा जोंपर्यंत सम्राट् म्हणून मिरवतो आहे तोंपर्यंत तुला हा यज्ञ कसा करतां येईल? तरी त्याच्या वधाची योजना प्रथम करायला हवी.'

यानंतर मी, अर्जुन व भीम ब्राह्मणवेषानं जरासंधाचे राजधानींत गेलों. राजानं आमचा सत्कार केला, पण आम्हीं तो न स्वीकारतां त्यास युद्धाचं आव्हान दिलं. त्यानं भीमाबरोबर मल्लयुद्ध करण्याचं ठरविलं.

पेंद्या— कृष्णा, तुझ्याशीं तो कां लढला नाहीं? तुला तर तो आपला शत्रु समजत असे!

कृष्ण— बरोबर आहे. त्यानं खरं पाहिलं तर माझ्याशीं युद्ध करायला पाहिजे होतं; पण तो गर्विष्ठ राजा मला म्हणाला, 'तूं माझ्यासमोर युद्धाला

उभा न राहतां पळून गेलेला आहेस; तेव्हां युद्ध करायला तूं माझ्या बरोबरीचा नाहींस.' यानंतर भीमाचं व जरासंधाचं अनेक दिवस घोर युद्ध झालं. शेवटीं जरासंध थकून पळून जाऊं लागला; तेव्हां मीं भीमाला म्हटलं, 'त्याला या वेळीं तूं सोडूं नकोस. तो शक्तिवर्धक पेयें पिऊन ताजातवाना होईल; मग तुला तो आटोपायचा नाहीं.' माझ्या सल्ल्याप्रमाणं भीमानं त्याला धरून पाडला, व उभा चिरून टाकला!

यानंतर धर्मराजाचा मोठ्या थाटामाटानं राजसूययज्ञ झाला. यज्ञारंभीं वडीलधाऱ्या थोर लोकांची पूजा करण्याची वहिवाट आहे. त्याप्रमाणं धर्मराजानं भीष्मपितामहांस विचारलं कीं, 'प्रथम पूजा कोणाची करूं?' तेव्हां भीष्मांनीं माझं नांव उच्चारलं. त्याबरोबर सहदेवानं पुढं होऊन माझे पाय धुतले. तें पाहतांच शिशुपाल उभा राहिला, व त्यानं पूजा करणाऱ्या पांडवांची, सल्ला देणाऱ्या भीष्माची, व पूजा स्वीकारणाऱ्या माझी मनसोक्त निंदा केली. शिशुपालाच्या मनांत रुक्मिणीशीं लग्न करायचं होतं हें तुम्हांला माहीत आहेच. पण हिनं मला वरलं, यामुळं तो माझा जन्माचा वैरी बनला होता. शिवाय तो होता जरासंध व कंस यांच्या पक्षांतला, यामुळं तो माझा द्वेष करी. माझी अग्रपूजा म्हणजे इतर राजांचा अपमान, असं म्हणून, त्यानं बोलूं नये तें बोलून घेतलं. मीं तें सर्व शान्तपणं ऐकून घेतलं; पण तो इतकं बोलून न राहतां मला मारण्यास उद्युक्त झाला, तेव्हां मग मीं त्याची गय केली नाहीं. लगेच सुदर्शनचक्र फेकलं व त्याचं मस्तक तेथल्या तेथें धडापासून वेगळं केलं! अशा रीतीनं माझे दोन बलाढ्य शत्रु नाहींसे झाले; पण एवढ्यानं माझी संकटपरंपरा संपली नाहीं.

पेंद्या— कृष्णा, एंकदरींत तूं संकटभऱ्याचं दिसतोस!

कृष्ण— अगदीं खरं आहे. आज एका विदूषक शत्रूची कथा सांगून आपण उठूं या.

कंस, जरासंध, रुक्मी, शिशुपाल यांसारख्या बलवान् राजांशीं माझा संग्राम झाल्यामुळं माझं नांव राजमंडळांत प्रसिद्ध झालं. या मंडळांत एक विदूषक राजा होता. तो म्हणे, 'कृष्ण कोण एवढा मोठा? मीच मोठा. कृष्ण विष्णूचा अवतार नसून मीच खरा अवतार आहें.' तो स्वतःला वासुदेव म्हणवी.

माझींच आयुधं तो वापरी. प्रत्येक बाबतींत तो माझी नक्कल करी. मला त्याची मौज वाटे. माझे मित्र त्याला नकल्या म्हणून चिडवीत. एक दिवस या विदूषकानं मजवर उगीचच्या उगीच हल्ला केला. माझा निरुपाय झाला, आणि शेवटीं त्याचा पराभव करून मला त्याला ठार मारावं लागलं.

मी राजसूययज्ञाकरितां इंद्रप्रस्थास गेलों असतां जरासंधाचा पक्षपाती शाल्व राजा यानं माझ्या द्वारकेवर अकारण हल्ला कसा केला, आणि ही सुंदर पुरी कशी उध्वस्त केली हें तुम्ही सर्व जाणतांच. असो. आज एवढं पुरे.

असें म्हणून कृष्ण, रुक्मिणी, सत्यभामा घरीं यावयासं निघालीं. वाटेंत सत्यभामा म्हणाली, 'देवा, आज भावोजींनीं तुम्हांला एक यथार्थ नांव दिलं. **संकटभय्या** हें नांव ऐकून मला मौज वाटली.'

कृष्ण—आमचा पेंद्या कधीं कधीं अगदीं यथार्थ पण गमतीचं बोलतो. यामुळं मला तो नेहमीं आवडतो.

असें बोलणें होत असतां मंडळी स्वगृहीं आली.

# ११

## सुभद्रा-हरण

आज दुपारीं कृष्ण-स्त्रियांनीं सुभद्रेस गांठलें व त्या तिला म्हणाल्या, 'वन्सं, तुमच्या विवाहाची हकीकत आम्हांला संपूर्णपणं ऐकायची आहे; तरी एकदां सांगा पाहूं.'

तेव्हां सुभद्रा म्हणाली, "हें पहा, माझ्या विवाहाची संपूर्ण हकीकत रुक्मिणी-वहिनींना माहीत आहे. तेव्हां त्यांनाच विचारा; नाहीं तर तुमच्या हक्काचा माझा दादा आहे ना, त्यालाच आग्रह करा. माझ्याच तोंडून ती सर्व हकीकत ऐकण्याचा आग्रह कां?"

सत्यभामा — पण वन्सं, तुम्ही आज 'आत्मकथा' ऐकायला आलं पाहिजे!

सुभद्रा — आत्मकथा कृष्णाची का माझी? त्यानं ती सुरू केली हें तुम्हीं मला कळूंहि दिलं नाहीं.

सत्यभामा — वन्सं, ही उलट मेख खरी! वन्सं, तुम्ही सदा न् कदा अभिमन्यूच्या संगोपनांत. अहो, आम्हांलाहि मुलगे आहेत. आमचं त्यांच्यावर प्रेम आहे; पण आम्ही नाहीं इतक्या पुत्रवेड्या!

सुभद्रा — वहिनी, सर्व परिस्थिति तुला माहीत आहे ना? आम्ही आज वनवासी आहोंत. वनवास संपल्यावर—

रुक्मिणी — पांडवांना कौरवांकडून राज्य हिसकून घ्यायचं आहे, म्हणून अर्जुनदेवांना साहाय्य करणारा असा महारथी आपल्या अभिमन्यूला तयार करण्यांत त्या गुंतल्या आहेत. त्यांना माहीत नाहीं अजून, कीं देवांना अभिमन्यूची काळजी किती आहे!

सुभद्रा — कृष्णदादाच्या काळजीला जगांत तोड नाहीं. पुढं लोक खऱ्या कळकळीला, आस्थेला कृष्ण-काळजी असं म्हणूं लागतील. हें मला समजतं. पण आईचं मन वेडं असतं ना! तशांत संकटग्रस्त आईचं मन जास्तच खुळं बनतं, नाहीं का?

असें बोलतांना सुभद्रेनें डोळ्याला पदर लावला.

रुक्मिणी—नका वन्सं डोळ्याला पाणी आणूं. सर्व कांहीं ठीक होईल. अलीकडे देवांचं सर्व लक्ष पांडवांच्या राज्यसाधनेकडे लागलं आहे. बरं, आज आमच्याबरोबर तुम्ही गौळवाड्यांत या; तिथं तुमची चांगली करमणूक होईल.

आज कृष्णानें सुभद्रेस आपल्या रथांत घेऊन गौळवाड्यांत नेलें. वाटेंत सत्यभामा कृष्णास म्हणाली, "हें पहा, वन्संच्या विवाहाची कथा संपूर्णपणं ऐकायची आमची इच्छा आहे."

कृष्ण—तुम्हीं एवढे प्रसंग ऐकलेत, पण त्यांत तुम्ही जितक्या तल्लीन झालां नाहीं, इतक्या विवाह-कथा ऐकण्यांत होतां. बरं तर, आपल्याला काय? श्रोत्यांच्या इच्छेला वक्त्यानं मान दिला पाहिजे. पण आम्हीं बडबड करायची, आणि तुम्हीं आपआपसांत कुचकुचत बसायचं असं मात्र होऊं नये.

बोलतां बोलतां रथ गौळवाड्यांत आला. रथांतून उतरल्याबरोबर कृष्णानें सुभद्रेला म्हटलें, "सुभद्रे, हें पहा आमचं येथलं गोकुळ. त्या पाहिल्यास गाई कशा डुलत डुलत येत आहेत? माझं खरं धन हेंच! इथं आलं म्हणजे—"

रुक्मिणी—वन्सं, एकदां का हे या गाई-गोऱ्ह्यांत रमले कीं मग कथा सांगायची पार विसरून जातील, आणि मग सत्यभामादेवी रागावेल!

कृष्ण—अगदीं खरं. चला आपण आपली कथा चालू करूं. काय, आज सुभद्रेच्या विवाहाची हकीकत तुम्हांला ऐकायची आहे ना?

सत्यभामा—होय तर!

कृष्ण—त्याचं असं झालं,—माझा मित्र अर्जुन एकदां हिंडत हिंडत द्वारकेला आला. आमच्या घरीं राहिला. त्या वेळीं आमची ही सुभद्रा उपवर झाली होती. तेव्हां मीं दादांना म्हटलं, सुभद्रेला अर्जुनास द्यावी. दादा म्हणाले, 'दुर्योधन काय वाईट?' पण माझा ओढा अर्जुनाकडे पाहून त्यांनीं संमति दिली; आणि मग केवढ्या थाटानं लग्न झालं म्हणून सांगूं! घोड्यावर बसून अर्जुन जेव्हां वधूगृहीं आला—

सत्यभामा—आम्हांला पहिल्यापासून सर्व ऐकायचं आहे.

कृष्ण—काय रुक्मिणी, मीं पहिल्यापासून नाहीं का हकीकत सांगितली? पहिल्यापासून म्हणजे सुभद्रेच्या बालपणापासून का अर्जुनाच्या जन्मा-

पासून? बरं, जाऊं द्या. तुम्हांला सुभद्रेच्या विवाहाची हकीकत हवी का सुभद्राहरणाची हवी?

सत्यभामा— आतां कसं नीट बोललांत! प्रत्येक वेळीं आम्हांला शब्दांत पकडतां—

कृष्ण— तुम्हांला नेहमीं हरणाच्या गोष्टी हव्यात; पण हीं 'हरणं' सोपीं नाहींत! प्राणावर बेतण्याचा संभव असतो! युद्धाच्या कथेप्रमाणं या वधू-हरणाच्या गोष्टीं ऐकायला रम्य असतात. असो. मघाशीं सांगितल्याप्रमाणं अर्जुन कांहीं प्रायश्चित्त घेण्याकरितां यतिवेषानं प्रभास-तीर्थावर आला. दादांनीं त्याला ओळखला नाहीं. त्यांना वाटलं, तो मोठा महान् योगी असावा! म्हणून त्यांनीं त्याला घरीं आणून त्याचं पूजन केलं. त्या वेळीं ही आमची सुभद्रा आतांच्यासारखी स्थूल नव्हती. सडपातळ असून त्या वेळीं तिचे डोळे हरणासारखे मोठे व चंचल होते. ओठ पोवळ्यासारखे व दांत तर शुद्ध कुंदकळ्या. केशभारहि विपुल होता. साहजिकच अर्जुनाच्या मनांत ती भरली, व सुभद्राहि चोरून अर्जुनाला पाहून घेई. खरं ना सुभद्रा? नाहीं तर म्हणशील कृष्ण तिखटमीठ लावून सांगतो आहे!

सत्यभामा— काय वन्सं, सत्य सत्य त्रिवाचा ना! गोड लागतात ना भावाचे बोल?

सुभद्रा— कृष्णा, तुझ्या तोंडीं कोणीं लागावं?

कृष्ण— बरं, मी कथा लांबवीत नाहीं. अर्जुनाला सुभद्रा व सुभद्रेला अर्जुन पसंत पडले हें पाहून मीं अर्जुनाला म्हटलं, 'अर्जुना, दादाच्या मनांत सुभद्रेला दुर्योधनास द्यावी असं आहे. तेव्हां तुला मागणी घालूनही मिळणार नाहीं. संधि पाहून तुला तिला हरण करूनच न्यावी लागेल.' मीं हा सल्ला दिला खरा, पण अर्जुनानं जर सुभद्रेचं हरण केलं तर दादांशीं गांठ आहे. काय करावं या चिंतेंत मी होतों. पुढें संधि साधून अर्जुनानं सुभद्रेला रथांत घालून पलायन केलं! यतीनं सुभद्रेला नेलं म्हणून यादव रागावले. दादांना ही बातमी कळतांच ते मुसळच घेऊन आले, व मला म्हणाले, 'कृष्णा, स्वस्थ काय बसलास? ऊठ.' मीं मान खालीं घालून बसलों. दादांनीं कारण विचारलं. तेव्हां म्हटलं, 'तो

यति दुसरा कोणी नसून आपला अर्जुनच आहे.’ तेव्हां दादा म्हणाले, ‘माझ्या मनांत सुभद्रेला दुर्योधनाला द्यायची होती.’ मीं म्हटलं, ‘अर्जुन शौर्यानं, रूपानं, आणि सद्गुणानं दुर्योधनापेक्षां श्रेष्ठ आहे.’ यावर दादा गप्प बसले. त्यांचं मजवर अपार प्रेम! अनावर झालेला राग त्यांनीं आंवरला. अर्जुनाला सन्मानानं बोलावून घेतलं, आणि सुभद्रा-अर्जुनांचा विवाह मोठ्या थाटानं लावून दिला.

“आमचं घराणं बलिष्ठ होण्याचं कारण आमच्या भावांतली एकी! जरा दमानं घ्यावं, म्हणजे प्रेम वाढून आपल्या मनासारखं होतं. असो. आतां एक प्रसंग सांगून आटोपतं घेतों.

मीं रुक्मिणीचं हरण केलं, अर्जुनानं सुभद्रेचं केलं, हें ऐकून आमच्या सांबाला वाटलं, आपण जर एखाद्या स्त्रीचं हरण केलं नाहीं तर कुलधर्म बुडेल! पण त्यानं विचार केला नाहीं कीं, मी रुक्मिणीच्या संमतीनं तिला घेऊन आलों. शिवाय प्रसंग आलाच असता तर रुक्मी-शिशुपाल यांना मी पुरून उरेन अशी मला खात्री होती. अर्जुनानं तर सर्व माझ्या सल्ल्यानेंच केलं. म्हणून हीं ‘हरणं’ पचलीं! सांबानं विचार न करतां दुर्योधनाच्या कन्येला पळवून आणण्याचा प्रयत्न केला. त्या कन्येचं सांबावर कांहीं प्रेम नव्हतं. यामुळं सांब फसला गेला. कौरवांनीं त्याला बंदीवान् केला, आणि मग आम्हांला जाऊन त्याला सोडवून आणावा लागला. पुढें दादांनीं आपल्या पराक्रमानं दुर्योधनाला आपली कन्या आमच्या सांबाला द्यायला भाग पाडलं. असो.

आतांपर्यंत मीं आपल्या आयुष्यांतील कांहीं प्रसंग जसे आठवले तसे सांगितले. मला लवकरच पांडवांकडे जाणं आहे. पांडव वनवासांतून बाहेर आले आहेत. त्यांनीं मला बोलावलं आहे. मी लवकरच तिकडे जाऊन येतों. तुम्हां सर्वांस एक आनंदाची बातमी सांगायची आहे. ती म्हणजे आमच्या सुभद्राताईला लवकरच सून येणार आहे.

रुक्मिणी— का हो वन्सं, आम्हांला कांहीं दाद लागूं दिली नाहीं! मनमोकळ्या म्हणतां म्हणतां बऱ्याच आंतल्या गांठीच्या आहांत कीं!

सुभद्रा— रुक्मिणीवहिनी, मला यांतलं कांहीं एक माहीत नाहीं. भांवोजींचं बोलावणं आलं आहे एवढं कृष्णानं मला सकाळीं सांगितलंन्.

तुम्हाला कृष्णाचा स्वभाव आहे ना माहीत? आपलाच दाम खोटा, आणि मला उगीच कां बोल लावतां?

कृष्ण— हें पहा, मीच सर्व आतां सांगतों. सकाळीं जर या विवाहाबद्दल एकीजवळ बोललों असतों तर इतरांनीं मला बोंचून बोंचून घेतलं असतं. म्हणून सर्वांना एकदमच सांगण्याचं मीं ठरविलं आहे.

सत्यभामा— ठरवलं खरं, पण अजून तरी सर्व सांगत आहेत का? मुलगी कोणाची, केवढी आहे, लग्न कोठं होणार? याबद्दल एक अक्षर बोलतील तर शपथ! म्हणे आम्हीं बोंचलं असतं!

कृष्ण— पुरे ना आतां; आनंदाची बातमी आनंदानं ऐकावी. ऐका तर आतां. तुम्हांला कदाचित् माहीत नसेल कीं, पांडव वनवास संपल्यावर विराट-राजाजवळ वेष पालटून गुप्तपणं राहिले होते. सुभद्रे, तुझ्या अर्जुनानं नट-वेष धारण करून विराटराजाच्या मुलांना गायन-नृत्य इत्यादि कला शिकविली. त्याच्या शिष्यवर्गांत विराटाची मुलगी उत्तरा होती. कौरवांनीं एकदां विराट-नगरीवर हल्ला केला, तेव्हां अर्जुनानं आपला वेष टाकून गांडीव धनुष्य घेऊन त्यांना पिटाळून लावलं. पांडवांची ओळख पटल्यावर विराटानं त्यांचा सन्मान केला व आपली मुलगी उत्तरा तो अर्जुनास देऊं लागला. कांहीं घाबरूं नकोस सुभद्रे! पण अर्जुन म्हणाला, 'मी उत्तरेला शिष्या समजत आलों आहें. तेव्हां मी तिजपाशीं लग्न करूं शकत नाहीं.' यावर विराटराजा ऐकेना. तेव्हां अर्जुन म्हणाला, 'बरं तर, मी तिचा सून म्हणून स्वीकार करीन.' विराटानं अर्जुनाचं म्हणणं मान्य केलं. अशा रीतीनं आपल्या अभिमन्यूचा विवाह ठरला आहे, व त्याकरितां मी सुभद्रेला घेऊन लवकरच निघणार आहें. परत आल्यावर तिकडची सर्व हकीकत सांगेन.

रुक्मिणी— म्हणजे आम्हांला विवाहाकरितां न्यायचा बेत दिसत नाहीं?

कृष्ण—खरं आहे. आकाशांत ढग जमत आहेत. ती पहा, वीजसुद्धां चमकली. उठावं आतां, झालं.

# १२

## वैराची कारणमीमांसा

राजनीति असें सांगते कीं, ज्यावर मोठाल्या राजकीय उलाढालींची जबाबदारी आहे त्यानें नेहमीं कमी बोलावें. आपल्या आप्तजनांजवळ भावी राजकीय घटनांबद्दल बोलू नये. कारण जें षट्कर्णी झालें तें जगांत पसरण्यास वेळ लागत नाहीं; आणि मग आंखलेले बेत फसतात. कृष्णाला ही नीति चांगली अवगत होती. तो आपल्या स्त्रियांजवळ-आप्तवर्गाजवळ–अघळपघळ बोलावयाचा; पण राजकाजाचा प्रश्न निघाला कीं हंसून, थट्टा करून त्या प्रश्नाला कलाटणी द्यायचा ! त्याप्रमाणें त्यानें काल गौळवाड्यांत केलें. पण घरीं आल्यावर त्यानें विचार केला कीं, कौरवपांडवांचें युद्ध म्हणजे कांहीं गुप्त गोष्ट थोडीच आहे ! लवकरच पांडव व कौरव आर्यावर्तातील सर्व राजांना मदतीस बोलावणार. तेव्हां या भावी युद्धाबद्दल आपल्या स्त्रियांस थोडी कल्पना द्यावी हें बरें. त्याप्रमाणें तो रात्रीं रुक्मिणीजवळ युद्धाबद्दल थोडेंसें बोलला. दुसरे दिवशीं सकाळीं रुक्मिणी कृष्णास म्हणाली, "आपण कधीं आपल्या राजकीय हालचालींबद्दल आम्हांला दाद लागूं देत नाहीं. काल मात्र, कौरव-पांडवांचं युद्ध लौकरच होणार, म्हणून तें शक्य तर थांबविण्यास आपण जात आहोंत, असं सांगितलंत. परंतु हे भाऊ भाऊ असतां त्यांचीं भांडणं इतकीं तीव्र कां झालीं? आपल्या घरीं असं कुठं होतं ? "

कृष्ण— ह्या तंट्याकडे मीं पुष्कळ वेळां तटस्थतेनं पाहण्याचा प्रयत्न केला आहे. दुर्योधन हा उत्तम राजा आहे, प्रजाजनांना तो छळीत नाहीं असं सर्वत्र बोललं जातं. मग पांडवांशीं तो इतका द्वेषानं कां वागतो, याचं कारण मला असं दिसतं कीं, त्याचा अनेक वेळां भीमानं मानभंग केला आहे. ही मंडळी लहानपणीं एकत्र खेळत असतां आमच्या भीमदेवांनीं त्याला अंधपुत्र, अंधपुत्र म्हणून चिडवावं, शक्तीच्या जोरावर त्याला बुकलावं, आणि वरतीं खो खो हंसावं ! धर्मराज, अर्जुन यांना ही गोष्ट पसंत नसे. पण भीम स्वभावानं दांडगा, तो आपल्या लहरीनं चालायचा. धर्मराजानं फारच निषेध केला

म्हणजे मग तेवढ्यापुरता थांबायचा. पण त्याच्या खोड्या ह्या चालू असायच्याच. दुर्योधनाचा स्वभाव अति मानी आणि मत्सरी! त्याला आपल्यापेक्षां वरचढ कोणी खपायचं नाहीं. त्यांतूनहि भीमाच्या खोड्या थांबल्या असत्या तर हें वैर इतक्या थराला गेलं नसतं. पुढं राजसूययज्ञांत धर्मानं त्याचा मानभंग होऊं नये म्हणून काळजी घेतली. तरींदेखील तो मयसभेंत पाण्याच्या हौदांत ज्या वेळेस चुकून पडला त्या वेळेस भीम हंसलाच, आणि द्रौपदीनेंहि त्याला साथ दिली! या वेळीं पांडवांचं वैभव शिखरास पोंचलं होतं. द्रौपदी त्यांची पट्टराणी म्हणून मिरवत होती, तेव्हां तिला थोडा गर्व होणं साहजिकच होतं. मोठ्या पदावर मनुष्य चढला म्हणजे त्याला दुसऱ्याची कुचेष्टा करण्याची बुद्धि होते, तशी द्रौपदीला झाली. तिचा पाय बेडकावर न पडतां अस्सल नागावर पडला; आणि मग त्या नागानं कडकडून चावा घेतला असल्यास नवल नाहीं. द्रौपदीची चूक झाली; पण ती काडीची होती; या काडीच्या चुकीला दुर्योधनानं कठोर शिक्षा द्यायचं ठरविलं. हा अविचार होता. त्यामुळं आज जवळजवळ सर्व भारत या रणकुंडांत होमून जाणार आहे असं दिसतं. मी हें युद्ध थांबविण्याचा कसोशीनं प्रयत्न करणार आहें, पण मला त्यांत यश येईलसं दिसत नाहीं. कारण हा वैराग्नि फार दिवस धुमसत आहे. जगांत सर्वच गोष्टी आपल्या इच्छेप्रमाणं घडतात असं नाहीं. तेव्हां जें कांहीं दैवानं ठरविलं असेल त्याप्रमाणंच होईल, असं मानून आपण शान्त राहायचं. शान्त रहायचं म्हणजे स्वस्थ बसायचं असं नाहीं; म्हणून मी शिष्टाईचा प्रयत्न करणार आहें.

रुक्मिणी—समजा, युद्ध करायचंच जर ठरलं तर पांडवांच्या स्नेहामुळं आपण युद्धांत भाग घेणार का? आपलं वय आतां युद्ध करण्याचं नाहीं.

कृष्ण—अगदीं खरं. मीं या बाबतींत असं ठरविलं आहे कीं, आपण स्वतः लढायचं नाहीं. अर्जुनाचं सारथ्य तेवढं करायचं! आमचा धर्मराज मोठा भावनाप्रधान आहे. त्याची प्रवृत्ति उदार आहे. परंतु पुष्कळ वेळां अकारण तो प्रतिपक्षाच्या जाळ्यांत आपण होऊन सांपडून घेतो. पांडवांवर आलेल्या अनेक संकटांना भीम व दुर्योधन ह्यांच्या चुका जेवढ्या कारणीभूत

झाल्या आहेत तेवढ्या धर्माच्याहि झाल्या आहेत! तेंव्हां या निर्णायक युद्धांत त्याच्या हातून कांहीं घोडचुका होऊं नयेत म्हणून मी पांडवांजवळ राहणार आहें. अन् त्यांतल्या त्यांत अर्जुनाचं सारथ्य करण्याचं कारण असं कीं, अर्जुनाला निश्चयानं मारूं शकेल अशी एक शक्ति कर्णाजवळ आहे; आणि दुर्योधनाला कर्ण हा नेहमीं पांडवांविरुद्ध भडकवून देत असतो! कारण तोहि अर्जुनाचा सारखा मत्सर करीत असतो. अर्जुन मेला म्हणजे आपण सप्तलोकैकवीर ठरूं असं त्याला वाटतं. म्हणून मी अर्जुनाची पाठि-राखी करणार आहें.

कौरवांकडे कर्णाशिवाय भीष्म, द्रोण व अश्वत्थामा हे विशेष शक्तीचे पुरुष आहेत. पांडव जर युक्तीनं हें युद्ध खेळले नाहींत तर या युद्धांत भीष्म-कर्णांच्या बलावर कौरव हे अजिंक्य ठरतील! म्हणून मी पांडवांना कांहीं सल्लामसलत जर देतां आली तर पाहणार आहें. बरं, आम्ही आतां फार दूर जातों, तेंव्हां एथली जबाबदारी तूं पार पाडशीलच. तुझ्या सवतींचा समाचार तूं घेशील यांत मला संशय नाहीं.

रुक्मिणी—इकडची काळजी आपण करूंच नका. वसुदेवमामंजी आणि भाउजी हे कारभार पाहण्यास समर्थ आहेतच; परंतु तुमच्याकडे अनेक शत्रु वांकडया नजरेनं पाहतात, म्हणून काळजी वाटते!

कृष्ण—तुझं म्हणणं एका अर्थानं बरोबर आहे. परंतु माशाला पाण्याचं भय ठेवून चालेल का? कमलानं जर म्हटलं कीं, मला पाण्यांत राहण्यानं थंडी होईल, तर तें कसं युक्त ठरेल? तसं आमचं क्षत्रियांचं आहे. ज्याला जिवाचं भय वाटतं त्यानं हा क्षात्रधर्म करूंच नये. शिवाय गुरुजींनीं आम्हांला अशी शिकवण दिली आहे कीं, संसारांत सर्व भार ईश्वरावर टाकावा, अन् त्याच्या हातांतलं आपण बाहुलं आहोंत असं समजावं. ही गोष्ट मनांत रुजायला वेळ लागतो; म्हणूनच संसारांत येणाऱ्या प्रत्येक अनुकूल-प्रतिकूल प्रसंगांत मनानं अलिप्त राहण्याची संवय लावून घ्यावी. याचकरितां मनुष्यानं एकान्तांत कांहीं काळ घालवून मनन करावं. जोंपर्यंत आपण देहधारी आहोंत तोंपर्यंत भावनांचे खेळ आपल्या मनांत सारखे चालणारच; पण त्याचा स्पर्श आपल्या विवेकशक्तीला होऊं देतां कामा नये, एवढंच मनुष्याच्या हातीं

आहे. असो. मी माझं कार्य आटपून लवकरच परत येतों; तेव्हां तूं उगाच काळजी करीत बसूं नकोस.

रुक्मिणी – हें सर्व मला समजतं; पण तुमच्यावरचं प्रेमच काळजी करायला लावतं ना! शिवाय मला असं नेहमीं वाटतं — आमची आपली समजूत — कीं, प्रिय माणसांची काळजी करण्यांतहि एक प्रकारचा आनंद आहे! त्यांत त्या माणसाच्या चिंतनाचं सुख अनुभवतां येतं.

कृष्ण— वा! असं चिंतन, अशीच भक्ति करणं भगवंताला फार आवडतं. या भक्तीचा आस्वाद घ्यावा म्हणून त्यानं आजपर्यंत एक नव्हे, सात अवतार घेतले!

रुक्मिणी— आणि आतां आठवा अवतार घेऊन भक्तांचं रंजन आणि परिपालन तो करीत आहे!

कृष्ण— मग तुला तो कोठें आहे हें माहीत असेलच. मला तरी त्याचं दर्शन करवून दे.

रुक्मिणी— तुम्हांला त्याचं दर्शन कधीं घडायचं नाहीं! आपली पाठ आपल्याला कधीं दिसते का!

अशा तऱ्हेचा संवाद झाल्यावर कृष्णानें रुक्मिणीचा व इतर आप्तजनांचा निरोप घेऊन हस्तिनापुरास प्रयाण केलें.

# १३

## सर्वसंहारक युद्ध

पांडवांच्या बोलावण्यावरून सुभद्रा व अभिमन्यु यांना घेऊन श्रीकृष्ण विराटनगरीस गेला. तेथें अभिमन्यु व उत्तरा यांचा विवाह मोठ्या थाटानें झाला. पांडवांशीं शरीरसंबंध जुळून आला म्हणून विराटराजाला मोठा आनंद झाला. उत्तरेच्याच आग्रहावरून अर्जुनानें विराटपुत्राचें सारथ्य पतकरलें होतें, व कौरवांचा विराटनगरीवरचा हल्ला परतवून लावला होता. उत्तरेसारखी चपल व लाघवी राजकन्या आपली सून झाली म्हणून अर्जुनाला समाधान वाटलें. कौरवांशीं युद्ध करावें लागणार हें पांडवांना दिसतच होतें. अशा समयीं मत्स्यदेशच्या अधिपतीशीं सोयरीक — हा पांडवांनीं भावी यशाचा शुभशकुनच मानला.

इकडे लग्नाच्या सोहळ्यांत पांडवस्त्रिया गर्क झाल्या होत्या; तर पांडवांच्या इष्टमित्रांत भावी युद्धाचीच चर्चा लग्नमंडपांत चाललेली दिसे! कोणी म्हणत, दुर्योधनानें ऐकलें नाहीं तर शेवटीं धृतराष्ट्र आपल्या विशेष अधिकाराचा उपयोग करून पांडवांचा हिस्सा त्यांना द्यावयास आपल्या पुत्रास भाग पाडील. दुसरे म्हणत होते, द्रौपदीवस्त्रहरणाचे वेळीं दुर्योधनानें माघार खाल्ली तरी या वेळीं तो ती खाणार नाहीं. पांडवांना तो युद्धांत ओढून या प्रदीर्घ वैराचा सोक्षमोक्ष लावणार! यानंतर कोणते राजे आपल्याकडे येणार, कोणते कौरवांकडे जातील याबद्दल जो तो आपला अंदाज सांगत होता. अशा तऱ्हेची युद्धचर्चा जरी लग्नमंडपांत चाले, तरी एकंदरींत पहातां हा समारंभ मोठ्या आनंदानें पार पडला. कृष्णस्त्रिया कां आल्या नाहींत म्हणून पांडवांकडील मंडळींनीं चवकशी केली. कृष्णानें नेहमींप्रमाणें तो प्रश्न हंशावारी घालविला.

श्रीकृष्ण द्वारकेंतून विराटनगरींत पोहोंचल्यावर आपला क्षेमसमाचार त्यानें इतरांकरवीं द्वारकेस कळविला होता. अभिमन्यूच्या लग्नाची हकीकत कृष्णस्त्रियांस कळली होती; पण त्यानंतर कित्येक महिने उत्तरेकडून

कोणी दूत आला नाहीं, यामुळें वसुदेव–देवकी वगैरेंना विशेष काळजी वाटूं लागली. शेवटीं वसुदेव, देवकी, व रुक्मिणी यांनीं विचार करून आपले दूत हस्तिनापूरजवळ असलेल्या उपलव्य गांवाकडे रवाना केले. कारण अज्ञातवासांतून बाहेर आल्यावर पांडवांनीं उपलव्य गांवीं आपला तळ दिला होता.

वसुदेवाचे दूत द्वारका सोडून फार लांब गेले नाहींत तोंच त्यांना कृष्णाचा निरोप घेऊन येणारे कांहीं दूत भेटले. या दूतांनीं वसुदेवाला कृष्णदेव कधीं येत आहेत हें कळविलें. कृष्णदेव येणार ही बातमी द्वारकेंत पसरतांच प्रजाजनांनीं त्यांचें मोठें स्वागत करण्याचें ठरवून गुढ्या–तोरणें उभारण्यास पौरजन लागले होते; पण ज्या दिवशीं श्रीकृष्णाचें आगमन होणार होतें त्याचे आदले दिवशीं मध्यरात्रीं तो वेष पालटून आपल्या मंदिराचे द्वाराजवळ येऊन उभा राहिला. प्रथम द्वारपालानें त्याला ओळखलें नाहीं. तेव्हां थोडी गंमत झाली. आपला पति अचानक आलेला पाहून रुक्मिणीची कोण धांदल उडाली! तिनें सत्यभामादि इतर सवतींना बोलावणें पाठविलें. जो तो 'असे अपरात्रीं कां आलां? आम्ही आपलं थाटानं स्वागत करणार होतों ना!' वगैरे प्रश्न विचारी. 'युद्धाचं काय झालं?' म्हणून रुक्मिणीनें प्रश्न केला. तेव्हां कृष्ण कांहीं वेळ गप्प बसला. नंतर त्यानें आपले डोळे पुसले, व सद्‌गदित होऊन म्हटलें, 'पांडवांचा जय झाला; पण आपला अभिमन्युबाळ रणांत पडला!' ही वार्ता कानीं पडतांच अभिमन्यूचे गुण आठवून कृष्णस्त्रियांनीं रडून आकान्त केला. दुसरे दिवशीं कृष्ण वसुदेव–देवकींकडे गेला. तेव्हां आपला गुणी नातू रणांत पडल्याचें ऐकून त्या वृद्ध दंपतीनें खूप शोक केला. जो तो कृष्णाला युद्धाबद्दल प्रश्न करी. तेव्हां त्यानें सर्वांना सांगितलें कीं, 'वसुदेव–देवकीच्या मंदिरांत मी सर्व वार्ता सांगेन.' त्याप्रमाणें कृष्णाचे सर्व आप्त वसुदेवाच्या मंदिरांत जमा झाले. दोनप्रहरीं आपल्या स्त्री–पुत्रांसह श्रीकृष्ण आपल्या मातापितरांकडे गेला. तेथील दिवाणखान्यांत उच्चासनावर वसुदेव–देवकींना बसवून कृष्णानें नेहमींप्रमाणें त्यांना वंदन केलें. आज त्याचा चेहरा दुःखीकष्टी दिसत असल्यामुळें कोणी त्याच्याजवळ सलगीनें बोलण्यास धजलें नाहीं. पैंद्यानेंहि एक शब्द आज उच्चारला नाहीं. सर्व मंडळी आसनस्थ झाल्यावर श्रीकृष्णानें

थोडेंसें जल प्राशन केलें; नंतर डोळ्यांस पाणी लावून त्यानें हलक्या आवाजांत बोलण्यास आरंभ केला--

"थोडक्यांत सांगायचं तर पांडवांना कुरुक्षेत्रावर विजय मिळून हस्तिनापूरच्या सिंहासनावर धर्मराजा आतां बसला आहे. दुर्योधनादि कौरव रणांत ठार झाल्यानं पांडवांना आतां निष्कंटक राज्य उपभोगतां येईल. पांडवांना जय मिळाला खरा; पण तो मिळवितांना अठरा अक्षौहिणी सैन्य गारद झालं. परशुरामदेवांनीं जेवढे क्षत्रिय मारले त्यापेक्षां ही संख्या अधिक होती. या मरण पावलेल्या वीरांत पांडवांचे सगे-सोयरे होते. या भारतीय युद्धांत एवढा जो क्षत्रियवीरांचा संहार झाला त्याचा परिणाम या आर्यावर्तावर मोठा वाईट होणार आहे!"

नंद— कृष्णा, तूं तेथें हजर असतांना हें युद्ध कसं झालं? तुला तें थांबवतां आलं नाहीं का?

कृष्ण— तात, माझ्या प्रयत्नांची मीं शिकस्त केली; पण अहंकारी दुर्योधन कोणाचंच ऐकेना.

देवकी— कृष्णा, तूं येथून गेल्यापासून जें जें घडलं तें सर्व सांगून टाक.

कृष्ण— मी मन घट्ट करून सांगतों पाहिजे तर, पण माते, तो भयंकर वृत्तान्त तुझ्याच्यानं ऐकवेल का?

देवकी— कृष्णा, भयंकर वृत्तान्तच काय, पण प्रत्यक्ष माझे सहा पुत्र शिळेवर आपटून ठार मारतांना पाहून माझं मन पाषाणासारखं घट्ट झालं आहे!

कृष्ण— बरं तर. मी सर्व वृत्तान्त थोडक्यांत निवेदन करतों.

"मी येथून विराटनगरीस गेलों. तेथें उत्तरा-अभिमन्यूचा विवाह झाला. मग मी पांडवांसह हस्तिनापुराजवळ असलेल्या उपलव्य गांवीं गेलों. तेथें पुढं काय करायचं यावर चर्चा झाली. कौरवांकडून आपलं राज्य परत मिळत नाहीं असं कळल्यावर युद्ध क्रमप्राप्तच झालं. धर्म म्हणाला, 'युद्धापूर्वी शेवटचा प्रयत्न म्हणून आपण आपली कमींत कमी मागणी दुर्योधनाला कळवूं. "पांच पांडवांना पांच गांवं दिलींस तरी आम्ही संतुष्ट होऊं" असं


म्हणावं. पाहूं या तो एवढं तरी कबूल करतो का?' धर्मराजाची पांच गांवांची मागणी इतर मंडळींस प्रथम पसंत नव्हती; पण वडील बंधूंपुढं बोलायचं नाहीं, असं इतर पांडवांनीं ठरवून शिष्टाईकरितां माझी एकमतानं निवड केली.

"शिष्टाईकरितां प्रत्यक्ष व्याही येत आहेत हें कळतांच दुर्योधनानं माझ्या स्वागताची उत्तम तयारी केली, व मला भोजनाचं निमंत्रण दिलं. मीं म्हटलं, 'शिष्टाईचं काम माझ्या मनासारखं झाल्यावर मी आनंदानं जेवावयास येईन.' मी आपला विदुराच्या घरींच उतरलों. ठरलेल्या दिवशीं कौरवसभेत गेलों. प्रथम कुशल प्रश्न व हास्यविनोद झाला. नंतर मीं धृतराष्ट्रास म्हटलं, 'पांडवांना त्यांचं राज्य परत देऊन तूं समेट कर. पांडव तुझे मित्र झाले तर कौरवांचं बळ वाढेल' वगैरे वगैरे. पण धृतराष्ट्रानं माझं म्हणणं मनावर घेतलं नाहीं. दुर्योधनाचा उन्मत्तपणा या वेळीं पराकोटीला गेला होता. त्याला वाटत होतं कीं, इच्छामरणी भीष्म, अजिंक्य द्रोणाचार्य, वासवी शक्तीनं अर्जुनास भारी असलेला कर्ण, नारायणी-अस्त्राच्या प्राप्तीनं बलाढ्य बनलेला अश्वत्थामा, इतके आपल्या साहाय्यास असल्यावर आपला विजय निश्चित आहे! मग पांडवांची आपण पर्वा कां करावी? दुर्योधन जर एकटा मला भेटता, तर मला वाटतं, मीं त्याची समजूत काढली असती; पण शकुनी व कर्ण हे त्याला सारखे भडकवीत होते! यामुळं तो कांहीं केल्या पांडवांची पांच गांवांचीहि मागणी मान्य करीना! तो आवेशानं मला म्हणाला, 'युद्धावांचून सुईच्या अग्रावर राहील एवढी कणभरहि जमीन मी पांडवांस देण्यास तयार नाहीं!' समजुतीच्या बोलानं दुर्योधन ऐकत नाहीं असं पहातांच मी 'दुर्योधनास बंधनांत टाक' असा सल्ला धृतराष्ट्रास दिला. तेव्हां दुर्योधन चिडून त्यानं मलाच बंधनांत टाकायचा घाट घातला. पण मी सावध होतों, यामुळं तसं कांहीं घडून आलं नाहीं. शिष्टाई व्यर्थ गेल्यावर पांडवांनीं युद्धाची तयारी केली. दुर्योधनाची सिद्धता तर झालेली होतीच."

नंद— कृष्णा, या युद्धांत तूं कोणता भाग उचललास? तुझं वय युद्ध करण्याचं थोडंच आहे?

कृष्ण— हें ओळखून मीं अर्जुनाचं सारथ्य करायचं ठरवलं, व प्रसंग-

कृष्णशिष्टाई



गीतोपदेश

विशेषीं तुम्हांला सल्ला देईन असं धर्मराजास सांगितलं. खरं पाहिलं तर या वेळीं दुर्योधनाचं बळ पांडवांपेक्षां अधिक होतं. या वेळीं युक्ति–प्रयुक्तीनं युद्ध खेळल्याशिवाय पांडवांना जयाची आशा नव्हती.

देवकी— कृष्णा, तूं या युद्धांत पांडवांना जय कसा मिळवून दिलास तेवढं सांग म्हणजे झालं.

कृष्ण— पांडवांना जय जो मिळाला तो भीमार्जुनाच्या अतुल पराक्रमानं मिळाला. एकट्या भीमानं धृतराष्ट्राचे शंभर पुत्र मारले! दुःशासनाच्या नरडीचा घोट घेऊन त्यानंच द्रौपदीचं सान्त्वन केलं. माझ्या अर्जुनाचाहि पराक्रम या वेळीं कसास लागला. काय त्याचं हस्तलाघव! त्याचेच बाणांनीं भीष्म, कर्ण जर्जर होऊन रणांत पडले! जयद्रथाचा वध अर्जुनाचे बाणांनींच झाला. मीं चार का पांचच वेळां पांडवांस सल्ला दिला.

देवकी— नंदराजा सांगत असे कीं, कृष्ण लहानपणापासून मोठा युक्तिवान्; यामुळं तो मोठमोठ्या लोकांना हरवीत असे. बरं, या युद्धांत तूं काय काय युक्त्या केल्यास?

कृष्ण— मीं स्वतः कांहीं केलं नाहीं. मीं फक्त कोणत्या वेळीं काय करावं एवढंच सुचवलं. मीं जेव्हां पाहिलं कीं, भीष्म अर्जुनास कांहीं आटोपत नाहींत, तेव्हां अर्जुनास सांगितलं कीं, ‘तूं मागं सर, व महारथी शिखंडीला पुढं कर. शिखंडी हा गतजन्मींचा स्त्री आहे; तेव्हां भीष्म त्याशीं युद्ध करणार नाहींत. मग तूं आपले बाण भीष्मावर टाक!’ अर्जुनानं शिखंडीला पुढं करतांच भीष्मांनीं धनुष्य खालीं ठेवलं, आणि मग अर्जुनाच्या बाणांनीं ते जर्जर झाले.

भीष्मांपेक्षांहि द्रोणांनीं तीव्रतेनं व युद्धनीतीला सोडून युद्ध केलं. ते कोणासच आटोपेनात. व्यूहरचना आणि कवच-बंधन यांत तर ते अद्वितीय होते. त्यांना भ्रम उत्पन्न केल्याशिवाय ते अवध्य ठरत होते. इतक्यांत त्यांना भ्रम उत्पन्न होईल अशी संधि आम्हांला मिळाली. आमच्याकडे अश्वत्थामा नांवाचा एक मोठा हत्ती होता. त्याला भीमानं ठार केलं, व ‘अश्वत्थामा मेला’, ‘अश्वत्थामा मेला’ अशी आवई उठवली. ती द्रोणाचार्यांच्या कानावर गेली. त्यांच्या मुलाचं नांव ‘अश्वत्थामा’च होतं. यामुळं ते

दुःखी झाले; पण गज का आपला पुत्र, याबद्दल निश्चयानं कोणी त्यांस सांगेना. म्हणून सत्यवचनी धर्माकडे त्यांनीं विचारणा केली. तेव्हां माझ्या सांगण्यावरून धर्मानं गुळमुळीतच उत्तर दिलं. तेव्हां द्रोणांनीं धनुष्य खालीं ठेवलं, व ते विचारमग्न झाले. इतक्यांत आमच्याकडचा द्रौपदीचा बंधु धृष्टद्युम्न हा पुढं गेला. त्यानं द्रोणांचे केस धरले आणि त्यांना ठार केलं!

यानंतर कर्ण कौरवांचा सेनापति झाला. कर्णावर दुर्योधनाची सारी भिस्त होती. भीष्म, द्रोण हे अन्नाला जागण्यापुरतेच दुर्योधनाकडे राहिले होते, त्यांना त्याचं वागणं मनांतून पसंत नव्हतं. पांडवांचाच सत्पक्ष असंच त्यांना अखेरपर्यंत वाटत होतं. यामुळं त्यांच्यावर दुर्योधनाचा विश्वास नव्हता. कर्णाला इंद्राकडून एक विशेष शक्तीचं अस्त्र मिळालं होतं. कर्णाचा बेत असा होता कीं, तें अस्त्र अर्जुनावर सोडून त्याचा वध करावा. तें अस्त्र अमोघ होतं, म्हणून मीं पहिल्यापासून कर्णाचा व अर्जुनाचा सामना होऊंच दिला नाहीं. ती शक्ति दुसऱ्या एखाद्या वीरावर कर्णाला सोडायला कशी लावावी या विचारांत मी होतों. भीमाला एका राक्षसीपासून घटोत्कच नांवाचा शक्तिशाली मुलगा झाला होता. त्याला मीं घेतला बोलावून, आणि त्याला आपल्या गुप्त व उघड सामर्थ्यानिशीं कौरवांशीं लढण्यास सांगितलं. त्यानं कौरवसैन्याचा भयंकर संहार चालविला. तेव्हां दुर्योधन कर्णास म्हणाला, 'आतांच तुझी वासवी शक्ति सोड, नाहीं तर आपण कोणीहि जिवंत राहात नाहीं.' कर्णानं ती शक्ति सोडली. तिनं घटोत्कच मेला, पण अर्जुन वांचला! आतां कर्णाजवळ विशेष शक्ति राहिली नव्हती, तरी त्यानं अर्जुनाला चांगलंच दमविलं. शेवटीं लढतां लढतां कर्णाच्या रथाचं चाक जमिनीच्या भेगेंत अडकलं. तें वर काढण्याकरितां तो रथाखालीं उतरला. मीं अर्जुनाला म्हटलं, 'गड्या, विचार करण्यांत वेळ घालवूं नकोस. कर्णावर बाण सोड.' अर्जुनानं बाणावर बाण सोडून कर्णाचं शिर तोडलं.

अश्वत्थाम्याचं नारायणीअस्त्र मीं असंच निकामी केलं. जयद्रथाचा वध-देखील युक्तीनंच करावा लागला. शेवटीं भीम व दुर्योधन यांचं गदायुद्ध झालं. दुर्योधनानं बारा वर्षं मेहनत करून गदायुद्धांत प्रावीण्य मिळविलं

होतं. तेव्हां भीमाचा या युद्धांत निभाव लागला नसता; म्हणून मीं भीमाला दुर्योधनाच्या मांडीवर गदा हाणण्याची खूण केली. भीमानं तसं करून दुर्योधनाची मांडी मोडून त्याला जमिनीवर लोळवलं. दुर्योधनाच्या मृत्यूनं पांडवांचा पूर्ण विजय झाला, व मग आम्ही सर्व जयामुळं उत्पन्न झालेल्या उन्मादांत कौरवांच्या शिबिरांत शिरलों व बेसावधपणं तेथें निजलों. माझ्या सबंध आयुष्यांत मी गैरसावधपणं जो वागलों तो या वेळींच; व त्याचं भयंकर प्रायश्चित्त पांडवांना भोगावं लागलं!

देवकी— काय रे बाबा, पांडवांपैकीं कोणाच्या जीवाला अपाय तर झाला नाहीं ना? एकंदरींत पांडव दुर्दैवी खरेच!

कृष्ण— दैवी संपत्तीचे असूनहि ते दुर्दैवी ठरत होते हें खरंच! त्या रात्रीं आम्ही बेसावध आहोंत असं पाहून द्रोणपुत्र अश्वत्थामा–जो रणांतून पळाला होता–त्यानं अपरात्रीं शिबिरांत गुप्तपणं प्रवेश केला व निर्धास्तपणं झोंपलेल्या वीरांना ठार मारलं! त्यांत द्रौपदीचे पांच पुत्र, धृष्टद्युम्न आणि इतर स्त्री-पुरुष हे होते! पहांटे ही बातमी पांडवांना कळली, तेव्हां त्यांनीं व द्रौपदीनं जो शोक केला त्याचं वर्णन कसं करावं! यानंतर आम्हीं अश्वत्थाम्याला चांगलंच प्रायश्चित्त दिलं. गुरु-पुत्र म्हणून त्याचा प्राण तेवढा घेतला नाहीं!

या युद्धांत मिळालेल्या जयानं द्रौपदीला मीं दिलेलं वचन पूर्ण झालं, कौरवांना चांगली शिक्षा झाली, व पांडवांना हक्काचं राज्य प्राप्त झालं. हें सर्व खरें, पण अनेक क्षत्रिय वंशच्या वंश यांत निर्वंश होऊन गेले. खुद्द पांडवांचे सहा महारथी पुत्र नाश पावल्यामुळें पुढें वंश कसा चालणार हा प्रश्न येऊन पडला होता. धर्म हा वृत्तीनें उदार आणि मनाचा कोमल आहे. राज्य मिळेपर्यंत त्याचा उत्साह कायम होता. पण तें हातीं येतांच त्याला रणांत पडलेल्या गुरुजनांची स्मृति झाली. कर्ण हा आपलाच भाऊ होता हें कळल्यावर त्याचा उद्वेग पराकोटीला गेला. तो आपल्या बंधूंस म्हणाला, ‘मला हें राज्य नको! माझे सर्व आप्त-वर्ग रणांत पडले असतां मला वैभव व उपभोग गोड कसे लागणार?’

शेवटीं व्यासांनीं त्याची समजूत केली. मीं त्यास दुजोरा देऊन म्हटलें,

"आज हस्तिनापूरच्या राज्यांतील प्रजा उघडी पडली आहे. तिचें परिपालन तूं न करशील तर स्वधर्मत्यागाचें पातक तुला लागेल. तुला धर्माधर्माचा निर्णयच हवा असेल तर भीष्मपितामह शरपंजरीं पडले आहेत, उत्तरायण लागेपर्यंत ते प्राणधारणा करणार आहेत, त्यांचेकडे जाऊन आपलें समाधान करून घे." मग आम्ही भीष्मांकडे गेलों. त्यांनींहि प्रजापालन करणें हेंच तुझें कर्तव्य आहे असें सांगितलें, तेव्हां धर्मानें राज्याचीं सूत्रें हातीं घेतलीं.

धर्मराज आतां अश्वमेधयज्ञ करणार आहे; त्या वेळीं मला तिकडे पुन्हां जावं लागेल. मला वाटतं, मीं आतां आत्मकथन येथेंच थांबवावं हें बरं. या कथनास मीं आरंभ केला त्या वेळीं मी किती उत्साहांत होतों! गोड स्मृति डोळ्यांपुढं नाचत होत्या, त्यामुळं मी त्यांत रंगून गेलों होतों; पण भारतीय युद्धांतून परत आल्यावर मात्र माझं मन बरंच अस्वस्थ झालं आहे.

"बाळा, तूं आतां स्वस्थ रहा. दुःख सहन करण्याची आपणां सर्वांना संवयच झाली आहे. रुक्मिणी, सत्यभामा, तुम्ही कृष्णाचे प्रवासाचे व युद्धाचे परिश्रम जेणेंकरून हलके होतील, व त्याचे मनावरचा ताण कमी होईल असं कांहीं तरी करा." असें वसुदेव-देवकींनीं कृष्णाचे पाठीवरून हात फिरवितांना म्हटलें. वडील-मातोश्रींनीं पाठीवरून हात फिरविल्याबरोबर कृष्णाचे मनावरचा ताण बराच कमी झाला. नंतर मातापितरांस अभिवादन करून तो स्त्रियांसह आपल्या मंदिराकडे जाण्यास निघाला.

## १४

## रुक्मिणीची योगारूढ अवस्था

पुढें एक दिवस श्रीकृष्ण आपल्या खास मंदिरांत बसून मुरली वाजवीत असतां तल्लीन झाला होता. बराच वेळ गेल्यावर कृष्णानें मुरली थांबवली. मागें वळून पहातो तों रुक्मिणी निश्चल उभी! मुरली थांबली तरी तिची तल्लीनता कायमच होती. शेवटीं कृष्णानें तिला हालवून जागें केलें. भानावर आल्यावर ती म्हणाली, 'मला कशाला जागं केलं? मी बरी होतें तंद्रींत!"

कृष्ण तिजकडे निरखून पाहून मंदस्मित करून म्हणाला, "मला वाटतं, एक प्रसंग सोडून तूं इतकी तल्लीन झालेली मीं कधींच पाहिली नाहीं. आज काय असं घडलं, कीं ज्यानं तुझी तल्लीनता इतकी पराकोटीला गेली?"

रुक्मिणी—देवा, पूर्वीं कोणत्या प्रसंगीं मी इतकी तल्लीन झालें होतें? सांगा तर खरं.

कृष्ण—तुला नाहीं का आठवत? मला पहिलें पत्र लिहितांना. त्या वेळीं मी तुजवळ नव्हतों खरा; पण पत्रावरून मी तुझ्या त्या वेळच्या वृत्तीची कल्पना करूं शकलों.

रुक्मिणीनें कृष्णाच्या खांद्यावर हात टाकला, व आनंदित होऊन ती म्हणाली, "देवा, अगदीं खरं तें तुम्ही बोललां. त्यानंतर फार फार दिवसांनीं मीं त्या स्थितीचा आज अनुभव घेतला, आणि याला कारण काय, माहीत आहे?

कृष्ण—तूं सांगितल्याशिवाय मला कसं कळणार?

रुक्मिणी—माझी समाधि लागण्याचं कारण—आपल्या मुरलीचे आजचे आलाप. कांहीं महिन्यांपूर्वीं मीं जेव्हां आपल्या मुरलीचे आलाप प्रथम ऐकले त्या वेळीं माझ्या शरीरावर सुखसंवेदनेचे रोमांच उभे राहिले होते; पण आज—देवा, कांहीं निराळाच अनुभव आला! मला वाटलं, मी सारखी मोठी

होत चाललें आहे; माझं मस्तक आकाशाला लागलं आहे. नंतर मी अनंत आकाशांत हिम जसं पाण्यांत विरतं तशी विरत चाललें आहें, व या विरण्याबरोबर आजपर्यंत घेतला नाहीं असा अनुभव घेत आहें. मी त्यांत पूर्णपणं विलीन होण्याच्या पूर्वी आपण मला हालवून जागं केलं.

कृष्ण—रुक्मिणी, तूं खरोखर भाग्याची स्त्री आहेस. तुला उत्तम वसनं, रत्नांचीं आभरणं, दासदासी, मृदु शय्या यांचा लाभ होत आहे म्हणून मी तुला विशेष भाग्यवान् समजत नाहीं; तर आज मुरली ऐकून तूं तल्लीन होऊन अनंताशीं एकरूप होण्याचे मार्गास लागलीस, यापरतं दुसरं कोणतं भाग्य हवं ?

रुक्मिणी—देवा, आपल्या मुरलीच्या आलापांत आज असं विशेष काय होतं, कीं ज्यानं माझी अशी स्थिति झाली ?

कृष्ण—रुक्मिणी, तूं माझी आवडती पत्नी आहेस म्हणून माझं गुह्य तुला सांगतों. असंच गुह्य मीं रणमैदानावर अर्जुनाला सांगितलं होतं. कारण तो माझा अत्यंत आवडता असा मित्र आहे.

'रुक्मिणी, मीं तुला पुष्कळ वेळां सांगितलं आहे कीं, गुरुगृहांतला माझा काळ प्रदीर्घ नव्हता; तरी पण त्यांतला प्रत्येक क्षण कारणीं लागला होता. इतर विद्या मी तेथें शिकलोंच, पण मला गुरुजींजवळ जीवनाचं जें दर्शन झालं तो लाभ अपूर्व होता. आपल्या धेनु प्रथम तृण भराभर खाऊन घेतात आणि नंतर यथावकाश रवंथ करून तें गिळतात; या रवंथ केलेल्या तृणाचं रक्त, मांस, अस्थि बनून तिचा देह पुष्ट होतो. त्याप्रमाणं गुरुगृहीं शिकलेल्या उपनिषदांचं वाचन-मनन मी जन्मभर करीत गेलों. त्यामुळं मला वाटेल तेव्हां अनंत शक्तींशीं मनानं एकरूप होतां येत होतं, ही गोष्ट भीष्मांना चांगली माहिती होती. म्हणून त्यांनीं राजसूययज्ञांत धर्माला माझी अग्रपूजा करायला सांगितली. मीं ती पूजा स्वीकारली ती मान मिळतो या भावनेनं नव्हे, तर सर्वांचं कल्याण व्हावं ही भावना त्या राजसूययज्ञाच्या उदात्त प्रसंगीं माझे मनाला व्यापून गेली होती. म्हणून मीं त्या पूजेचा स्वीकार केला; पण हें त्या वेड्या शिशुपालाला कळूं शकलं नाहीं. असो.

रुक्मिणी—देवा, हें सर्व ठीक; पण आजच्या मुरलीच्या आलापांत विशेष काय होतं तें तुम्हीं सांगितलं नाहीं.

कृष्ण—तिकडेच मी आतां वळतों आहें. रुक्मिणी, भारतीय युद्धाचं भव्य व भीषण दर्शन मला काल रात्रीं झालं. त्या युद्धांत भयंकर संहार झाला. आपला अभिमन्यु व द्रौपदीचे पांच कर्ते पुत्र मरण पावले. यामुळं मी दुःखी-कष्टी झालों होतों; पण आज पहांटेस मला उपनिषदं आठवूं लागलीं. गुरुजींचा तो गंभीर स्वर माझे कानांत घुमूं लागला, आणि मग अनंत शक्तींच्या व्यापक उद्देशाशीं मी पहातां पहातां एकरूप झालों. माझं दुःख दूर दूर पळालं. अनंत विश्वाच्या संगीताशीं एकरूप व्हावं, म्हणून मीं ती मुरली हातांत घेतली व तोंडाला लावली, तोंच ओंकाराचा पवित्र ध्वनि त्या मुरलींतून प्रथम निघाला व विश्व-संगीतांत माझ्या मुरलीचे आलाप मिसळून गेले. असल्या अत्यंत पवित्र विश्व-संगीताच्या आलापांत तूं सांपडल्यावर तुझी समाधि न लागेल तर काय होईल ?

रुक्मिणी—देवा, आपण काय बोलतां तें मला समजत नाहीं, पण अलौकिक आनंदाचा अनुभव मात्र मी घेत होतें खरी. मी आतां आपणांला विचारतें कीं, रणांगणावर अर्जुनाशीं बोलतांना आपली अशी समाधि लागली होती म्हणतां तो प्रसंग सांगा ना एकदां !

कृष्ण—तुला एवढी उत्सुकता असेल तर सांगतों. त्याचं असं झालं, कौरव-पांडवांच्या सैन्यांची तयारी होऊन सैनिकांच्या रांगा शिस्तीनं रण-मैदानावर समोरासमोर येऊन उभ्या राहिल्या. मीं एका भव्य रथांत अर्जुनाला बसवून तेथें आलों. भीष्मांनीं प्रथम आपला दिव्य शंख जोरानं फुंकला. त्याबरोबर आम्हींहि आपापले शंख फुंकले. त्यानंतर दोन्हीकडच्या रणवाद्यांनीं आकाश दुमदुमून टाकलं. अर्जुनाला उत्साह उत्पन्न होऊन तो मला म्हणाला, ' केशवा, माझा रथ दोन्ही सैन्यांचे मध्यभागीं उभा कर, व मला कोणाशीं झुंजायचं तें सांग. '

मीं कौरवांच्याकडच्या एक एक वीराचं नांव घेतलं व शेवटीं म्हटलं, ' अर्जुना ! हें पहा, तुझे गुरु, सगे-सोयरे तुझ्याशीं लढायला उभे आहेत. ' ' गुरु व सगे-सोयरे ' हे शब्द उच्चारतांच अर्जुनाच्या विचारांना निराळीच

चालना मिळाली व तो मला म्हणाला, 'कृष्णा, भीष्म-द्रोण यांचेवर बाण टाकून मीं त्यांना ठार केलं तर गुरुहत्येचं पातक मला लागणार नाहीं काय? माझे स्वजन युद्धकामना ठेवून माझ्याशीं लढायला सिद्ध झाले असले तरी मीं त्यांना मारून पातकाची जोड कां करावी? शिवाय, हें पहा, दोन्हीकडचं सागरासारखं चारी दिशा व्यापून राहिलेलं हें सैन्य. यांत आर्यावर्तांतील सर्व क्षात्र-तेज एकत्र झालं आहे. दोन्ही पक्ष समबल असल्यामुळं या युद्धांत भयंकर प्राणहानि होऊन कोणीहि तरुण क्षत्रिय जिवंत उरणार नाहीं; आणि मग समाजाला नियंत्रण न राहून जिकडे तिकडे स्वच्छंदीपणा माजून भावी पिढी अधोगतीला जाईल, असं मला स्पष्ट दिसतं आहे. या सर्व पातकांची जबाबदारी कौरवांबरोबर आमचेवरसुद्धां येईल. हें सर्व टाळण्याला मला एकच उपाय दिसतो, तो म्हणजे युद्ध करण्याचं सोडून द्यावं, व कौरवांना सुखानं राज्य करूं द्यावं!' असं बोलून अर्जुनानं हातांतील धनुष्य एकीकडे ठेवून 'मी आतां युद्ध सोडून देतोंच' असं निश्चयानं मला म्हटलं.

"अर्जुनाचं हें भाषण ऐकून मी थक्कच झालों! युद्धाची सर्व तयारी झाल्यावर युद्ध न करण्याची बुद्धि अर्जुनाला उत्पन्न झालेली पाहून मीं मनांत म्हटले, 'दुर्दैवा! तूं कहर केलास! या पांडवांच्या नशिबीं सदा हालअपेष्टाच काय लिहिलेल्या आहेत?' माझा राग या वेळीं अनावर झाला होता, पण मीं लगेच तो आवरला, व हंसत अर्जुनाकडे पाहून त्याला म्हटलं,

रुक्मिणी—पण देवा, अशा सुज्ञ माणसाची समजूत करणं मोठं कठीण, नाहीं का?

कृष्ण—देवी, तुम्हां बायकांच्या समजुती करतां करतां माझं आयुष्य गेलं, यामुळं मला त्यांत कुशलता प्राप्त झाली आहे. मीं मनांत म्हटलं, 'या वेळीं रागावून काय उपयोग? जरा कलाला कल दिला पाहिजे.' मीं म्हटलं, 'अर्जुना, तुझं म्हणणं बरोबर आहे. पण हा विचार तुला युद्धारंभीं सुचायला पाहिजे होता. आतां तूं जर रण सोडून पळालास तर तुझा प्रतिस्पर्धी कर्ण म्हणेल, 'अर्जुन मला भ्यायला!' माझे हे शब्द ऐकतांच अर्जुन भानावर आला.

"बरं झालं! भडकलेल्या घोड्यांना ताळ्यावर आणण्याची कला तुम्हांला अवगत आहेच. बरं, पुढं काय झालं?" रुक्मिणीनं नेत्र विस्फारून विचारलें.

कृष्ण— मग मीं अर्जुनास म्हटलं, “ वीरा, तूं असा विचार कर कीं, समजा, तूं रणमैदान सोडून निघून गेलास, म्हणून ते दीर्घद्वेषी दुर्योधन, कर्ण, शकुनि तुझा पिच्छा सोडतील काय? पळणाऱ्याच्या पाठीमागं जशीं क्रूर श्वापदं लागून त्याला फाडून खातात, तशी अवस्था हे दुष्ट तुझी करतील! तूं माझं उदाहरण लक्षांत आण. मथुरेंतील नागरिकांवर संकट येऊं नये म्हणून मी ती सुंदर नगरी व कंसाचं राज्य सोडून दक्षिणेकडे दूर दूर गेलों, तरी जरासंधानं माझा पिच्छा पुरवला! मला जाळून टाकण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. तुम्हां पांडवांना फाडून खाल्ल्याशिवाय हे दुष्ट थांबणार नाहींत हें निश्चित समज.”

“ मीं अर्जुनाला पुढच्या प्रसंगाची कल्पना देतांच अर्जुन भानावर आला, व मला म्हणाला, ‘ तूं म्हणतोस तें खरं आहे; हे कौरव इतके नीच खास आहेत. बरं, पण कृष्णा, मीं युद्ध केलं आणि त्यांत माझे हातून गुरु ठार झाले, तर मला गुरुहत्या नाहीं का लागणार ? ’

“ अर्जुन समजुतीवर आला असं पाहून माझा उत्साह दुणावला, व मीं त्याला म्हटलं, ‘ अर्जुना, वेद-उपनिषदांचा तुझा अभ्यास याच वेळीं कसा रे फुकट गेला? असो. मनुष्यानं कोणतंहि कृत्य केलं तरी तें बरं किंवा वाईट यांपैकीं एक असतं. कर्म बरं असलं तर पुण्य लागतं, वाईट असलं तर पातक लागतं, खरं ना? पुष्कळ वेळां एखादं कर्म बरं किंवा वाईट याचा निर्णय होत नाहीं; अशा वेळीं मनुष्यानं कसं वागावं हा प्रश्न पडतो. ’ मीं असं म्हणतांच अर्जुन म्हणाला, ‘ देवा, मला असाच प्रश्न पडला आहे. ’ मी पुढं म्हणालों, ‘असं पहा, पाप किंवा पुण्य कोणाला लागतं, माहीत आहे ? मीं अमुक केलं, तमुक केलं असा अहंकार ठेवून जो वागतो त्याला पातक किंवा पुण्य लागतं. मनुष्यानं अहंकार सोडून कर्तव्य म्हणून एखादं कर्म केलं, व त्याचं फळ परमेश्वराला अर्पण केलं, तर मनुष्याला कर्माचं फल मिळणार नाहीं. म्हणून अर्जुना, स्वधर्म म्हणून तूं युद्ध कर, व तें निरभिमानानं कर; भगवंताला तुझा जय किंवा अपजय अर्पण कर. म्हणजे तुला गुरुहत्येचंच केवळ नव्हे तर समाजद्रोहाचंहि पातक लागणार नाहीं. पण निरहंकार बुद्धीनं वागणं सोपं नाहीं. ती बुद्धि अंगीं बाणण्याला अहिंसा, सत्य इत्यादि

महाव्रतांची तपस्या करावी लागते; पण तूं दैवी संपत्ति घेऊनच जन्मला आहेस, व वर सांगितलेलीं महाव्रतं कळत–नकळत तूं आजन्म पाळलीं आहेसच. **तरी परमेश्वरार्पण बुद्धीनं स्वधर्माला अनुसरून युद्ध कर.** यामुळं जर तुला पातक लागलं तर त्याबद्दल मी जबाबदार आहें. **मजवर तुझा विश्वास** आहे ना? तर **ऊठ, घे धनुष्य हातीं, व आपल्या पराक्रमानं अजरामर अशी कीर्ति मिळव, व द्रौपदीचे अश्रु पुसून टाक !**

" माझ्या ह्या बोलण्याचा अर्जुनावर परिणाम होऊन तो लढण्यास तयार झाला. रुक्मिणी, मी आजपर्यंत अनेक जय मिळविले, परंतु अर्जुनाला स्वधर्मास उद्युक्त करण्यांत मला जें यश मिळालं तेंच मोठं चिरंतन महत्त्वाचं यश मी समजतों ! युद्ध संपल्यावर मी व्यासांना भेटलों, व त्यांना अर्जुनाच्या विषादाचा प्रसंग सांगितला; तो ऐकतांच त्या महाकवींची प्रतिभा एकदम प्रज्वलित झाली. ते एकदम उभे राहिले, व मला गाढ आलिंगन देऊन म्हणाले, ' कृष्णा, उपनिषदांच्या तुझ्या दीर्घ अभ्यासाचं सार्थक झालं. मी आतां जो भारती युद्धावर ग्रंथ लिहिणार आहें त्यांत हा प्रसंग व तुझा अमूल्य उपदेश विस्तारानं असा कथन करीन कीं, भावी पिढ्यांना तो अनंत कालपर्यंत दिव्य दीपस्तंभासारखा उपयोगी पडेल !'

" मीं अर्जुनास दिलेला मंत्र व्यास-महर्षींना जीवन-संदेश वाटला, हें पाहून माझं जीवित सार्थकीं लागलं असं मला वाटतं आहे. मीं बांधलेलीं मंदिरं आणि सुंदर उद्यानं, आणि या द्वारकेचा अभेद्य दुर्ग हीं सर्व एखादे वेळीं समुद्रांत बुडून जाऊन नामशेष होतील, पण व्यासवाणीनं गाइली जाणारी गीता अमर होणार आहे ! माझे अल्लड वयांत मुरलींतून कर्णमधुर आलाप काढण्यांत मी स्वतःला कृतार्थ समजें. आज त्याच मुरलींतून जीवन-संगीताचे आलाप निघून तुला मंत्रमुग्ध केलं, यापरतं माझ्या जीवनाचं सार्थक तें कोणतं ?"

" देवा, एक शंका माझे मनांत आली आहे, विचारूं का ? " आपल्या पतीला त्रास न देण्याच्या वृत्तीनें रुक्मिणीनें भीतभीत विचारलें.

" विचार कीं. त्यांत काय एवढं भिण्याचं कारण आहे ? " कृष्णानें मन-मोकळेपणानें परवानगी दिली.

" देवा, तुम्ही अर्जुनभावोजींना म्हणालां नाहीं का कीं, स्थितप्रज्ञ बुद्धीनें आपलीं कर्मं परमेश्वरार्पण करावीं, म्हणजे पापपुण्य लागत नाहीं ! "

" होय तर! माझ्या उपदेशाचं वरील वाक्य सारसर्वस्व होतं." कृष्णानें ठांसून सांगितलें.

" माझी शंका पुढंच आहे. त्या वेळीं तुम्ही असंहि म्हणालां कीं, ही बुद्धि सत्य, अहिंसादि महाव्रतं आचरण्यानं प्राप्त होते, खरं ना ? " रुक्मिणीनें आपल्या शंकेची प्रस्तावना केली.

" अगदीं खरं आहे. अग, स्थितप्रज्ञबुद्धि ही काय वाटेवर पडली आहे, कीं वाटेल त्याला एकदम प्राप्त व्हावी ! सत्याचा खडतर मार्ग अनुसरल्याशिवाय, हृदयांत अहिंसा बाणल्याशिवाय ही बुद्धि उत्पन्न होत नाहीं. " कृष्ण आपला मुद्दा विशद करीत म्हणाला.

" हें खरं ना? मग अर्जुनानं अगर आपण दुष्टांचं कंदन कसं केलं? त्यांत हिंसा नाहीं का झाली ? " रुक्मिणीनें कृष्णाला कैचींत पकडल्यासारखें केलें.

रुक्मिणीच्या या प्रश्नानें कृष्ण खडबडून जागा झाल्यासारखा झाला व म्हणाला, " रुक्मिणी, तूं बरीच खोल पाण्यांत चाललीस. बरं आहे, तूं ज्या अर्थी शंकाच विचारली आहेस त्या अर्थी मी या अहिंसेच्या सूक्ष्म धर्माचं स्पष्टीकरण करतों. प्राण्याचा वध न करणं हा अहिंसेचा वरवरचा अर्थ आहे. **खरी अहिंसाबुद्धि म्हणजे द्वेष-मत्सररहित बुद्धि होय.** प्राण्याची हत्या न करणं ह्याला अहिंसेंत स्थान आहे, पण तो अहिंसेचा गाभा नव्हे. कंस, शिशुपाल इत्यादिकांचा मीं वध केला खरा, पण त्यांत माझी द्वेषबुद्धि नव्हती; नाहीं तर मी कंसाचा अंत्यसंस्कार त्याच्या पदाला शोभेल अशा गौरवानं केला नसता. अश्वत्थाम्यानं आमचा महान् अपराध केला, तरी आम्हीं त्याला जीवदान दिलं. कारण आम्हांला त्याला फक्त निष्प्रभ करायचा होता. आमच्या मनांत द्वेष असता तर आम्हीं त्याचा जीवच घेतला असता. असो. आतां प्रश्न असा निर्माण होतो कीं, आसुरी वृत्तीचा निग्रह वध न करितां कसा करायचा? या वेळपर्यंत आम्हांला तसा मार्ग सांपडलेला नाहीं, म्हणून

द्वेषविरहित बुद्धीनं आसुरी वृत्तीच्या लोकांचा आम्हीं वध केला; पण **पुढं-मागं कोणाला असा मार्ग सांपडून वध न करितां आसुरी वृत्तीचा निग्रह करतां आला तर दैवी संपत्तीचा असामान्य विजय झाला असं होईल.** मनुष्यानं आपल्याला ठाऊक असलेल्या मार्गानं पण कोणाचाहि द्वेष अगर मत्सर न करतां प्राप्त कर्तव्यं करावीं. त्याप्रमाणं मीं जन्मभर केलं, यांत अहिंसाधर्मच मीं पाळला असं होतं. असो. रुक्मिणी, तुझ्या इच्छेप्रमाणं मीं प्रथम माझी साधी मुरली वाजवून दाखविली, नंतर माझं चरित्र स-रहस्य सांगितलं; आणि आज पुन्हां तुजपुढं गीता-मुरलीचे दिव्य आलाप तुला ऐकविले. झालं ना तुझं समाधान ?" कृष्णानें कर्तव्य केल्यावर प्राप्त होणाऱ्या समाधानी वृत्तीनें विचारलें.

रुक्मिणीनें कृष्णाचे पदीं लीन होऊन म्हटलें कीं, "हे देवा, तुम्हांला वरतांना मीं फक्त आपल्या वीरश्रीचा विचार केला होता. आजपर्यंत मी आपणांला संसारांतील सोबती म्हणून समजत आलें; पण आज आपण जें जीवनाचं रहस्य सांगितलं, त्यावरून आपल्या आयुष्यक्रमावर दृष्टि टाकली म्हणजे **भीष्मपितामहांनीं म्हटल्याप्रमाणं आपण खरोखरच योगेश्वर आहांत.** एवढंच नव्हे, **तर जगद्गुरुहि आहांत.** आज मी याच दृष्टीनं आपल्याकडे पहातें, व आपल्या चरणीं भक्तीनं लीन होतें." असें म्हणून रुक्मिणीनें कृष्णाचे पाय आपल्या आनंदाश्रूंनीं भिजविले !

## सायंकाळच्या छायेंत

भारती युद्धांत पांडवांना यश व हस्तिनापूरचें राज्य प्राप्त करून देऊन श्रीकृष्ण द्वारकेंत आला. युद्धांतल्या भयंकर हानीमुळें व सुभद्रापुत्र अभिमन्यु रणांत पडल्यामुळें कृष्णाच्या घरावर दुःखाची छाया कशी पसरली होती हें आपण मागील प्रकरणांत पाहिलेंच आहे. कांहीं काल गेल्यावर कृष्णाचा नातू अनिरुद्ध व रुक्मीची नात रोचना यांचा विवाह रुक्मिणीनें ठरविला. या विवाहाकरितां यादवमंडळी भोजकटनगरास गेली होती. विवाहसमारंभ थाटानें पार पडल्यानंतर त्या वेळच्या क्षत्रियांच्या चालीप्रमाणें व्याही-व्याही द्यूत खेळावयास बसले. खेळतां खेळतां दोन्ही पक्ष नेहमींप्रमाणें एकेरीवर आले. बोलतां बोलतां रुक्मी म्हणाला, "तुम्ही यादव बोलून

चालून गवळी. तुम्हांला द्यूतांत काय समजतं ? द्यूत क्षत्रिय राजांनींच खेळावं!" हे शब्द द्यूताची नशा चढलेल्या बलरामदादांना सहन झाले नाहींत. त्यांनीं तेथला हस्तिदंती फांसा घेतला आणि रुक्मीचे मस्तकावर जोरानं मारला. तो वर्मी लागून वृद्ध रुक्मी गतप्राण होऊन पडला. रुक्मिणीनें अर्थात् भावाबद्दल पुष्कळ शोक केला; पण कृष्णानें तोंडावाटे अवाक्षर काढलें नाहीं. इकडे भाऊ व इकडे पत्नी यांमधून त्याला मार्ग काढणें भाग होतें. बंधुप्रेमाला धक्का लागण्याचे प्रसंग अनेक येतात, त्यांतून कुशलतेनें जे मार्ग काढतात तेच संसारांत यशस्वी होतात. असो.

लग्नसमारंभ आटोपून मंडळी द्वारकेस येतात न येतात तोंच अश्वमेधयज्ञाकरितां पांडवांचें निमंत्रण आलें, म्हणून राम-कृष्ण आपल्या परिवारासह हस्तिनापूरला गेलें. अश्वमेधाकरितां जी प्रचंड द्रव्यसामग्री लागते ती आणण्याकारितां पांडव हिमालयांत गेले होते. त्यांचे पश्चात् श्रीकृष्ण हस्तिनापूरला पोहोंचल्यावर अभिमन्यूची गर्भवती स्त्री उत्तरा प्रसूत झाली, पण मूल मेलेलें निघालें. सर्व कौरववंशाचा भावी अंकुर हाच काय तो शिल्लक होता. तो मेलेला निघाला, तेव्हां वंश चालण्याची आशाच खुंटली. तेव्हां म्हातारी कुंती, द्रौपदी आणि सुभद्रा यांनीं रडून आकान्त केला, व शेवटीं कृष्णाचे पाय धरून त्या म्हणाल्या, "कृष्णा याला तूं पहा व आपल्या कृपादृष्टीनं जिवंत कर." उत्तरेच्या शोकाला पारावार राहिला नव्हता. तरी धीर धरून तिनें त्या मृत बालकाला कृष्णाच्या मांडीवर ठेवून म्हटलें, "मुला, तूं धर्मज्ञाचा पुत्र असून गोविंदाचे मधुर हास्यानं स्वागत करीत नाहींस, हें काय ?"

कृष्णाचें हृदय हा प्रसंग पाहून कळवळलें. त्यानें आचमन करून मोठ्यानें शपथ करून म्हटलें, **"मी विजयांतसुद्धां दुसऱ्याचा विरोध केला नाहीं हें जर सत्य असेल तर त्या सत्यानं या बालकाचा प्राण परत येवो. कंस व केशी यांचा मीं धर्मानंच नाश केला ही गोष्ट खरी असेल तर त्यास त्यानें हा मृत बालक पुन्हां सचेतन होवो!"** असें कृष्ण म्हणत असतां त्या बालकाचा श्वास हळूहळू चालू झाला व तो लवकरच रडूंहि लागला! तेव्हां कौरवस्त्रियांना जो आनंद झाला त्याचें यथार्थ वर्णन करणें अशक्य! यानंतर पांडव हिमालयांतून आले. नंतर

अश्वमेध मोठ्या थाटानें झाला. तो यज्ञ पार पडल्यावर यादवमंडळी द्वारकेस आली.

श्रीकृष्णाचें वय आतां बरेंच झालें होतें हें आपण पाहिलेंच आहे. यानंतर त्यानें विशेष लांबचा प्रवास केला नाहीं, किंवा युद्धांत भाग घेतला नाहीं. त्याची कर्तव्यदक्ष प्रजापालक म्हणून जशी कीर्ति होती त्याप्रमाणें धर्मतत्त्ववेत्ता व योगेश्वर म्हणूनहि त्याचें नांव सर्वतोमुखीं झालें होतें. दूरदूरच्या लोकांना कृष्ण म्हणजे एक ऐतिहासिक व्यक्ति म्हणून वाटूं लागली होती. यामुळें ते त्याचें दर्शन घ्यावयास येत. जे धर्मजिज्ञासु असत ते त्याचेकडे येऊन धर्मचर्चा करीत. त्याचप्रमाणें विद्वान् ब्राह्मणांना पात्रता पाहून तो दान करी, यामुळें अनेक विद्यांचें संकेतस्थान असें नांव द्वारकेला प्राप्त झालें होतें.

## दुःस्थितीचे डोहाळे

अशा रीतीनें द्वारकेचें वैभव सर्व बाजूंनीं कळसास पोहोंचलें असतां त्याला उतरती कळा लागण्याचे प्रसंग कृष्णाचे देखतच उत्पन्न होऊं लागले. कृष्णानें चांगलें शिक्षण व उत्तेजन देऊन यादवांना बलिष्ठ केलें. त्यामुळें द्वारकेकडे वांकड्या नजरेनें पहाण्याची कोणाची छाती होत नव्हती हें खरें; पण त्याबरोबरच या यादववीरांत आढ्यता, मत्सर, द्वेष हे दुर्गुण वाढत चालले होते. मद्यपानाचें व्यसनहि त्यांच्यांत चांगलेंच पसरलें होतें. इतकेंच नाहीं, तर ज्यानें त्यांना या पदवीला आणलें त्याच कृष्णाचाहि ते द्वेष करूं लागले. श्रीकृष्ण विद्वानांना जो आश्रय देई तो अनाठायीं खर्च आहे असें खुद्द त्याच्या पुत्रांना वाटूं लागलें. साधुसंतांच्या ठिकाणीं जी कृष्णाची भक्ति होती तिला ते आचरटपणा म्हणत. त्यांच्या दुर्वर्तनाबद्दल जर त्यानें कधीं निषेध केला तर ते त्याला म्हातारपणची बडबड असें समजत. एवंच काय, त्याचे तोंडावर नव्हे पण त्याचेमागें त्याचे प्रत्येक कृत्याची अवहेलना करणें ही तरुण यादवांची अलीकडे परिपाठीच झाली होती.

कृष्णाला हें सर्व समजत होतें; पण त्याला त्याचा उपाय नव्हता. चांगल्या पेहेलवानानें अनेक वर्षांच्या मेहनतीनें पुष्ट केलेले बाहु त्याचे म्हातारपणीं

त्याला जसे अवजड होतात, तसें कृष्णाचे बाबतींत झालें. आपल्या सत्तेचा काळ संपत आला आहे हें त्यानें ओळखून, चाललेल्या गोष्टीकडे तो तटस्थपणानें पहात होता. परिस्थिति बदलल्याबद्दल त्यानें कधीं कुरकुर केली नाहीं, किंवा तरुण पिढीवर तो तणतणत राहिला नाहीं. विपरीत कालांतच माणसाची शान्त वृत्ति कसास लागते. त्या परीक्षेंत कृष्ण चांगलाच उतरला यांत संशय नाहीं.

यादवांचा नाश लवकरच होणार हें सर्वांसच दिसत होतें. आतां प्रश्न एवढाच होता कीं, तो केव्हां होणार? शेवटीं एक दिवस यादवांच्या नाशाला कांहीं तरी निमित्त पाहिजे होतें तें एका प्रसंगानें मिळालें. एक दिवस श्रीकृष्णाकडे विश्वामित्र व नारद सहज आले असतां, त्याची चेष्टा करावी म्हणून कृष्णाचा पुत्र सांब याला स्त्रीवेष देऊन सारणप्रभृति यादव, त्या ऋषींकडे जाऊन म्हणाले, "आपण त्रिकालज्ञ आहां. ही पुत्रेच्छु बभ्रूची स्त्री गर्भार आहे. तिला पुत्र होईल का नाहीं तें सांगा." हें ऐकून ते ऋषि रागावले व त्यांनीं शाप दिला, "ही स्त्री नाहीं, हा कृष्णपुत्र सांब आहे. याला उद्यां घोर मुसळ होईल, व तें तुम्हां यादवांचा नाश करील!" ही शापवाणी ऐकून यादव घाबरले व त्यांनीं त्या मुसळाचें चूर्ण करून तें समुद्रांत फेकून दिलें.

## मद्याच्या धुंदींत रक्तपात

पुढें कांहीं काल गेल्यावर खग्रास सूर्यग्रहणाचा योग आला. म्हणून यादवमंडळींना घेऊन कृष्ण व बलराम प्रभासतीर्थावर गेले. तेथें त्यांनीं स्नानें केल्यावरं यथेष्ट भोजन केलें. यानंतर मद्यपानाचा कार्यक्रम सुरू झाला व तो अतिरेकाला गेला. मद्याच्या नशेंत एकमेकांचीं उणीं एकमेकांनीं काढलीं. मग अर्थात् चिडाचिडीला सुरुवात होऊन एकमेकांनीं एकमेकांवर शस्त्रें चालवून रक्तपात आरंभिला. श्रीकृष्णानें त्यांना आवरण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ! शेवटीं त्या घोर मुसळाचा कीस जो समुद्रात पडला होता त्याचे लोखंडी लवाळे जे उत्पन्न झाले होते ते उपटून घेऊन यादवांनीं एकमेकांचीं मस्तकें रक्तबंबाळ केलीं. यादवांचा हा नाश डोळ्यादेखत पाहून व त्यांत आपले पुत्रपौत्र मेलेले पाहून श्रीकृष्णास उद्वेग आला! त्यानें दारुकाला सांगितलें कीं, "तूं सत्वर अर्जुनाकडे जा व त्याला माझा निरोप सांग कीं,

यादव आपआपसांत भांडून नाश पावले आहेत. बळीराम वनांत प्राण-निरोध करून बसला आहे. मीहि त्याचेबरोबरच इहलोकची यात्रा संपवितों. तरी तूं सत्वर ये व द्वारकेंतील लोकांना घेऊन हस्तिनापूरला जा. कारण द्वारका समुद्रांत लवकरच बुडून जाण्याचा रंग दिसतो आहे." यानंतर कृष्णानें द्वारकेंत जाऊन वडील मंडळींचा निरोप घेतला, आणि बलराम जेथें बसला होता तेथें येऊन एका झाडाखालीं प्राणाचा निरोध करून बसला. इतक्यांत एका भिल्लानें दुरून त्याच्या पायाच्या तळव्याला मृगाचें तोंड समजून नेमका बाण मारला. त्यामुळें झालेली जखम प्राणघातक ठरली. कृष्णानें त्या शल्यवेदना शान्तपणें सहन करून आपलें मन, बुद्धि व प्राण सर्वात्मशक्तींत लीन केले !

कृष्णाचा निरोप ऐकतांच अर्जुन द्वारकेंत आला, व वृद्ध स्त्री-पुरुष आणि बालकें यांना घेऊन तो द्वारकेच्या बाहेर पडला. तोंच कृष्णाच्या भाकिताप्रमाणें ती समुद्रांत बुडाली! रुक्मिणी वगैरे कृष्ण-स्त्रिया सती गेल्या. पांडवांनीं कृष्णाचा नातू वज्र याची स्थापना इंद्रप्रस्थ येथें केली. कृष्णानंतर पांडवहि परीक्षितास राज्यावर बसवून हिमालयांत गेले !

# १५

## अर्घ्यप्रदान

**क्षणिक जरि अशांचा देह अदृश्य झाला।**
**सुतनु शुभ यशाची भूषवी भूतलाला॥**

श्रीकृष्णाचें चरित्र असें आहे कीं, त्याची गोडी आज पांच हजार वर्षें झालीं तरी यत्किंचितही कमी झालेली दिसत नाहीं. तो बालपणीं गोकुळांतल्या गोपगोपींना जितका प्रिय होता तितकाच आजच्या पाश्चात्य विद्येनें विभूषित झालेल्या स्त्रियांनाहि आवडत आहे. कृष्णाचीं गाणीं बालिकांप्रमाणें वृद्ध स्त्रियाही म्हणतांना कंटाळत नाहींत. भागवतांतील श्रीकृष्णचरित्रश्रवणास स्त्रीपुरुषांचे थवेचे थवे अजूनहि लोटतात. विद्वानांच्या सभेंत श्रीकृष्णचरित्राची चिकित्सा संपली आहे असें नाहीं. राजकारणांत '**शठं प्रति शाठ्यं**' या तत्त्वानें चालणाऱ्या श्रीकृष्णास आपला राजकारणांतील आद्य गुरु म्हणून जितक्या आदरानें मानतात तितक्याच आदरानें '**शठं प्रति सत्यं**' या तत्त्वाप्रमाणें चालणारे त्याला वंदन करून त्याच्या गीतेला कंठस्थ करीत आहेत. विनोबा भावे यांनीं गीतेचें सुरस, सोपें व सरळ भाषान्तर करून तें घरोघरीं पोहोंचविण्याकरितां अविश्रान्त श्रम केले आहेत. आद्य शंकराचार्य, ज्ञानेश्वर, लोकमान्य टिळक, व विनोबा भावे यांनीं आपआपल्या पद्धतीनें गीतेवर भाष्यें रचलीं आहेत. गीतेचें भाषान्तर बहुतेक सर्व प्रसिद्ध भाषांत झालेलें आहे. सर एडविन् आरनोल्ड यानें तर भगवद्गीतेला स्वर्गीय गान म्हणून संबोधून तिचें इंग्रजी काव्यांत रूपांतर केलें आहे. इतका श्रीकृष्ण सर्व काळीं सर्व लोकांत प्रिय झालेला होता व आहे.

गुराख्यांत वाढलेला असून त्यानें पराक्रमांत त्या काळच्या मोठमोठ्या क्षत्रिय राजांवर मात केली. पराक्रमी पांडवांना तो गुरुस्थानीं होता. कौरवांकडील भीष्माचार्य तर त्याला राजसूययज्ञांत अग्रपूजेच्या मानास पात्र समजत असत. सांदीपनी गुरूंजवळ त्याचें शिक्षण झालें हें खरें; पण तें

अल्पकालच. हें पाहून 'अपूर्व त्याच्या मतिचें दिसे बळ। निमित्त होती गुरुराज केवळ।' असें म्हणावेंसें वाटतें. **कृष्णचरित्राची अपूर्वता ही आहे कीं, त्यानें अर्जुनाला जो उपदेश केला तो त्याचे जीवनांत ओतप्रोत भरून राहिला होता.** त्यानें इतक्या राजांचा पराभव केला, पण ते सर्व कृष्णाचे अपराधी होते. कृष्णाचे जिवावर उठलेल्या कंसप्रभृति लोकांचाहि त्यानें कधीं द्वेष केला नाहीं अगर त्यांचेसंबंधानें मुखावाटे निरर्गल प्रलाप काढले नाहींत. पराक्रमी असून निरिच्छ, संकटग्रस्त असून सदा प्रसन्न, वैभव, सत्ता प्राप्त झाली असतांहि राजसूययज्ञात उष्टीं काढण्यास व अर्जुनाचे घोडे खाजावण्यास सदा तत्पर असा पुरुष इतिहास-पुराणांत शोधूनहि सांपडत नाहीं!

आजच्या कालांतहि श्रीकृष्णचरित्र आपल्या सर्वांना मार्गदर्शक होऊं शकतें. आपल्या राष्ट्राच्या उद्धाराकरितां आपण जे जे प्रयत्न करूं त्यांत श्रीकृष्ण आपला वाटाडया होऊं शकतो. तो द्रौपदीच्या हांकेसरशीं जितक्या त्वरेनें धावे तितक्याच त्वरेनें आपल्याहि हांकेला तो ओ देईल; पण आपल्या ठिकाणीं द्रौपदीची निष्ठा हवी! श्रीकृष्णाचें मार्गदर्शन पतित राष्ट्राला जितकें उपयोगी तितकेंच वैभवाचे शिखरावर पोहोंचलेल्यांना उपयुक्त ठरेल. त्यानें कौरवांचे सभेंत केलेलें शिष्टाईचें भाषण आजच्या राष्ट्रसंघांतील सभासदांनीं मनन करावें अशा योग्यतेचें आहे. म्हणून आजच्या तरुण पिढीनें श्रीकृष्ण-चरित्राचा सखोल अभ्यास करून प्राचीनांचें ऋण फेडण्याची तयारी करावी. ती तयारी करण्यास सुलभ जावें म्हणून **या आत्मकथेंत** श्रीकृष्णाच्या विविध भागांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

ज्या सूर्यासारख्या देदीप्यमान पराक्रमी पुरुषानें अनिष्ट प्रवृत्तींचा उच्छेद करून लोकांना सन्मार्ग दाखविला, लोकांमधला आळस झटकून टाकून त्याना 'कार्यप्रवृत्त केलें,' स्वतः निरिच्छ राहून सर्वांचें कल्याण इच्छिलें त्या परम पावन, परम कल्याणकारी **श्रीकृष्णांच्या पदकमलांना** वंदन करून, त्यांच्या चरित्रगायनानें धन्य झालेली लेखणी कांहीं काल खालीं ठेवतों.

ॐ तत् सत्।

# टीपा व प्रश्न

## प्रास्ताविक

**टीपा :—श्रुतिमनोहर**— कानांना गोड लागून गुंगविणारा. **भावसमाधि**— भावनांनीं भारून जाण्याची स्थिति. **सत्यभामा**— कृष्णाची पदोपदीं रुसणारी, पण हुशार पत्नी. **प्राजक्त**— पारिजातक शब्दाचा अपभ्रंश. पारिजातकाच्या झाडावरून रुक्मिणी व सत्यभामा यांत मत्सरी भांडण चाले.

**प्रश्न** :—( १ ) कृष्ण भावसमाधींत गेला असल्याचा पुरावा द्याल का?
( २ ) समाधिभंग केल्याबद्दल रुक्मिणी कोणती शिक्षा भोगणार होती?
( ३ ) कृष्णाला राजा म्हणवून घेणें कां आवडत नव्हतें?

## प्रकरण १ लें

**टीपा :—मंत्रमुग्ध**—जादूनें भारून टाकल्याप्रमाणें. **व्यास**—या मुनींनीं पुराणें रचलीं आहेत. **शुक**—व्यासपुत्र. यानें व्यासांचें भागवतांतील कृष्णचरित्र परीक्षितास सांगितलें. **आकाशवाणी**—अदृश्य व्यक्तींचें भाषण.

**प्रश्न** :—( १ ) कृष्णाचे मतानें कंसाचा मोठा दोष कोणता होता?
( २ ) अतर्क्य शक्तीच्या साहाय्यासंबंधानें कृष्णाचे विचार काय होते?

## प्रकरण २ रें

**टीप :—स्वधर्म**— आपली जबाबदारी. **जांबुवंती**— कृष्णाची एक पट्टराणी. **नर्म भाषण**— सुखविणारी थट्टा. **गोपाळकाला**— निरनिराळ्या घरचे पदार्थ एकत्रित करून खाणें.

**प्रश्न** :—( १ ) सुभद्रेस वागविण्यासंबंधानें कृष्णानें रुक्मिणीस कोणत्या अगत्याच्या सूचना दिल्या होत्या?
( २ ) वसुदेवांची सांत्वन करण्याची रीत कशी असे?
( ३ ) कृष्ण दुबळ्या सवंगड्यांशीं कसा वागे?

(४) गोकुळचीं प्रौढ माणसें रामकृष्णांवर केव्हां विशेष खुष झालीं ?

(५) कृष्णानें कालियाला कां ठार मारलें नाहीं ?

## प्रकरण ३ रें

**टीप :—खलबतखाना**— राजकीय चर्चेची गुप्त जागा.

**प्रश्न :—**प्रजाजनांच्या तक्रारींचा निकाल कृष्ण कसा करीत असे ?

## प्रकरण ४ थें

**टीपा :— जीवनशिक्षण**— व्यवहार कसा कुशलतेनें व उच्च ध्येयानें करावा याचें शिक्षण. **व्यूह**— रणमैदानावरील सैन्याची विशिष्ट रचना. **सुपर्णव्यूह**— गरुडपक्ष्याच्या आकाराची सैन्यरचना. **संहाहक**—मालिश करणारा.

**प्रश्न :—**(१) अभिमन्यूचें गुणदोषवर्णन करा.

(२) इंद्राची पूजा न करितां गोवर्धनपर्वताची पूजा गोपांनीं करावी असें कृष्णानें कोणत्या हेतूनें सुचविलें ?

## प्रकरण ५ वें

**टीपा :—चिनांशुक**— रेशमी वस्त्र. अशीं वस्त्रें प्रथम चीन देशाहून येत असत. **विश्वात्मक भाव**— विश्व व मी एक आहोंत, दोन नाहींत ही भावना. **ईशावास्य उपनिषद्**— ह्या लहानशा उपनिषदाची भाषा सोपी व कल्पना विशाल आहे. या उपनिषदाचे पहिले शब्द ईशावास्य असे आहेत, म्हणून याला ईशावास्य उपनिषद् म्हणतात. **धनुर्याग**— धनुष्याची पूजा. या समारंभानिमित्त कुस्त्या करण्याचा प्रघात असे असें दिसतें. **मोहरा**— सोंड गुंडाळून घेऊन हत्तीनें केलेला हल्ला.

**प्रश्न :—**(१) कीचकाचा वध ही अनेक अनिष्ट घटनांची पूर्वसूचना कशी होती ?

(२) उपनिषदें-श्रवणाचे वेळीं कृष्ण साधा वेष कां परिधान करीत असे ?

(३) अवतारासंबंधानें कृष्णाचें काय मत होतें ?

(४) कृष्णाच्या कोणत्या शब्दांनीं गोकुळवासीयांचें समाधान झालें ?

(५) पराक्रमी पुरुषाचें पहिलें लक्षण कोणतें ?

## प्रकरण ६ वें

**टीप :—स्तंभित**— तटस्थ.

**प्रश्न** :—(१) चाणूर—मुष्टिकादिकांचा पराभव कां झाला ?

(२) कंसाची गचांडी कृष्णानें कोणत्या कारणास्तव धरली ?

(३) गोकुळांत कृष्ण पुन्हां केव्हांही कां गेला नाहीं ?

(४) कृष्ण–बळिरामांचें सख्य टिकण्याचें कारण काय ?

(५) कृष्ण बळिरामाला खरा संन्यस्त अथवा योगी पुरुष कां म्हणत असे ?

## प्रकरण ७ वें

**टीपा —भू-देवा**— विद्वान् ब्राह्मणांना पूर्वी भू–देव–म्हणून संबोधित असत. **अर्घ्यपाद्य**—प्राचीन काळीं सन्माननीय पाहुणा बाहेरगांवाहून आला म्हणजे घरांतील मुख्य माणसानें त्याच्या पायांवर पाणी घालून त्याला गंधाची उटी लावून सुगंधित पुष्पें अर्पण करण्याची पद्धत असे. **संहिता**— मंत्रात्मक वेदभाग.

**प्रश्न** :—(१) सुदाम्याला कृष्णगृहीं अधिक मोकळें कां वाटे ?

(२) तो कृष्णगृहाला भूलोकींचा स्वर्ग कां म्हणाला ?

(३) सांदीपनी व त्यांच्या पत्नी यांची स्वभावचित्रें काढा.

(४) विद्यादान करतांना गुरुजी विद्यार्थ्यांची परीक्षा कोणत्या तत्त्वावर करीत ?

(५) जहागीर मिळणार हें कळल्यावर सुदाम्याचे विचार कोणत्या दिशेनें चालूं लागले ?

## प्रकरण ८ वें

**टीपा :—हुजरात**— राजाचें खास सैन्य. **पंक्तिप्रपंच**— पंक्तीमध्यें मालकाला व आश्रिताला वाढण्यांत फरक करणें. **अनुसंधान**— संबंध. **अवलाद**— चांगली जात. **प्रभासतीर्थ**— काठेवाडांत जुनागडाजवळ आहे.

प्रश्न :—(१) ज्ञान्याला दुःख होतें का याबाबत कृष्णाचे विचार कसे होते ?
(२) कृष्णाच्या काळीं रथाला दोन चाकें होतीं का चार ?
(३) गरिबांचीं दुःखें समजावून घेण्याला काय केलें पाहिजे ?
(४) कृष्णाची अश्वशाळेवर देखरेख कशा प्रकारची होती ?
(५) कृष्णाच्या मतानें आत्मचिंतन केव्हां करावें ?
(६) कृष्णानें मथुरेचा त्याग कां केला ?

## प्रकरण ९ वें

टीप :—कृतार्थ— करावयास पाहिजे तें केल्याचें समाधान.

प्रश्न :—(१) रुक्मिणीविवाहाची हकीगत सांगतांना कृष्णानें गोपवेश कां धारण केला नाहीं ?
(२) कोणीही राजकन्या आपल्याला वरणार नाहीं असें त्यास कां वाटत होतें ?
(३) रुक्मिणीचें स्वयंवर कां थांबलें ?
(४) आपली बहीण कृष्णाला देण्यास रुक्मी कां तयार नव्हता ?

## प्रकरण १० वें

टीप :—नरयज्ञ— मनुष्यांचा बळी.

प्रश्न :—(१) कृष्णाचे पुत्रांना त्याचेबद्दल आदर कां वाटत नव्हता ? त्यांचा दृष्टिकोन कशा तऱ्हेचा होता ?
(२) पुत्राविषयीं कृष्णाचें मत काय होतें ?
(३) जरासंधावर कृष्ण कां चालून गेला ?
(४) शिशुपालानें कृष्णाची कोणती आगळीक केली ?
(५) पेंद्यानें कृष्णाला संकटभऱ्या हें नांव कां दिलें ?

## प्रकरण ११ वें

प्रश्न :—(१) कृष्ण-काळजी म्हणजे काय ?
(२) कृष्णाला खरें धन कोणचें वाटत होतें ?
(३) अर्जुनालाच सुभद्रा देण्याचें कृष्णानें कां ठरविलें ?
(४) बलरामदादा शांत कसे झाले ?

## प्रकरण १२ वें

**टीपा :—षट्कर्णी**— तीन मनुष्यांचे कानीं जाणें. **राजसूययज्ञ**— हा यज्ञ सार्वभौम राजानेंच करावयाचा असे. या यज्ञांत इतर राजे यज्ञ करणाऱ्या राजाचें अधिराज्य मान्य करीत व करभार अर्पण करीत. **शिष्टाई**— प्रतिपक्षाची समजूत करण्यासाठीं सुज्ञ मनुष्य पाठविणें.

**प्रश्न :**—(१) कौरव-पांडवांचें हाडवैर होण्याला काय कारणें घडलीं?
(२) धर्मराजानें कोणत्या घोडचुका केल्या?
(३) द्रौपदीच्या लहानशा चुकीला कोणतें प्रायश्चित्त मिळालें?
(४) कृष्णानें भारतीय युद्धांत कोणता भाग घ्यावयाचें ठरविलें होतें?
(५) कृष्णाला वारंवार भय कशाचें वाटे व त्याकरितां त्यानें कोणती काळजी घेतली होती?

## प्रकरण १३ वें

**टीपा :—उपलव्य**— कोणत्याच राजाच्या मालकीचें नसलेलें क्षेत्र. **क्रमप्राप्त**— निश्चित; रात्रीमागून दिवसासारखें. **वासवी शक्ति**— कर्णाला कवच आणि कुंडलें जन्मतःच प्राप्त झालीं होतीं. इंद्रानें त्याचेजवळ ह्या वस्तु मागितल्या. उदार कर्णानें अंगाला चिकटलेलें कवच ओढून काढून दिलें. त्यानें कर्ण रक्तबंबाळ झाला, तेव्हां इंद्राचें मन द्रवलें व त्यानें कोणा तरी एका पुरुषाचा निश्चयानें बळी घेणारी अशी शक्ति कर्णाला बक्षीस म्हणून दिली. इंद्राकडून ती प्राप्त झाली म्हणून तिला वासवी शक्ति म्हणत. इंद्राचें दुसरें नांव वासव होतें. **नारायणी अस्त्र**— हें विचित्र अस्त्र असे. ह्याच्याशीं लढलें कीं त्याची शक्ति वाढे व त्याला नमस्कार केला कीं हें विझून जाई. भीम या अस्त्राला प्रथम नमस्कार करीत नव्हता; पण पुढें कृष्णानें त्यास नमन करावयास लावून नारायणी अस्त्राला निष्प्रभ केलें. अर्थात् त्यामुळें अश्वत्थामा हतवीर्य झाला. **दैवी संपत्ति**— सात्त्विकस्वभाव. **उत्तरायण**— सूर्य उत्तर दिशेला वळला म्हणजे उत्तरायण लागतें. **अयन**— गति; दक्षिणायनांतला मृत्यु हा अशुभ समजला जाई. म्हणून इच्छामरणी भीष्मांनीं उत्तरायणापर्यंत प्राण धारण करून ठेवले होते.

प्रश्न :—( १ ) भारती युद्धाला सर्वसंहारक युद्ध कां म्हटलें आहे?
( २ ) भारती युद्धाची हकीगत कृष्णानें गौळवाड्यांत न सांगतां वसुदेव-देवकीच्या मंदिरांत कां सांगितली ?
( ३ ) दुर्योधनानें पांडवांची अल्प मागणी कां धुडकावून लावली?
( ४ ) भीष्म-द्रोणांपेक्षां कर्णावर दुर्योधनाची भिस्त कां होती?
( ५ ) धर्मराजाचा उद्वेग कसा गेला ?

## प्रकरण १४ वें

**टीपा:—योगारूढ—** परमेश्वराशीं एकरूप होण्याची स्थिति. **अनंत शक्तींचा व्यापक उद्देश—** कुटुंबाचा नेता कुटुंबाच्या हिताकरितां त्यांतील व्यक्तींचें मन क्षणभर जसें दुखावतो त्याप्रमाणें परमेश्वर विश्वाच्या कल्याणार्थ एखादे वेळीं एखाद्या समाजाचें नुकसान होऊं देतो. भारतीय युद्धांतली मनुष्यहानी ही परमेश्वराच्या एखाद्या व्यापक उद्देशामुळें घडून आली असेल. **विश्वाचें संगीत —** विश्वांत वावरणाऱ्या अनेक शक्तींच्या सुंदर मेळाव्यांतून निघालेलें गाणें. हें गाणें अत्यंत व्यापक मनाच्या जीवनांत ऐकूं येतें असा समज आहे. **महाव्रत—** सत्य, अक्रोध, अहिंसा, ब्रह्मचर्य इत्यादि व्रतांना महाव्रतें म्हणतात. कारण त्याप्रमाणें नेहमीं वागणें मनुष्याला कठीण जातें. येथें महान् शब्दाचा अर्थ कठीण असा घेतला पाहिजे. **दीपस्तंभ—** उंच खांबावर ठेवलेला दिवा. असे दिवे समुद्रामधल्या खडकांवर प्रवासी जहाजांच्या मार्गदर्शनाकरितां असतात. **मंत्र –** सल्ला. **जीवनसंदेश—** आयुष्यांत कसें वागावें याबद्दल महत्त्वाचा उपदेश. **सूक्ष्म–** बारीक, एकदम लक्षांत न येणारे. सूक्ष्म धर्म म्हणजे ज्याचें इंगित चटकन् लक्षांत येत नाहीं असा धर्म. **सायंकाळची छाया —** आयुष्याच्या शेवटचे दुःखद प्रसंग.

प्रश्न :—( १ ) बळरामदादांनीं रुक्मीचे डोक्यांत फांसा कां मारला?
( २ ) कृष्णानें उत्तरेचें मृत बालक मांडीवर घेऊन कोणती शपथ केली ?
( ३ ) श्रीकृष्णाचे शेवटचे दिवस दुःखद कां झाले ?
( ४ ) यादवांचें सुख कां दुरावूं लागलें ?
( ५ ) मद्यपानाचे घोर परिणाम वर्णन करा.

## प्रकरण १५ वें

**टीपा :—अशांचा**–श्रीकृष्णासारख्या योगेश्वरांचा–हें अवतरण राधारमण कवींच्या नाना फडणीस काव्यांतील आहे. **शठंप्रति शाठ्यं**— लबाडाशीं लबाडीनेंच वर्तन करून त्यावर जय मिळवावा. **शठंप्रति सत्यम्**— शठ जरी लबाडीनें वागला तरी आपण सत्याचा मार्ग सोडूं नये.

**गीतेचें भाषांतर :**—विनोबा भावे यांनीं या भाषांतराला गीताई असें नांव दिलें आहे.. याचें गीतेवरील विद्वत्ताप्रचुर भाष्य इंग्रजींत आहे. हिंदुस्थानांतील बहुतेक विद्वानांनीं गीतेवर कांहींना कांहीं तरी लिहिलें आहेच. **ओतप्रोत** – सर्व बाजूंत. **निरर्गल प्रलाप**– बेजबाबदार उद्गार.

**प्रश्न :**—( १ ) श्रीकृष्णाच्या लोकप्रियतेचें रहस्य सांगा.
( २ ) श्रीकृष्णाच्या चरित्राची अपूर्वता कशांत आहे ?
( ३ ) श्रीकृष्ण आजही आपला वाटाड्या कसा होऊं शकेल ?
( ४ ) कौरवांच्या सभेंतील कृष्णाच्या भाषणांतील विचारसरणीचें महत्त्व कथन करा.
( ५ ) श्रीकृष्णानें लोकसमाजाला कोणता मार्ग दाखविला ?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
७७८९
दा. क्र.

## सामान्य प्रश्न

( १ ) श्रीकृष्णाचें गुरुजनांशीं, पत्नीशीं, पुत्रांशीं, सेवकांशीं व मित्रांशीं कशा तऱ्हेचें वर्तन असे ?

( २ ) त्याच्या सेवावृत्तीचें व विनयशील वागणुकीचें रहस्य काय ?

( ३ ) या पुस्तकावरून रुक्मिणी, पेंद्या, वसुदेव व सुदामा यांच्या स्वभावांचें वर्णन करा.

## श्रीकृष्णासंबंधानें वाचनीय पुस्तकें

१. **श्रीकृष्ण-चरित्र**—चिंतामणराव वैद्य; २. **श्रीकृष्ण-चरित्र-रहस्य** श्री. शं. गो. घैसास; ३. श्रीगणुदासविरचित **श्रीकृष्णकथामृत.**

## आधारग्रंथ

**महाभारत**—( हरिवंश ) आणि **श्रीमद्भागवत** दशम व एकादश स्कंद.

REFBK-0007789


विद्याधनं सर्वधनप्रधानम् ।
जंव ते ज्ञान नाहीं प्रांजळ । तंव सर्व कांहीं निष्फळ ।